तरंग

सुखकर्ता फाउंडेशन

दिवाळी अंक
२०२६

सक्रिय | स्वावलंबी | आनंदी जीवनासाठी

नव्या जीवनाच्या सुंदर तरंगात...




सहवास | स्वास्थ | छंद | नवे मित्र | सुरक्षितता | आत्मनिर्भरता

Sukhakarta Foundation

सुखकर्ता निकेतन

ज्येष्ठांसाठी सहजीवनाची नवीन सुरुवात

शहापूर येथे



(प्रस्तावित चित्र)

+91 98333 84567 contact@sukhkartafoundation.org

संपादकीय

तरंग

"तरंग" नव्या जीवनाचे...

दीपावली म्हणजे प्रकाशाचा उत्सव. अंधारातून प्रकाशाकडे जाण्याचा, जुनं मागे ठेवून नव्याचं स्वागत करण्याचा आणि माणसामाणसांमधील नात्यांना पुन्हा उजाळा देण्याचा सण. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात दिवाळीला आणखी एक सुंदर परंपरा दिवाळी अंकांची. दिवाळी अंक कथा, कविता, ललितलेख, वैचारिक लेख, अनुभव आणि आठवणी यांच्या माध्यमातून आपल्या मनाशी संवाद साधतात.

यंदाचा हा **'तरंग'** अंकही अशाच एका संवादाची सुरुवात करण्याचा प्रयत्न आहे. हा अंक ज्येष्ठ नागरिकांसाठी आहे. पण खरं सांगायचं तर तो केवळ ज्येष्ठांसाठी नाही तर तो त्यांच्या मुलांसाठी, त्यांच्या कुटुंबांसाठी आणि आजच्या पिढीतील प्रत्येक तरूणासाठी आहे. कारण वय वाढतं ते फक्त आई-वडिलांचं नाही; काळही वाढतो, बदलतो आणि त्याबरोबर नात्यांची व्याख्याही बदलत जाते.

एक काळ होता, जेव्हा भारतीय कुटुंबव्यवस्था म्हणजे मोठं कुटुंब. घरात आजी-आजोबा, आई-वडील, मुलं, काका-काकू अशी माणसांची गर्दी असायची, मामा-मामी, आत्या, मावशी, भावंडे यांची वर्दळ असायची. घर कदाचित मोठं नसायचं, पण मनं मोठी होती. ज्येष्ठांना घरात मान होता. त्यांचे अनुभव, त्यांचे निर्णय आणि त्यांची उपस्थिती ही घराची श्रीमंती मानली जायची. हीच घराची सावली होती. परंतु काळ बदलला. शिक्षणासाठी, नोकरीसाठी, व्यवसायासाठी मुलं शहरांकडे गेली. शहरं बदलली. घरं बदलली. नोकऱ्यांचे स्वरूप बदलले. आजची मुलं देशातच नव्हे तर जगभर विखुरली आहेत. कुणी मुंबईत, पुण्यात, बंगळुरूत, तर कुणी अमेरिकेत, युरोपमध्ये किंवा ऑस्ट्रेलियात. त्यांच्या आयुष्यातील स्पर्धा, जबाबदाऱ्या आणि जीवनशैली पूर्वीपेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. याचा अर्थ मुलांना आई-वडिलांची काळजी नाही असा अजिबात नाही.

आजही अनेक मुलं आपल्या पालकांसाठी सर्वस्व पणाला लावतात. त्यांच्या आरोग्याची काळजी घेतात, आर्थिक मदत करतात, शक्य तितका वेळ देतात. पण त्याच वेळी काही पालक एकटे पडतात. काहींना वृद्धाश्रमाचा आधार घ्यावा लागतो. काही जण मुलांच्या आयुष्यात 'अडथळा' होऊ नये म्हणून स्वतःच मागे सरकतात. आणि इथेच एक प्रश्न आपल्यासमोर उभा राहतो...

आपल्या आयुष्याच्या उरलेल्या वर्षांची जबाबदारी फक्त आपल्या मुलांची आहे का?

कदाचित या प्रश्नाचं उत्तर नव्या पिढीने नाही, तर आपण ज्येष्ठांनी स्वतःने शोधण्याची वेळ आली आहे. आपण मुलांना वाढवलं. त्यांच्या शिक्षणासाठी, करिअरसाठी, संसारासाठी कितीतरी वर्षं दिली. त्यांच्यासाठी असंख्य इच्छा बाजूला ठेवल्या. हे करताना आपण कधी स्वतःच्या आयुष्याचा हिशेब केला का?

कदाचित नाही.

पण निवृत्तीनंतरचा काळ म्हणजे आयुष्याचा शेवट नाही. उलट तो आयुष्याचा असा टप्पा आहे जिथे पहिल्यांदाच आपण स्वतःसाठी जगू शकतो.

आपण वाचायचं राहून गेलं असेल, गाणं शिकायचं राहून गेलं असेल, प्रवास करायचा राहून गेला असेल, मित्रांना भेटायचं राहून गेलं असेल.

वाचा, शिका, प्रवास करा, मित्रांना भेटा, नाचायचं, गाणं म्हणायचं, चित्र काढायचं, नाटक करायचं, बाग फुलवायची, लेखन करायचं करा! आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे दोस्ती करा. वय वाढल्यानंतर माणसाला औषधांइतकीच गरज असते ती **संवादाची, सहवासाची** आणि **आपलेपणाची.** उद्यानातील बाकावरची मैफल असो, ज्येष्ठांचा कट्टा असो, एखाद्या पुस्तकावरची चर्चा असो किंवा पत्त्यांचा, बुद्धिबळाचा, कॅरमचा डाव या छोट्या छोट्या गोष्टी आयुष्याला पुन्हा रंग देतात.

या अंकातील **'सहजीवनाच्या झुल्यावर'** ही भावना अगदी सुंदरपणे व्यक्त होते. ज्येष्ठ मित्रांचा कट्टा, त्यांच्या गप्पा, विनोद, मैत्री आणि एकमेकांच्या सहवासातून मिळणारा आनंद हे सगळं सांगतं की ज्येष्ठत्व म्हणजे एकटेपणा नव्हे. आणखी एका कथेत जुन्या मित्रांच्या आठवणींत हरवलेला माणूस आपल्या आयुष्यात काहीतरी महत्त्वाचं हरवल्याची जाणीव करतो आणि पुन्हा मित्रांना एकत्र आणण्याचा निर्णय घेतो. स्वतःकडे आर्थिक साधनं असताना, मुलं दूर असताना, उरलेलं आयुष्य जुन्या मित्रांसोबत पुन्हा जगण्याची त्याची इच्छा अत्यंत बोलकी आहे.

मुलं आपली आहेत; पण त्यांचं आयुष्य त्यांचं आहे. आणि **आपलं आयुष्य ते आपलं आहे.**

हे वाक्य कदाचित ऐकायला कठोर वाटेल. पण त्यातच नव्या सहजीवनाची बीजं आहेत. मुलांवर प्रेम करू नये असा या अंकाचा संदेश नाही. उलट मुलांशी नातं अधिक सुंदर व्हावं, यासाठीच हा विचार आहे. मुलांनी आपल्या पालकांची काळजी घ्यावी, त्यांच्या भावनांचा आदर करावा, त्यांच्यासाठी वेळ द्यावाही अपेक्षा स्वाभाविक आहे.

पण त्याचवेळी पालकांनीही मुलांच्या बदललेल्या जगाला समजून घेतलं पाहिजे. मुलांनी आपल्यासारखं जगावं, आपल्याच पद्धतीने निर्णय घ्यावेत, आपल्याच मूल्यांनुसार आयुष्य घडवावं, अशी अपेक्षा ठेवली तर संघर्ष अपरिहार्य आहे. अंकातील एका लेखातही बदलत्या पिढ्यांमधील स्वातंत्र्य आणि प्रेम यांचा सुंदर

संदर्भ येतो कधी कधी मुलांना स्वातंत्र्य देणं हेही प्रेमाचंच एक रूप असतं.

म्हणूनच आजच्या ज्येष्ठांनी एक नवा विचार स्वीकारायला हवा **'मुलांवर अवलंबून राहण्यापेक्षा मुलांशी जोडलेले राहूया.'** आधाराची गरज पडली तर मुलांकडे नक्कीच हात पुढे करावा. पण भावनिक, सामाजिक आणि दैनंदिन जीवनासाठी आपलं संपूर्ण विश्व फक्त मुलांभोवती बांधू नये.

आपला जोडीदार असेल तर त्याच्यासोबत किंवा तिच्यासोबत पुन्हा एकदा सहजीवनाचा आनंद घ्या. जोडीदार नसेल तर समवयस्क मित्र-मैत्रिणींचा समूह निर्माण करा. एकत्र फिरावं, सहली कराव्यात, कार्यक्रम करावेत, खेळ खेळावेत, सण साजरे करावेत, एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी व्हावं.

कारण वृद्धत्व म्हणजे कमी होणं नाही; ते आयुष्याकडे नव्या नजरेने पाहण्याची संधी आहे. या अंकातील **'घरातले म्हातारे आता नकोशे झाले'** ही कविता मात्र आपल्याला दुसरी बाजूही दाखवतेतरुणाईच्या धुंदीत ज्येष्ठ माणसांची उपेक्षा होऊ नये, त्यांच्या त्यागाची किंमत विसरली जाऊ नये, ही वेदनादायक जाणीव ती करून देते. म्हणून हा अंक मुलांना दोष देण्यासाठी नाही आणि पालकांना मुलांपासून दूर जाण्याचा सल्ला देण्यासाठीही नाही. हा अंक फक्त एवढंच सांगू इच्छितो नाती जपा. पण स्वतःलाही जपा. मुलांवर प्रेम करा. पण स्वतःच्या आयुष्यावरही प्रेम करा. त्यांना उडू द्या आणि आपणही पुन्हा उडायला शिका.

ज्येष्ठांचं आयुष्य असत स्वावलंबी, आनंदी आणि प्रकाशमान दिवाळीच्या आकाशात सोडलेला प्रत्येक दिव्यासारखं. अशां या सुरेख कालखंडाला आयुष्याची संध्याकाळ का म्हणायची? संध्याकाळ म्हणजे दिवसाचा शेवट नसतो. ती पुढच्या सुंदर रात्रीची आणि नव्या पहाटेची सुरुवात असते. म्हणूनच या दिवाळीत एक संकल्प करूया. आठवणींत फक्त रमायचं नाही; नव्या आठवणी निर्माण करायच्या. मुलांची वाट पाहत बसायचं नाही; मित्रांची वाट धरायची.

'आता आपलं काय उरलंय?' असं म्हणायचं नाही; 'आता आपल्यासाठी काय काय करायचं बाकी आहे?' असा प्रश्न विचारायचा.

आणि म्हणूनच या अंकाचं नाव **'तरंग'** कारण नदीला किनारा असतो, पण प्रवाह थांबत नाही. आपल्या आयुष्यालाही वयाचा एक किनारा लाभला आहे. पण मनाचा प्रवाह अजूनही वाहतो आहे.

चला तर मग

या नव्या तरंगांवर स्वार होऊया.
स्वतःसाठी जगूया.
मित्रांसोबत हसूया.
जोडीदारासोबत पुन्हा प्रेम जगूया.
आणि उरलेलं आयुष्य
कुणावर ओझं न होता,
कुणाला ओझं न समजता,
मनसोक्त जगूया!

हीच **'तरंग'**ची दिवाळीच्या निमित्ताने आपणा सर्वांना मनापासून शुभेच्छा.

– मकरंद मराठे
संपादक

जुन्या आयुष्याची नवीन सुरुवात...



प्रकाशकाचे मनोगत

सस्नेह नमस्कार,

काही स्वप्ने ही स्वतःसाठी नसतात, ती इतरांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्यासाठी पाहिली जातात. काही संकल्पना या केवळ कल्पना नसतात, तर अनेकांच्या आयुष्यात आनंदाचा नवा अध्याय लिहिण्याची सुरुवात असते.

आयुष्याच्या प्रवासात आपण अनेक गोष्टी मिळवतो. घर, पैसा, प्रतिष्ठा, यश... पण या सगळ्यांच्या पलीकडे एक गोष्ट कायम शोधत असतो, ती म्हणजे आपलेपणा, प्रेम, सुरक्षितता आणि मनापासून जगण्याचा आनंद.

कधी काळाच्या ओघात माणूस आपल्या माणसांपासून दूर जातो, कधी जबाबदाऱ्यांमध्ये स्वतःसाठी जगायचेच विसरून जातो, तर कधी आयुष्याच्या एका टप्प्यावर नव्याने जगण्याची इच्छा असूनही योग्य वातावरण मिळत नाही. याच भावनेतून **सुखकर्ता फाउंडेशन**च्या माध्यमातून **सुखकर्ता निकेतन** (Five Star Community Living) ही संकल्पना साकारण्याचा आमचा प्रयत्न आहे.

आमची कल्पना केवळ एक सुंदर वास्तू उभी करण्याची नाही, तर असे एक कुटुंब निर्माण करण्याची आहे, जिथे प्रत्येकाला आपलेपणा मिळेल, जिथे एकटेपणाला सोबत मिळेल, जिथे जुन्या आठवणींना उजाळा मिळेल आणि नव्या आठवणी निर्माण करण्याची संधी मिळेल.

आम्हाला असे वातावरण निर्माण करायचे आहे, जिथे वय हा आनंदाचा अडथळा नसेल, तर आयुष्य नव्याने अनुभवण्याची संधी असेल. जिथे माणसे केवळ एकाच ठिकाणी राहणार नाहीत, तर एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होतील.

कारण माझ्या मते, आयुष्य कधीच संपत नसते; प्रत्येक वळणावर त्याला एक नवी दिशा देता येते. फक्त त्या दिशेने चालण्यासाठी एक सुंदर वातावरण आणि आपली माणसे सोबत असणे गरजेचे असते.

"**जुन्या आयुष्याची नवीन सुरुवात...**" ही केवळ आमची **टॅगलाइन** नाही, तर आमच्या संकल्पनेमागची भावना आहे. जुन्या आठवणी, अनुभव आणि नाती जपत आयुष्याचा प्रत्येक क्षण नव्या उत्साहाने जगता यावा, हेच आमचे स्वप्न आहे.

या स्वप्नाला प्रत्यक्षात आणण्याच्या प्रवासात आपला विश्वास, प्रेम आणि सहकार्य आम्हाला नक्कीच बळ देईल, असा मला विश्वास आहे.

शेवटी एवढेच सांगावेसे वाटते की, **आयुष्य किती जगलो यापेक्षा ते किती आनंदाने जगलो,** हे अधिक महत्त्वाचे आहे. आणि कोणाच्याही आयुष्यात आनंदाची नवी पहाट निर्माण करता आली, तर त्यापेक्षा मोठे समाधान दुसरे कोणतेच नाही.

आपल्या सर्वांना सुख, समाधान, उत्तम आरोग्य आणि आनंद घेऊन येणाऱ्या दीपावलीच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

आपला,

सचिन भिमा बोधणे
संस्थापक
सुखकर्ता निकेतन

चला, पुन्हा एकदा जगूया... नव्या उत्साहाने, नव्या नात्यांनी आणि नव्या आनंदाने!

तरंग अंतरंग

- संपादकीय
- प्रकाशकाचे मनोगत

१.	फुंकर	संकलन	६
२.	उतरणीवरचे संध्यारंग	डॉ. प्रिया टोकेकर	७
३.	बदलती कुटुंबव्यवस्था : नात्यांचे बदलते आकार	सुजय पतकी	१२
४.	तुटे वाद-संवाद	डॉ. अद्वैत पाध्ये	१६
५.	ज्येष्ठत्व : कर्तृत्वाचा नवा अध्याय	प्रतिष्ठा कुलकर्णी-सोनटक्के	२०
६.	तरुण, तारुण्य आणि आपण	मृणाल देशपांडे	२३
७	सहजीवनाच्या झुल्यावर	राजेश दाभोळकर	२६
८.	तटस्थता	संकलन	३०
९.	हरवलेली माणसं आणि जुन्या आठवणी	अश्विनी जांभेकर-पितळे	३५
१०.	ग्रामीण ते शहरी जीवनाचा प्रवास	यश मिराशी	३८
११.	आठवणी आकाशवाणीच्या	शेखर जोशी	४०
१२.	वृद्धत्व (कविता)	संजय एकनाथ गायकवाड	४२
१३.	राहून गेलेला फोटो	वीणा रारावीकर	४३
१४.	स.न.वि.वि.	संकलन	४४
१५.	आता तरी जगू या रे!	संजय एकनाथ गायकवाड	४६
१६.	दोन पिढ्यांतील संवाद आणि विसंवाद	मनोज जोशी	५१
१७.	समाजातील बदलांकडे ज्येष्ठांची नजर	अश्विनी राजे	५५
१८.	भात पुराण	संकलन	५८
२९.	पोचपावती	संकलन	६१
२०.	मृत्यूपत्र	ॲड. महेंद्र विद्याधर एकबोटे	६२

ऋणनिर्देश

दिवाळी अंक २०२६
एक विचार नव्या जीवनाच्या तरंगांचा

- संकल्पना व निर्मिती
  सचिन भिमा बोधणे
  सुखकर्ता फाउंडेशन
- संपादक
  मकरंद मराठे
- सृजन - विपणन
  राजेश देसाई
- अंतर्गत सजावट
  सुधीर मुणगेकर
- मुद्रण
  श्री प्रिंटींग प्रेस, ठाणे.
- सहकार्य :
  नितीन बोधणे
  मनेष सुर्वे
  सचिन भालशंकर

मूल्यः- १०० रुपये/-

विशेष आभार

या अंकासाठी आपले अनुभव, आठवणी, विचार आणि लेखन मनापासून देणाऱ्या सर्व लेखकांचे, ज्येष्ठ नागरिकांचे, मित्रपरिवाराचे आणि सहकार्य करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे मनःपूर्वक आभार.
या अंकात समाविष्ट असलेले लेख, कल्पना, विचार हे सदर लेखकांचे आपले वैयाक्तिक मत आहे. त्याच्याशी संपादक किंवा संचालक सहमत असतीलच असे नाही.



फुंकर

चुलीतल्या धुमसत्या लाकडांवर फुंकर घातल्यास त्यातून आगीच्या ज्वाला पेटतात ज्याने अन्न शिजते.

कुणाच्या भाजलेल्या त्वचेवर अथवा जखमेवर फुंकर घातल्यास तिथला दाह कमी होतो.

शाळेत कधी डोळ्यात काही पडलंच तर बाजूचे मित्र/मैत्रीण त्यांच्या चिमुकल्या हातांनी डोळा मोठा करत त्यावर फुंकर घालायचे जेणेकरून डोळ्यात पडलेला कण उडून जायचा.

कुणाच्या दु:खावर मायेच्या आश्वासक शब्दांची फुंकर घातल्यास त्या व्यक्तीस दु:ख सहन करण्याची, त्यातून बाहेर पडण्याची ताकद मिळते.

नवथर तरुणीच्या अल्लड बटांवर तिच्या प्रियकराने घातलेली हलकीशी फुंकरही तिच्या कायेत रोमांच फुलविते. आठवणींच्या वहीवर फुंकर घालताच अनेक आठवणींची पानं फडफडू लागतात.आयुष्यातली एखादी जवळची व्यक्ती गेली की खाली राहिलेली व्यक्ती या आठवांच्या जीवावर तिचे उर्वरीतआयुष्य घालवते. या आठवांच्या माध्यमातून त्या व्यक्तीचा सहवास अनुभवत रहाते.

गरमगरम कॉफीचा फुंकर घालून आस्वाद घेण्याचा नाद वेगळाच.

लहानपणी लाजाळु/लाजरीच्या पानांवर हळूवार फुंकर घालून ती मिटताना पहाणं हाही एक नादच होता.

बशीतला गरम चहा एकाकडेने आजी/आई धरते व दुसऱ्या कडेने बाळ बशीला गच्च पकडते. मग आई हळूवार फुंकर घालते चहावर जेणेकरून बाळाच्या जीभेला चटका लागू नये. ते पाहून बाळाला अजून मजा येते. बाळपण मग फुर्र फुर्र करत चहा पिऊ लागतो.

लहान बाळाच्या जावळावर फुंकर घाला.त्याचे मुलायम केस भुरुभुरु उडतात व बाळ जितका वेळ आपण फुंकर घालू तितका वेळ खुदूखुदू हसतं. ते हसणं, त्याहून सुंदर आकाशातलं चांदणं देखील नसतं.

पाटी ओल्या फडक्याने स्वच्छ पुसली की ती फुंकर घालून वाळवायचो तेंव्हाचं ते गाणं चिमणी चिमणी पाणी दे कावळ्या कावळ्या वारा घाल... अजुनही बालपणात घेऊन जातं.

बासरीच्या मुखरंध्राजवळ श्रीकृष्णाची अलवार फुंकर पडू लागली की गोपिकाच काय, गाईवासरेही देहभान विसरुन डोलू लागायची.

अशी ही फुंकर..इवलीशी..तरी अगदी जवळची. कधी कधी मैत्री वर बसलेल्या धुळीवर पण फुंकर मारून बघावी तिथलीही धुळ उडून जाईल

कधी हलकिशी फुंकर मारून तर बघा.

– संकलन



उतरणीवरचे संध्यारंग

निवृत्तीचे वेध लागले की पुढला उतार स्वच्छ दिसायला लागतो. घर-संसार, नोकरी, व्यवसायात गुरफटलेली मध्यमवयातली मंडळी आयुष्याच्या संध्याकाळाकडे थोडेफार लक्ष देऊ लागतात. साठीनंतरही, अगदी पाऊणशे वयमानापर्यंत कार्यरत असलेल्यांची संख्या कमी नसली तरी तशी माणसे क्वचितच भेटतात. उतारवयातही क्रियाशील राहाणे ही खरोखर कला म्हणायला हवी. आपल्या आयुष्यातले संचित पुढल्या पिढीकडे सोपवून हळूहळू प्रपंचातून काढता पाय घेणे सगळ्यांनाच यशस्वीरित्या जमते असे नाही. वृध्दांना पिकले पान म्हणतात. या पिकल्या पानांनी सृष्टीचे सगळे चक्र वारंवार अनुभवलेले असते, पचवलेले असते. त्यांच्या अनुभवाचे संचित हे पुढील पिढ्यांसाठीही दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरु शकते. परंतु,

खरेच तसे ते असते का? याचा शोध जगभर अनेक मानव्य शाखांचे विद्यार्थी आणि बुध्दिवंत घेत आहेत. तसे शोधनिबंध नियमित प्रसिध्द होत असतात. स्थानिक पातळीवरही वृध्दांच्या समस्या आणि त्यांची उपयुक्तता याबद्दल विचार करणाऱ्या

संस्था आपल्याकडेही आहेतच. या दिशेने आपणही थोडेसे डोकावून पाहिले पाहिजे, या उद्देशाने गेल्या वर्षी ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त आमच्या महाविद्यालयात ज्येष्ठांसाठी एका कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे ठरवले.

नव्या शैक्षणिक धोरणात द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी ज्येष्ठ नागरिक हा विषय CDP (Community Development Programme) अंतर्गत देण्यात आला. त्याचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. परंतु १० ते १२ मुले वगळता इतरांनी आपले आजी-आजोबा आपल्याबरोबर रहात नसल्यामुळे त्यांना आणण्यास असमर्थता दर्शवली. आम्हा शिक्षकांना याचा थोडासा धक्का तर बसलाच, परंतु बदलत्या सामाजिक जीवनाची जाणीवदेखील प्रकर्षाने झाली. कारण आपला भारतीय समाज हा कालपर्यंत एकत्र कुटुंबात नांदत, फळत-फुलत होता. भारतीय कुटुंबव्यवस्थेचे कौतुक जगभर, अगदी युरोपातदेखील होत होते. जगातल्या त्या पुढारलेल्या भागात कुटुंब व्यवस्था चिंताजनक स्थितीत असल्याची टीका होत असे. पण कालपर्यंत इंग्लंड-अमेरिकेला नाव ठेवणाऱ्या आपल्याला हे लोण आपल्यापर्यंत कधी येऊन पोचले हे कळलेच नाही का?

डोळ्यासमोर उभा राहिला तो साठ सत्तर वर्षांपूर्वीचा काळ. ते चौसोपी वाडे, त्यांना आपल्यात सहज सामावून घेणारी एकत्र कुटुंब पद्धती. थोरल्यांना घरात मान असायचा, सुट्टीत नातवंडे घरी यायची. त्यांना सकाळी मऊ भात, दशमी करून खायला घालणारी आजी आणि पोहायला घेऊन जाणारे , शेतात नेणारे आजोबा, त्यांना मदत करणारे मामा मामी. बव्हंशी मध्यमवर्गीय घराघरात असेच चित्र असायचे. अर्थात ग्रामीण भागात जीवनशैली वेगळी असेल, पण कौटुंबिकतेचा धागा घट्टच होता.

बदलत्या काळाबरोबर अनेक गोष्टी बदलल्या. नोकरीव्यवसायाच्या निमित्ताने ग्रामीण भागातले लोंढे शहरांकडे वळले. खेड्यातले दिवस आठवणीतच राहिले. तरी देखील अगदी आत्ता आत्तापर्यंत बऱ्याच घरांमध्ये एकत्र कुटुंब होती. निवृत्त झालेले आजोबा आणि त्यांची मित्र मंडळी वृत्तपत्र वाचन, कीर्तन, गप्पाष्टके, सकाळ-संध्याकाळी फिरायला जाणे यात रममाण असायचे. तर आजीबाई पूजा-अर्चा, देवळातील फेरी, संध्याकाळच्या बिल्डिंगमधील बायकांबरोबरच्या गप्पाटप्पा झालेच तर नातवंडांना श्लोक-पर्वचा शिकवणे, त्यांच्या घरी आलेल्या मित्रमंडळींबरोबर गप्पा मारणे यात रमायच्या. मुलगा-सून दोघेही नोकरी करत असतील तर आजी-आजोबा मिळून नातवंडांना सांभाळायचे, त्यात दिवस कसा भुर्रकन उडून जायचा हे कळायचे देखील नाही. तब्बेत बिघडली तर नातवंडही काळजी घ्यायची. काही वृद्ध मंडळी महिने वाटून घेऊन आपल्या मुलांकडे आलटून पालटून राहायची. पण एकंदरीत घरातील ज्येष्ठ मंडळी ही त्यांच्या मुलांची आणि नातवंडांची जबाबदारी होतीहे चित्र सर्वसाधारण मध्यमवर्गीय घरांमध्ये दिसत होते.

परंतु औद्योगिकीकरण, शहरीकरण यानंतर नव्वदीच्या दशकाचा पुढचा टप्पा आला -तो होता जागतिकीकरणाचा. आधी मुलांनी परदेशी शिकायला जाणे म्हणजे केवढे अप्रूप होते, परंतु गेल्या तीन दशकात परिस्थिती झपाट्याने बदलली. मध्यमवर्गीय घरातील मुले सर्रास अमेरिका आणि इतर अनेक देशात शिक्षणासाठी जाऊ लागली. तिथेच स्थायिक झाली. ज्यांची मुले देशातच होती, ती देखील इतर शहरात स्थायिक होत होती किंवा अगदी एका गावात देखील मुलांनी वेगळे घर थाटण्यास सुरुवात केली. कुटुंबातील मुलांची संख्यादेखील कमी झाली. एक किंवा दोनच मुलांचा जमाना आला. आजपर्यंत न ऐकलेले 'स्पेस', 'आयडेंटिटी', प्रायव्हसी हे शब्द आता कानावर पडू लागले. चाळींच्या, छोट्या इमारतींच्या ठिकाणी टुमदार टॉवर्स उभे राहिले. पिढीच्या पिढी चौसोपी घरातून थेट चौरस फुटांचे हिशेब करत स्थैर्यासाठी धडपडू लागली. वनबीएचके, टूबीएचके, थ्रीबीएचके हे आटोपशीर कुटुंबाच्या उत्कर्षाचे टप्पे मानले जाऊ लागले. जरा सधन घरातल्या मुलामुलींना स्वतंत्र खोल्यांची गरज वाटू लागली. आणि आत्तापर्यंत कधीही फारशी न जाणवलेली कुटुंबातील ज्येष्ठांची समस्या बघता बघता

एक सामाजिक समस्या होऊन बसली!

जपान हा जगातील सर्वाधिक ज्येष्ठ नागरिक किंवा वृद्ध लोकसंख्या असलेला देश आहे. तिथे ३०% पेक्षा जास्त लोक ज्येष्ठ नागरिक आहेत. भारतात ही टक्केवारी आजमितीला १२% इतकी असली तरी २०३६ सालापर्यंत हे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या १५% इतके असेल. युरोपात हे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या २१% इतके आहे. थोडक्यात, वाढते आयुर्मान आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या हे सार्वत्रिक आहे.

आपण जर रोजचे वर्तमानपत्र उघडले तर आपल्याला दिसते की डिजिटल फ्रॉड, चुकीच्या ठिकाणी केलेल्या गुंतवणूकीमुळे पदरी आलेली निराशा, आई वडिलांना मुलांनी घराबाहेर काढणे आणि प्रकरण न्यायालयापर्यंत पोचणे किंवा जवळच्या नातेवाईकांनी संपत्तीसाठी ज्येष्ठांना वेठीस धरणे, एकटे राहणाऱ्या वृद्धांची फसवणूक, काही वेळा हत्या किंवा एकाकी अवस्थेत आलेले मरण अशा बातम्या वाचायला मिळतात.

शिक्षण, व्यवसाय, विवाह, कौटुंबिक जबाबदाऱ्या या सर्वात आयुष्य भराभर पुढे सरकते. दिवस, वर्षे कशी उलटून जातात समजत नाही. आणि मग एक दिवस अचानक या सर्वाला जणू ब्रेक लागतो. निवृत्ती सुरु होते, मुलेबाळे अन्यत्र जातात, किंवा परदेशाची वाट धरतात. मग पुन्हा सुरु होते फक्त दोघांचे किंवा काही वेळा एकट्याचे आयुष्य.

सुरुवात दोघांनीच केलेली असते, परंतु त्यावेळी डोळ्यात स्वप्ने असतात, मनगटात जोर असतो. आता मात्र हे दोघांचेच किंवा एकट्याचे आयुष्य तेवढे सुकर राहात नाही. अर्थात, आज आपण मध्यमवर्गाकडे बघितले तर त्यांनी फार हुशारीने आधीपासूनच या सर्वांची तयारी करून ठेवलेली असते. थोडीफार माया जमवलेल्यांची, निवृत्तीनंतरची पहिली काही वर्षं देश-विदेशाचे पर्यटन, सिनेमा नाटक बघणे, मित्रमंडळींबरोबरचे कार्यक्रम यात मजेत निघून जातात.

सुरवातीच्या काळात परदेशातील मुलांकडे जाताना या ज्येष्ठांचा ऊर अभिमानाने भरून येतो. मुलेदेखील हौशीने बोलवून आजूबाजूचा भाग दाखवतात. मुली-सुनांचे बाळंतपण आणि नंतर नातवंडे थोडी मोठी होईस्तोवर या खेपा चालू राहतात. पण नंतर मुले ,सुना-नातवंडे दिवसभर बाहेर असताना परदेशातील ते घर खायला उठते. सुरवातीला नातवंडांच्या इंग्रजीचे खूप कौतुक वाटते, परंतु त्यांचे उच्चार समजत नाहीत, त्यांच्याशी संवाद साधणे कठीण होऊन बसते आणि मग **'गड्या आपुला गाव बरा'** अशी ओढ लागते. आमच्या अगदी जवळच्या दाम्पत्यांनी सांगितलेली हकीगत अशी- दोन्ही मुले अमेरिकेत. कोरोनाकाळात आई-वडिलांना तिकडे कायमचे घेऊन गेले. पण काही दिवसानंतर त्यांना जाणवले की इथे सुद्धा आपण बराच वेळ एकटेच असतो . पुन्हा आई-वडील आठवडाभर एकटेच घरात राहतात म्हणून मुलं बिचारी शनिवार रविवार त्यांच्यासाठी कार्यक्रम आखायची. या ओढाताणीचा



कंटाळा येऊन –ज्या ग्रीन कार्डसाठी जगभरातले लोक जीव पाखडतात ते– ग्रीन कार्ड परत करून ते शांतपणे भारतात परतले. याच संदर्भात आणखी एक प्रतिक्रिया आठवते : बरेच वर्ष सासू–सासऱ्यांचे करून त्या थोड्या मोकळ्या झाल्या, तोच मुलगा परदेशात निघून गेला. त्या म्हणाल्या की आपण तर मोठ्यांचे केले, पण आता आपले करायला कोण आहे?...खरंच आजच्या साठीला आलेल्या पिढीपुढला हा मोठा प्रश्न आहे.

ज्यांची मुले इथेच असतात, त्यांची परिस्थिती काही फारशी वेगळी नसते. इथे देखील मुले–सुना आपापल्या उद्योगात असतात. नातवंडे दिवसभरचा बराच काळ शाळा किंवा कॉलेज आणि ट्युशन क्लास, उरलेल्या वेळेला छंदवर्ग यात बिझी असतात. घरी आल्यानंतर त्यांचा बराच वेळ इन्स्टाग्राम, व्हाट्सअँप चॅटिंग यात जातो. त्यांना मोठ्यांचे नुसते आसपास 'असणे'देखील लुडबूड वाटू शकते. अर्थात हे अगदी प्रातिनिधिक चित्र म्हणता येणार नाही. पण याचे प्रमाण आताशा वाढू लागले आहे, हे खरेच. आजी–आजोबांच्या जुन्या सवयी नव्या पिढीला खटकू लागतात. फार थोड्या ठिकाणी या दोन पिढ्यांमध्ये आपल्याला बंध निर्माण झालेला दिसतो.



या सर्वांचा विचार करून आजची ज्येष्ठ पिढी स्वतंत्र राहणे पसंत करते. परंतु हे सर्व सत्तरीपर्यंत चालू राहते. हळूहळू डोळ्यांनी कमी दिसायला लागणे, ऐकू कमी येणे, गुडघे दुखणे, गोष्टी विसरायला सुरुवात होणे या सर्व समस्या भेडसावू लागतात. आर्थिक सुबत्ता असली तरी बोलायला कोणी नाही, दृष्टी कमी झाल्यामुळे किंवा वाचन किंवा टीव्ही बघण्यावर येणाऱ्या मर्यादा, वाढत्या वाहतुकीमुळे बाहेर फिरणे कठीण होणे, वाहतुकीची सार्वजनिक वाहने पटकन उपलब्ध नसणे, संध्याकाळच्या वेळी रिक्षांसाठी होणारी हातघाई अशा अनेक समस्यांना त्यांना तोंड द्यावे लागते. त्यातून तब्येतीच्या तक्रारी असतील, तर वारंवार डॉक्टरांकडे जाणे, आपली औषधे व्यवस्थित घेणे हे देखील कठीण होऊन बसते.

अर्थात या सर्व अडचणींवर अनेक उपाय देखील शोधलेले दिसतात. मोठमोठ्या निवासी संकुलांमध्ये ज्येष्ठ नागरिक संध्याकाळचे एकत्र येऊन छान वेळ घालवताना दिसतात, सहली, सकाळचे योगाभ्यास वर्ग, लाफ्टर क्लब, ज्येष्ठ नागरिक संघ यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

आणखी एक मोठा झालेला बदल म्हणजे ज्येष्ठ नागरिकांच्या मदतनीसांची आणि त्यांची माहिती मिळवण्यासाठी असणाऱ्या संस्था, ब्युरोजची संख्या वाढत आहे. अनेक महानगरांमध्ये खास ज्येष्ठांसाठी निवासी संकुले तयार होत आहेत. यात वाढत्या वयाच्या अडचणी लक्षात घेऊन सर्व सुखसोयी करण्यात येतात. या ठिकाणी म्हणाल तर कॉमन सुविधा आणि पाहिजे तर स्वतंत्र सुविधा उपलब्ध असतात. उदाहरण द्यायचे झाले तर तुम्हाला स्वतःचे स्वयंपाकघर असते, परंतु कॉमन किचनची सोयदेखील उपलब्ध असते. त्याचप्रमाणे डॉक्टरपासून ते प्लंबरपर्यंत सर्व सेवा पुरविल्या जातात. आठवड्यातून एखादेवेळी नजीकच्या शहरात जाण्याची सोय केली जाते. याचबरोबर पुण्यासारख्या ठिकाणी ज्येष्ठांसाठीची 'पाळणाघरे' देखील सुरु झाली आहेत. अमेरिकेतली ही 'डे–केअर सेंटर्स'! दिवसभर वृध्द

मंडळींनी इथे छान वेळ घालवावा. स्मरणशक्तीचे खेळ खेळावेत, या सर्वामागचा उद्देश, न टाळता येणारे वृद्धत्व सुकर करणे हाच आहे. ठाण्यात 'आयपीएच' या संस्थेने 'सप्तसोपान' नावाचा उपक्रम सुरु केला आहे. ज्येष्ठांसाठी छंदवर्ग, वार्षिक स्नेहसंमेलन असे अनेक कार्यक्रम या अंतर्गत होतात. या सर्व ॲक्टिविटीजचा वृध्दांना खूपच उपयोग होतो.

या क्षेत्रात अनेक संस्था, एनजीओ कार्यरत आहेत. पण वृध्द मंडळींचे आपणही काही देणे लागतो, या सामाजिक भावनेने ठाण्यातील जोशी-बेडेकर महाविद्यालयानेदेखील आपला खारीचा वाटा उचलण्याचे ठरविले. दोन वर्षांपूर्वी नवीन शैक्षणिक धोरण अंतर्गत द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी 'कम्युनिटी एंगेजमेंट प्रोग्रॅम' हा विषय ठेवण्यात आला. या अंतर्गत कला विधागातील द्वितीय वर्षाच्या मुलांसाठी ज्येष्ठ नागरिक हा विषय निवडण्यात आला. त्या अंतर्गत महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाने ज्येष्ठ नागरिकांसाठी दहा दिवसांचा कोर्स घेण्याचे ठरविले. कोर्सची वेळ सकाळी १० ते दुपारी १ अशी ठेवली. या अंतर्गत ज्येष्ठांसाठी योग, वेगवेगळे खेळ त्याचप्रमाणे विविध तज्ञांबरोबर संवाद अशी आखणी केली.

हा पहिलाच प्रयत्न असल्यामुळे आम्ही प्रतिसादाबद्दल साशंक होतो. परंतु दोन्ही वर्ष आम्हाला चांगला प्रतिसाद लाभला व वीस ज्येष्ठ नागरिकांनी या उपक्रमासाठी नोंदणी केली. या कार्यक्रमाचे सर्व संयोजन विद्यार्थ्यांनी केले. मुले आणि आजी आजोबा यांच्यात छान सेतू बांधला गेला. या उपक्रमाअंतर्गत ज्येष्ठ नागरिकांसाठी नृत्य सत्र, त्याचबरोबर ज्येष्ठांच्या संदर्भातील कायदे, आर्थिक गुंतवणूक, डिजिटल लिटरसी, आहारविषयक सत्र, दररोज योगाभ्यास वर्ग अशी आखणी केली होती. अगदी नृत्याच्या सत्रापासून सर्वच सत्रात ज्येष्ठ नागरिक उत्साहाने सहभागी झाले. आलेल्या विविध तज्ज्ञांशी त्यांनी संवाद साधला. त्यांच्यासमोर स्वतःची मते म ांडली. समारोपाच्या कार्यक्रमात काही ज्येष्ठ नागरिकांनी आणि विद्यार्थांनी मिळून मस्त नृत्य सादर केले. अंताक्षरी रंगली.

काहींना हा उपक्रम इतका आवडला की दुसऱ्या वर्षीदेखील ते या उपक्रमात सामील झाले. या सर्व ज्येष्ठांनी पुन्हा एकदा कॉलेजचे सोनेरी क्षण अनुभवले. या उपक्रमात सामील झालेले ज्येष्ठ, सुविद्य होते. अगदी डॉक्टरसुद्धा या उपक्रमात सामील झाले. एवढेच नाही तर त्यांनी आमच्या विद्यार्थिनींसाठी एक आरोग्यविषयक सत्र घेतले. या वर्षीसुध्दा हा उपक्रम चालूच राहणार आहे.

या संदर्भात आमचा हा कोर्स केलेले सत्तर वर्षाचे तरूण विनायक मंकीकर यांची प्रतिक्रिया मी येथे मांडते : 'जीवन गाणे गात चालावे' आणि 'आनंदाच्या वाटेवरचा मस्त मस्त उतार' स्थळ बेडेकर कॉलेज, ठाणे, कार्यशाळेतील सहभाग अविस्मरणीय. विविध जीवनोपयोगी विषयांवर ज्ञानसंपन्न व्याख्याते, विचारमंथन, सहभाग आणि सादरीकरण सर्वोत्तम. आयुष्याच्या तिन्हीसांजेला विद्यार्थीवर्गाबरोबर खेळीमेळीच्या वातावरणात व्यतीत केलेले दहा दिवस, हृदयाच्या गाभाऱ्यात उमललेले निस्वार्थ प्रेम म्हणजे विद्यार्थ्यांशी जडलेले अतूट नाते! मिळालेली ऊर्जा, कॉलेजच्या बेंचवर बसताना आठवलेले बालपणीचे सुखद क्षण, विद्यार्थ्यांनी आजोबा म्हणून मारलेली हाक, बेडेकर कॉलेजचे प्रिन्सिपॉल आणि इतर सर्व प्राध्यापक व स्टाफ याचे अनमोल सहकार्य. सर्वांच्या समवेत झालेला सांगता कार्यक्रमाचा आनंदसोहळा हे सर्व काही प्रत्यक्ष अनुभवल्यानंतर मी विनायक मंकीकर आतुरतेने पुढील कार्यशाळेची वाट पाहत आहे.

शुभम् भवतु ।

एकूणच ज्येष्ठांच्या प्रश्नांविषयी जागरूकता निर्माण झालेली दिसते. समस्या तर आहेतच, पण त्यावर मार्गही शोधावे लागतील.

'याजसाठीं केला । होता अट्टाहास ।
शेवटचा दिस । गोड व्हावा ।।'

या तुकाराम महाराजांच्या अभंगाप्रमाणेच तर जीवनप्रवास व्हायला हवा. आयुष्याच्या तिन्हीसांजेचे रंग सुंदर दिसले पाहिजेत, म्हणून तर हा सारा अट्टाहास.

– डॉ. प्रियंवदा टोकेकर
माजी उप-प्राचार्या आणि
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
जोशी-बेडेकर कॉलेज, ठाणे.



बदलती कुटुंब व्यवस्था : नात्यांचे बदलते आकार

अगदी २००० चं शतक किंवा सहस्त्रक म्हणा, ते सुरु होईपर्यंत घर म्हणलं की घरात आजी- आजोबा, आई-वडील, एक नाहीच दोन मुलं, असं घर असायचं. घरं फार मोठी नव्हती. सध्याच्या 'बीएचके'च्या भाषेत बोलायचं तर वन रूम किचन जास्त, त्यानंतर वन बेडरूम हॉल किचन. २ बेडरूम म्हणजे ती व्यक्ती श्रीमंतच म्हणायची. मुलांची वेगळी रूम, त्यांची 'स्पेस' या संकल्पनाच अस्तित्वात नव्हत्या. मुलांची म्हणजे 'स्पेस' चाळ असेल तर त्याचा मोठ्ठा व्हरांडा, अंगण आणि बिल्डिंग असेल तर त्याचं अंगण आणि त्याच्या समोरचा रस्ता (जो मोकळा असायचा आणि कितीही खेळलं तरी कुठल्याही ट्रॅफिकला

अडथळा व्हायचा नाही). दुपारच्या वेळेस मुलं शाळेत गेली असली किंवा सुट्टीत कुठेतरी बागडत असली की मजल्यावरच्या बायका कोणाच्यातरी घरात थोडावेळ एकत्र जमून, छोटी मोठी कामं करत किंवा एकमेकींना कधी पापड लाटायला मदत कर किंवा गहू निवडायला मदत कर, असं करत बसलेल्या असायच्या. तीच त्या बायकांची 'स्पेस' आणि घरातील म्हाताऱ्या व्यक्तींना स्पेस म्हणजे त्यांचं देऊळ.

डायनिंग टेबल जवळपास नसायचंच आणि असलं तरी त्यावर पसारा जास्त. पण टेबल असो किंवा नसो सगळे एकत्र जेवायचे. मी माझ्या रूममध्ये जेवतोय. किंवा माझी ऑर्डर अजून यायची आहे असल्या भानगडी नव्हत्या. घरात फोन असेल तर तो एकच होता, घराचा एकच टीव्ही होता त्यामुळे एकच दूरदर्शन चॅनेल संपूर्ण घर बघायचं.

२००० ला फक्त सहस्त्रक बदललं असं नाही, तर जगण्याची मूल्य बदलली आणि संदर्भपण. एक नवीन पिढी जी चाळीस आणि त्याच्या पुढच्या वयोगटात आहे. ती शिक्षण संपवून नोकरी व्यवसायाला लागली. ज्याला आपण न्यू इकॉनॉमी म्हणतो अशा पूर्ण वेगळ्या क्षेत्रांत ती कामाला लागली. मग ती माध्यमं असोत, आयटी क्षेत्र असेल, खाजगी बँका असतील, पंचतारांकित हॉटेल्स असतील किंवा अजून काही. या वर्गाचा पहिला पगार हा अनेकवेळा वडिलांच्या शेवटच्या पगाराएवढा होता. या पिढीकडे पैसे यायला लागले नाही तर पैसे कसे खर्च करायचे हे त्यांना सांगणारी एक शक्तिशाली मार्केटींग यंत्रणा पण उदयाला आली. गृहकर्जाचे व्याजाचे दर १६% वरून ८% वर आले. आणि यातून तुम्हाला तुमची स्पेस का असू नये हे हळूहळू बिंबवायला सुरुवात झाली. २बीएचके घर, शक्य असेल तर आई वडिलांचं वेगळं घर आणि नुकतंच लग्न झालेल्या जोडप्याचं घर हे सार्वत्रिक व्हायला सुरुवात झाली. या नव्या घरात मुलांची वेगळी रूम, २ टीव्ही आले. तोपर्यंत दूरदर्शनच्या २ चॅनेल्सची जागा किमान ७००, ८०० खाजगी चॅनेल्सनी घेतली. घराखाली गाडी आली. गाडी आहे म्हणल्यावर ती बाहेर काढून सर्वत्र फिरणं आलं. पाय हे चालण्यासाठी नाहीत तर ब्रेक आणि क्लच दाबण्यासाठी आहेत हे देखील सर्वमान्य झालं. या सगळ्यात कुटुंब व्यवस्था पार बदलली. असं म्हणतात एक पिढी म्हणजे जवळपास २० ते २५ वर्षांचा काळ. साधारपणे २५ वर्षांनी बदल होणारच असं सगळेच मान्य करत. पण गेल्या २५ वर्षात दर दशकात बदल व्हायला लागलेत. आणि ते बघून आधीच्या पिढ्या खूपच अस्वस्थ होऊ लागल्यात. मागच्या शतकात प्रत्येक पिढीचं एक व्यवच्छेदक लक्षण होतं ते म्हणजे जमेल तितके पैसे भविष्याची तरतूद म्हणून साठवून ठेवायचे. पगार तसे तुटपुंजे असायचे त्यामुळे त्यातून घर घेणं शक्य व्हायचं असं नाही. त्यामुळे कुठल्यातरी भाडेतत्वावरच्या घरात शिरलं की आहे ते कुटुंब कधी एक पिढी कधी दोन पिढी पण तिथेच रहायचं.

२००० ला वर म्हणलं तसं स्वतःच घर ही कल्पना रुजायला सुरुवात झाली. उत्पन्न वाढलं होतं, आकांक्षा पण वाढल्या होत्या. आई वडिलांच्या पिढीसारखं काटकसरीत जगायचं नव्हतं पण घराचे हप्ते, वेळेत लग्न करून मुलांची शिक्षणं हे सगळं दिसत होतं. आणि हे करताना कधी गाडी घ्यावी, कधीतरी महाबळेश्वर ते सिमला ते दुबई असं प्रवासाचं प्रमोशन व्हावं यासाठी धडपड सुरु होती. पण हे करताना सुद्धा जरी अनेकवेळा घर वेगळी झाली असली तरी एकत्र कुटुंबाच्या आठवणी आणि त्यातले इमोशनल धागे कायम होते. मित्र, मैत्रिणी आहेत पण सख्खी, चुलत, मावज, आत्ये भावंडं पण हवीत आणि त्यांची वार्षिक गेट टुगेदर पण हवीतच. पूर्वी प्रत्येक सणावाराला एकत्र जमणारे वर्षातून एकदा भेटलंच पाहिजे याच्या आणाभाका घ्यायला लागले होते.

आणि बघता बघता नव्या शतकातील एक दशक उलटलं. आणि खऱ्या अर्थाने जेन झी (१९९७ ते २०१२) या काळात जन्माला आलेल्या मुला-मुलींचा काळ सुरु झाला. 'स्पेस हवी' ही इच्छा पूर्ण झालीच तर ठीक, नाहीतर बघू कधीतरी ते 'स्पेस हवीच' ही टोकदार मागणी असा प्रवास सुरु झाला. महाराष्ट्र असो की भारतातील कुठल्याही राज्यातील मध्यमवर्ग असो, या जनरेशनमधील मुला-मुलींना त्यांचं गाव, शहर सोडून किंवा शक्य झालं तर देश सोडून सुद्धा राहण्याची तीव्र गरज वाटायला लागली. कधी शिक्षण तर कधी नोकरी पण या निमित्ताने घराबाहेर पडलंच पाहिजे हे



प्रकर्षाने वाटायला लागण्याच्या काळाला सुरुवात झाली. नातेवाईक आहेत का ? हो आहेत, पण म्हणून नात्यांचं ओझं या पिढीला नकोसं व्हायला लागलं आहे. अमूकतमूकच लग्न आहे किंवा कोणाच्यातरी घरात बारसं आहे किंवा सणावाराला एकमेकांकडे गेलं की भेटी होतात. बरं ठीक आहे, होत असतील पण मला ज्यांच्याशी 'कनेक्टेड' रहायचं आहे त्यांच्याशी मी व्हाट्सअप, फेसबुक इंस्टाग्रामवर आहे की, मग भेटायचं कशाला? Friends are new family ही कल्पना अधिक पटली पण आणि आवडायला पण लागली. एक गोष्ट विसरता येणार नाही की या शतकातील, जगातील सगळ्यात लोकप्रिय टीव्ही मालिका ही 'फ्रेंड्स' आहे. एकाच बिल्डिंगमध्ये पण शब्दशः हाकेच्या अंतरावर राहणारे ६ मित्र मैत्रिणी. बहुतांशवेळा एकत्र असतात, एकत्र जेवतात, सुखदुःख एकमेकांना सांगतात. फ्रेंड्स हेच कुटुंब. त्यात पुन्हा सोशल मीडियाने सगळे संदर्भ बदलले. प्रत्यक्ष न भेटलेल्या किंवा अगदी कधीतरी भेटलेल्यांशी पण संपर्कात राहण्याची किंवा संपर्कात आहोत असं वाटण्याची शक्यता या माध्यमांनी निर्माण केली. पूर्वी घरात एक फोन असायचा, एक टीव्ही असायचा ज्याच्या भोवती सगळे जमायचे. आता ते गेलं. प्रत्येकाच्या हातातील स्किन हा त्याचा स्वतःचा फोन, स्वतःचा टीव्ही, स्वतःचा खाजगी संदेशवाहक, स्वतःचा खाजगी सहाय्यक आणि स्वतःची माहिती आणि व्यवहार गोपनीय ठेवणारा मित्र आला. इंस्टाग्राम वर, फेसबुकवर मित्र मैत्रिणींच्या रिल्स बघितल्या, त्यावर लाईक ठोकला, कॉमेंट टाकली आणि समोरून प्रतिसाद आला, मग ते च्या रूपातील प्रेम असेल मिठी असेल की वाकुल्या दाखवणं असेल, ते मिळालं की झाला संवाद. आतातर एकाच वेळेस प्रत्येकाने आपल्या आवडीचं जेवण मागवून ते व्हिडीओ कॉलवर खात, गप्पा मारत पार्टी करणं याला पार्टी म्हणलं जातं.

थोडक्यात काय तर गेल्या ४० वर्षात सगळेच संदर्भ बदलले. म्हणून हताश व्हायचं का ? तर अजिबात नाही. नवी पिढी पूर्वीसारखी नात्यांची ओझी सोसत नसेल पण त्यांना स्वतःच्या आणि दुसऱ्याच्या मानसिक आरोग्याची काळजी आहे. कॅडबरीच्या जाहिरातीत दाखवलं त्याप्रमाणे, घरात काम करणाऱ्या बाईला एक छान कॅडबरी देऊन, कुछ मिठा हो जाये म्हणणं आवडतं. फक्त आपलं घर, आपली बिल्डिंग इतकं नाही तर आसपासचा परिसर आपला आहे, आपल्या विस्तारित कुटुंबाचा भाग आहे त्यामुळे तो स्वच्छ राहिला पाहिजे यासाठी ते जागरूक आहेत. पर्यावरण हा मुद्दा गंभीर आहे हे त्यांना मान्य आहे आणि त्यासाठी कृती करण्याची तयारी आहे. आयुष्यात नवे अनुभव घ्यायला ते आसुलेले आहेत पण म्हणून घरच्यांवर भार होण्याची इच्छा नाहीये. '**जिंदगी ना मिलेगी दोबारा**' असं यांना मनापासून वाटतं, पण त्यांना जी माणसं हवीहवीशी वाटतात त्यांच्या आयुष्यातील महत्वाचे क्षण त्यांना अजिबात गमवायचे नाहीयेत. पारंपरिक नाती त्यांना मान्य नाहीत, त्यामुळे आपण ज्याला कुटुंब व्यवस्था म्हणतो ती त्यांना मान्य नाही, पण त्यांनी बाहेर एक कुटुंब जोडलं आहे. सो कुटुंब व्यवस्थेची चौकट आणि स्वरूप बदललं आहे इतकंच.

पण या सगळ्या बदलांमध्ये एक प्रश्न उरतोच. तो म्हणजे आधीच्या पिढ्यांचं काय? ज्या पिढीने आयुष्यभर कुटुंब एकत्र ठेवण्यासाठी धडपड केली, स्वतःच्या अनेक इच्छा बाजूला ठेवल्या, मुलांच्या भविष्यासाठी काटकसर केली, त्या पिढीला आजचं बदललेलं कुटुंब समजून घेणं काहीसं अवघड जाणं स्वाभाविक आहे. कारण त्यांच्या दृष्टीने एकत्र राहणं म्हणजे प्रेम, काळजी आणि सुरक्षितता. नव्या पिढीसाठी मात्र एकमेकांना पुरेसं स्वातंत्र्य देणं, हेदेखील प्रेमाचंच एक रूप आहे. या दोन्ही विचारांमध्ये संघर्ष होण्याची गरज नाही.

ज्येष्ठांनीही एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी. मुलांनी आपल्यासारखंच आयुष्य जगावं, आपल्या पद्धतीनेच नाती जपावीत, अशी अपेक्षा ठेवण्यापेक्षा त्यांच्या बदलत्या जगण्याला समजून घेणं अधिक महत्त्वाचं आहे. आणि तरुणांनीही हे विसरता कामा नये की आपल्या स्वातंत्र्याचा पाया अनेकदा आधीच्या पिढीने केलेल्या त्यागावर उभा असतो. मला वाटतं, येणाऱ्या काळात कुटुंबव्यवस्थेची व्याख्या आणखी बदलेल. एकाच घरात राहणारी माणसं म्हणजेच कुटुंब, ही अट कदाचित उरणार नाही. पण आपण अडचणीत असताना ज्यांना हक्काने हाक मारू शकतो आणि ज्यांच्या अडचणीच्या वेळी आपण न बोलावता धावून जातो, ती माणसं आपलं कुटुंब असतील. शेवटी कुटुंब ही केवळ रक्ताच्या नात्याने किंवा एका छताखाली राहण्याने तयार होणारी व्यवस्था नाही. ती एकमेकांच्या आयुष्यात आपलं स्थान निर्माण करण्याची आणि ते जपण्याची व्यवस्था आहे. म्हणूनच बदलत्या कुटुंबव्यवस्थेकडे पाहताना मला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते. पूर्वी माणसांना कुटुंब मिळायचं. आता माणसं स्वतःचं कुटुंब निवडू लागली आहेत.

आणि या निवडलेल्या नात्यांमध्येही प्रेम, विश्वास, आपुलकी आणि जबाबदारी टिकून राहिली, तर कुटुंबव्यवस्था संपणार नाही. ती फक्त नव्या रूपात पुढे जात राहील.

– सुजय पतकी

विनोद



● **डॉक्टर आणि आजोबा:**
डॉक्टर: ''आजोबा, तुम्ही रोज सकाळी चालायला जाता का?''
आजोबा: ''हो डॉक्टर, पण फक्त फ्रीजपर्यंत आणि परत सोफ्यावर!''

● **गोळ्यांचा हिशेब:**
आजी: ''अहो, या गोळ्या कशासाठी?''
आजोबा: ''सकाळची गोळी विसरल्यावर दुपारी काय घ्यायचं ते लक्षात राहावं म्हणून!''



तुटते वाद-संवाद

''अवधूत पुरंदरे, उठलात ना, आवरलं का सकाळचं? चहा ठेवते आहे म्हणून विचारलं''

''अश्विनीताई, अहो दसरा फक्त तुमचा नाही आहे,आमचा पण आहे,काल नाही का फुलं वगैरे आणली, आता चहा झाला की तोरण वगैरे घेतो करायला, साफसफाई पण करेन''

''हो-हो, माहिती आहे,मी आपली मजा केली''.

''तू मजा केलीस ते कळलं, पण आज दसरा फक्त आपलाच उजाडला आहे वाटते, या बाजूला अजून मध्यरात्रच दिसते आहे'' डायनिंगच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या ओजस आरूषीच्या बेडरूमकडे बघत मोठ्याने अवधूत बोलले.

अश्विनी लगेच म्हणाली, ''अरे,तुला माहिती आहे ना,दोघे उशिरा येतात, काल पण उशीरा आले, किती मिटींग्ज होत्या काल ओजसच्या, घरी आल्यावर पण चालूच होत्या, आरूषीला पण उशीर झाला क्लायंट मिटींग लांबल्यामुळे, उठतील थोड्या वेळात''.

अवधूत लगेच म्हणाला ''तू घेणारच तुझ्या लाडक्याची बाजू, घाल त्याला पाठीशी कायम! मी काय काही चुकीचं म्हणतोय का?

सणासुदीला उठले लवकर तर काय डोंगर कोसळणार आहे का?'' असं बोलत फ्रिजमधून झेंडूची फुले वगैरे धसकन काढायला गेले तर सगळी सांडली,खोलीभर पसरली.

अश्विनी,''अरे हळू जरा,मुलावरचा राग फुलांवर का काढतो आहेस?''

अवधूत,'' ती रूम बंद बघून खरंतर तिळपापड होतोय नुसता,पण लोकांना झोपा आवरत नाहीत''असं जोरजोरात म्हणायला लागला,मोठ्याने बरंच काही बोलला,मागच्या चुका काढल्या ओजसच्या!!

ही सगळी चिडचिड ऐकून ओजस डोळे चोळत बाहेर आला, ''मम्मा,बाबा काय आरडाओरडा करताय,झोपू द्या की,साडेबाराला मिटींग झाली,झोपायला दोन वाजले,जाम झोप येत्ये आम्हाला,''

''बघितलंस अश्विनी, यांना काही पडलेलं नाही दसऱ्याचं, दुपारी श्रीखंड चापूनचोपून मात्र खातील नि परत झोपतील, मम्मा बाबा आहेतच सगळं करायला, चार वर्ष झाली लग्नाला, पण दोघांनाही कसली जाणीवच नाही जबाबदारीची, साडेबाराला मिटींग झाली तर दोन पर्यंत बसला असशील वेबसिरीज बघत, काही पडलेलंच नाही तुम्हाला''.

''बाबा, यार काय सकाळी सकाळी चिडचिड करतो आहेस? माहित्ये दसरा आहे, लहानपणी मी, मम्मा, आजी, आबाच असायचो कितीतरी सणांना घरात. तू कुठे असायचास? सारखा भटकत असायचास ऑफिसच्या कामासाठी!!''

''मग एवढी मेहनत केली म्हणून एवढे गाडीघोडे, मोठे प्लॅट्स झाले, एवढं तुझं शिक्षण झालं, आता स्वत:ची चूक झाकायला माझी फिरती काढतोस, नालायका,'' असं म्हणत टेबलावरचं भांड फेकणार तोच अश्विनी ताई मधे त्यांना अडवत पडल्या'' दोघांनी एकदम शांत व्हा, तू रे ओजस आता या आवरून पटकन, सणाच्या आनंदावर असं विरजण नका घालू''.

हल्ली हे सतत चालायचं, बापलेकामधे सतत वाद व्हायचे, खरंतर अश्विनी, आरूषी सासू सून, पण दोघींचे गूळपीठ नाही तरी समजूतीचे संबंध होते. अश्विनीताई निवृत्त झाल्यानंतर एका सामाजिक संस्थेसाठी काम करायच्या, रोज काही तास स्वत:च्या सोयीने जायच्या, आरूषीच्या वेळापत्रकाप्रमाणे ॲडजस्ट करायच्या, ती पण मग त्यांना गरज असेल तेव्हा आरूषी पण ॲडजस्ट करायची. पण अवधूत आणि ओजसचं मात्र विळ्याभोपळ्याचं सख्यं होतं, घरात असला ओजस की सतत वाद, भांडणं ठरलेली! ओजसची सुट्टी म्हटली की अश्विनीला तर धडधडायलाच लागायचं!! नको ती सुट्टी,असं व्हायचं!

त्या दिवशी अवधूत गेले होते, ऑफिस ग्रूपच्या गेटटुगेदरला, ओजस गेला होता शाळा ग्रूपच्या पिकनिकला. तेव्हा अश्विनी, आरूषी दोघीच घरी होत्या. अश्विनी मस्त आवडीचं पुस्तक वाचत होती नि आरूषी आत डान्सचा रियाझ करत होती. घरात छान शांत वातावरण होते. त्याचवेळी अवधूत,अश्विनीचा खास मित्र केदार घरी आला. केदार एका प्रख्यात महाविद्यालयातून मानसशास्त्राचा विभागप्रमुख म्हणून निवृत्त झाला होता. लग्नानंतर लगेचच पत्नीचे अचानक अपघाती निधन झाल्यानंतर त्याने पुन्हा लग्न केले नव्हते. भावाबरोबरच रहात होता.

''अरे वा,आज सुट्टीच्या दिवशी घरात भांड्यांना पण सुट्टी दिसत्ये. एकमेकांना लागण्याचे आवाज नाही आहेत. एकदम शांतता नांदत्ये घरात''.

''हो ना, दोघेही वादक घरी नाही आहेत, परवाच झालंय दसर्याच्या दिवशी सकाळीच कडाक्याचं भांडण! दोघांना पटतच नाही एकमेकांच, मधल्यामधे पंचाईत आम्हा दोघींची होते, लग्नाआधी मी एकटी सापडायचे, आता निदान दोघी असतो एकमेकींना''.

''हाय काका, कधी आलात?'' तेवढ्यात बाहेर आलेल्या आरूषीने विचारले,'' काय घेणार, चहा, कॉफी की सरबत?''.

''काहीही चालेल अगं, नंतर दे,गप्पा मारू या आधी, बस. मी म्हणतच होतो, अगदी छान शांतता पाणी भरत्ये आज घरात!!''

''हो मग,दोघे हिरो बाहेर आहेत ना. त्यामुळे आज क्लायमॅक्स नाही जोक्स अपार्ट काका पण आम्हा दोघींना कंटाळा आलाय याचा, माझ्या नि ओजसच्या मॅरिड लाईफवर पण परिणाम होतोय, भांडण होतं यांच नि त्यावर मी काही बोलत नाही म्हणून आत माझ्यावर पण चिडचिड करतो ओजस'' आरूषीने आपली व्यथा

व्यक्त केली.

''मी यांना स्पष्ट सांगितलंय की तुमच्या वादात मला खेचायचं नाही, मी मधे पडणार नाही, त्याचा राग माझ्यावर काढायचा नाही, पण मग राग वस्तूंवर काढतात, किंवा उगाच मोठ्याने यूट्यूब व्हिडीओ लावून माझी झोप घालवतात,शेवटी त्रास होतोच केदार मला पण! तू मानसशास्त्राचा प्राध्यापक, काही सांग तुझ्या मित्राला. मला भीती वाटत्ये की कधीतरी संतापाच्या भरात हा ओजसला हाकलून देईल, बेदखल करेल वगैरे'' अश्विनीने व्यथा सांगत मनातली भीती पण व्यक्त केली!

'' तुम्ही दोघी पण अफेक्ट होत आहात, किंवा अश्विनी तुझी भीती पण अनाठायी नाही.मी बोललो आहे ना अनेक वेळा याबद्दल त्याच्याशी. पण त्याचा हेका हाच की ओजस पहिल्यासारखा राहिला नाही, लहान वयात करिअरमधे उंची गाठल्यामुळे शेफारला आहे. ओजसशी पण एकदा तो बाहेर भेटला होता तेव्हा बोललो तर म्हणतो की बाबाने स्वत: ज्या गोष्टी केल्या नाहीत त्याची माझ्यावर सक्ती करतोय, स्वत: सगळं स्वातंत्र्य उपभोगलं न् मला मात्र जबरदस्ती करतोय, मला सगळी मतं त्याची पटतपण नाहीत तर का मी ऐकायचं, हिटलरगिरी करतोय वगैरे'' केदारने सांगितले.

''मग काका तुला काय वाटतं,का होतंय हे, थांबणार कधी हे?''आरूषीने विचारले.

''खरंतर दोघे बापबेटे काहीबाबतीत एका माळेचे मणी आहेत, दोघेही तापट, हट्टी आहेत, त्यामुळे वादच होतात, संवाद होत नाही. दोघांचे अहं आड येतात. दुसरं असं की ओजसचं खूप बिझी होणं नि अवधूतचं रिकामं होणं असं एकाच वेळी झालंय, त्यामुळे अवधूतला आपलं वर्चस्व,सत्ता जायची भीती आहे व त्यातून अधिक हेकट होतोय, त्यामुळे सत्ता ज्याची येऊ घातल्ये त्याला तो दुखावतोय व ओजसच्या शेपटीवर पाय दिल्यामुळे तो फुत्कारतोय. आपल्याकडे म्हण आहे, चार दिवस सासूचे,चार दिवस सुनेचे, फक्त इथे बापलेक आहेत, पण एरवी सासू वागावी तसा बाप वागतोय मुलाबरोबर! कुठच्याही दोन पिढ्या एकत्र नांदताना हे होऊ शकतं.वर्चस्वाच्या आसक्तीतून होतं हे, त्यामुळे अपेक्षेच्या ट्रॅकऐवजी मागणीचा मार्ग पकडला जातो व त्यातून हे इरेला पेटल्यासारखं होतं,संताप नि वितंडवाद होतो! आणि ओजस पण हे समजून घेत नाही की आपण प्रत्येक वेळी अरे ला कारे केलंच पाहिजे असं नाही, काही वेळा गप्प बसावं, समोरच्यानेच थांबलं पाहिजे हा अट्टाहास तो करतो व प्रकरण चिघळते. तरी तुमच्याकडे बरी परिस्थिती आहे.

आज दोन पिढ्यांमधला संवाद ही महत्वाची समस्या बनत चालली आहे. वाद तरी बरा,म्हणजे चुकीच्या पद्धतीने होत असलं तरी बोलणं तरी होतंय, अनेक घरात सगळे फक्त एका छताखाली रहात आहेत, पण कामापुरतं सोडून बोलणंच होत नाही, सगळे आपल्या कामात नाहीतर मोबाईलच्या जगात. आजी आजोबा यूट्यूबवर, आई बाबा फेसबुक वा वेबसिरीज तर मुलं इन्स्टा किंवा स्नॅपचॅट. लिहून बोलणं, इमोजीतून बोलणं. इमोजीचे अर्थ पिढीनुसार वेगळे, मग कळणार कशी भाषा, समोरासमोर वा जवळ बसून संवादातून जे सकारात्मक हॉर्मोन्स स्त्रवतात ते होतच नाही!! संवाद म्हणजे समपातळीवर जाऊन,एकमेकांना समजून केलेले बोलणे! असंवादात वा मूकसंवादात ते होतच नाही तर वाद,विसंवादात क्रोध, अपमान, मारामारी इथपर्यंत प्रवास होतो जो पण अयोग्य!! आपल्याला इथे विसंवादातून फक्त वि काढायचा आहे,वि म्हणजे विचार न करता केलेला संवाद, तिथे योग्या विचार घालायचा आहे!!''

''पण करायचं कसं हे?''अश्विनीने विचारलं.

''बदल घडवायला दोघेही जण तयार हवे, दोघेही तयार असतील तर छान बदल होईल. पण माझ्या अभ्यासाप्रमाणे अवधूत काही तयार होणार नाही, ओजस झाला तर निदान त्याने काय, कुठे बदलायला हवे ते सांगता येईल'' केदार म्हणाला.

''चालेल काका, मी नि आई मिळून ओजसशी तरी बोलून बघतो आणि मग कळवतो तुम्हाला''आरूषी म्हणाली.

त्याप्रमाणे बोलणं झाल्यावर ओजस केदारकाकाला भेटायला त्याच्या घरी गेला, दार उघडंच होतं व काका मोठ्याने मनाचे श्लोक म्हणत होता,

नको रे मना क्रोध हा खेदकारी।
नको रे मना काम नाना विकारी।।

नको रे मदा सर्वदा अंगिकारू।
नको रे मना मत्सरू दंभ भारू।।६।।
मना श्रेष्ठ धारिष्ट्य जीवी धरावे।
मना बोलणे नीच सोशीत जावे।।
स्वये सर्वदा नम्र वाचे वदावे।
मना सर्व लोकांसि रे निववावे।।७।।
वाचता वाचता तो ११०व्या श्लोकापर्यंत पोचला,
तुटे वाद संवाद त्याते म्हणावे।
विवेके अहंभाव याते जिणावे।।
अहंतागुणे वाद नाना विकारी।
तुटे वाद संवाद तो हितकारी।।११०।।

आणि केदार तिथेच थांबला कारण खूप वेळ गेला असता अजून ९५ श्लोक वाचेपर्यंत,ओजस केव्हाचा बसला होता. पण हे वरचे दोन श्लोक त्याने मुद्दाम मोठ्याने म्हटले होते. त्यावरूनच त्याने ओजसला समजावले की समोरचा संतापलेला असताना काही वेळा त्या वेळेपुरतं गप्प रहाणं आवश्यक असतं. त्यासाठी म्हणजे आपला राग आवरून धरायला खूप धीराने घ्यावे लागते. अनेकदा आपला अहं दुखावला जातो, त्यामुळे आपण आणखी फणा काढतो, त्यामुळे वाद विकोपाला जातो. तुमच्या मधे तसेच काहीसे होत आहे. तुझ्या पिढीच्या बाजूने अवधूत विचार करत नाही आहे तर तू त्याच्या बाजूने! दोघेही फक्त एकमेकांच्या शेपटावर पाय ठेवता! तुझं बिझी होणं नि त्याचं रिकामं होणं एकाच वेळी घडलं व त्या न्यूनगंडातून आपलं वर्चस्व जाऊ नये यासाठी त्याचा आटापिटा! एरवी जो सासू सुनेत असतो तोच तुमच्या घरात बापलेकात होतोय.पण ना तू समजून घेत,ना तो. तो घेणार नाही हे मला माहिती आहे पण तुला भविष्यकाळ आहे, या सर्वाचा तुमच्या वैवाहीक संबंधांवर पण परिणाम होतोय तर तू शहाणीव दाखवावीस असं मला वाटतंय.तुझ्या आईला पण त्रास होतोच आहे. वाद विकोपाला जायला लागतोय असं दिसलं की थांबायला शिक,तो बडबडत राहिला तरी. अवघड आहे पण अशक्य नाही.त्यावेळी फक्त आई, आरूषीकडे बघ म्हणजे जमेल.असं जमायला लागलं की मग कधीतरी अवधूत चांगल्या मूडमधे असताना बोल त्याच्याशी,विचार त्याला की का एवढा राग येतो



त्याला तुझा ते. त्यातूनच वातावरण सुधारायला मदत होईल!''

''काका,तू सांगतोस तेवढ सोपं नाही आहे पण ट्राय केलं तर अशक्य पण नसणार. मी करतो पूर्ण प्रयत्न!'' ओजसने काकाच्या हातावर हात ठेवत सांगितले.

काही महिन्यांनंतर अश्विनीने केदारना फोन करून सांगितले,''ओजसने तू सांगितल्याप्रमाणे बदल केला स्वत:त, बाबाशी पण बोलला, बाबा पण बोलला मोकळेपणाने, त्यानंतर खूपच शांतता आहेच आणि आता आनंदाची बातमी पण आहे, ओजस आरूषीकडे!!''

केदार म्हणाला,'' वा अभिनंदन तुमचे सर्वांचे! पण तरी संवाद शैलीतले बदल चालूच ठेवायला सांगा ओजसला. अखंड सावधान रहाणे केव्हाही इष्ट!!''

– डॉ अद्वैत पाध्ये
मानसोपचार तज्ज्ञ, डोंबिवली.

ज्येष्ठत्व : कर्तृत्वाचा नवा अध्याय



वय वाढते तसा माणसाच्या आयुष्याचा वेग कदाचित मंदावतो; पण त्याच्या अनुभवांची समृद्धी वाढत जाते. आयुष्याच्या प्रदीर्घ प्रवासात अनेक चढउतार अनुभवलेली ज्येष्ठ मंडळी ही समाजाची खरी संपत्ती असतात. त्यांच्या अनुभवात जीवनाचे शहाणपण असते, त्यांच्या आठवणींत इतिहास दडलेला असतो आणि त्यांच्या विचारांत पुढील पिढीला दिशा देण्याचे सामर्थ्य असते. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांकडे केवळ काळजी घेण्याची गरज असलेला घटक म्हणून न पाहता, समाजाच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणारी अनुभवी शक्ती म्हणून पाहणे आवश्यक आहे.

वयाची साठी ओलांडल्यानंतरही अनेक व्यक्तींनी आपले कार्य केवळ सुरूच ठेवले नाही, तर आयुष्याच्या उत्तरार्धात समाजाला नवी दिशा देणारे भरीव योगदान दिले. आपल्या आजूबाजूला असंख्य उदाहरणं आहेत.

हा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन ज्येष्ठत्वाकडे वाटचाल करणाऱ्या साऱ्यांनीच पाऊलवाट म्हणून पाहिले पाहिजे.

कुष्ठरुग्णांचे पुनर्वसन, वंचितांचे सक्षमीकरण आणि राष्ट्रीय एकात्मता यांसाठी बाबा आमटे यांनी आयुष्यभर कार्य केले. वयाच्या ७२व्या वर्षी, १९८५ मध्ये त्यांनी कन्याकुमारी ते काश्मीर अशी भारत जोडो यात्रा काढली. साठीनंतरच्या सक्रिय सामाजिक योगदानाचे हे ठळक उदाहरण आहे. स्वयंरोजगार करणाऱ्या महिलांना संघटित करून त्यांना आर्थिक स्वावलंबन मिळवून देण्यासाठी इला भट यांनी सेवा (SEWA) ही संस्था स्थापन केली. साठीनंतरही त्या महिला सक्षमीकरण, गांधीवादी विचार आणि जागतिक स्तरावरील सामाजिक प्रश्नांवर कार्यरत राहिल्या. आमटे कुटुंबाची पुढची पिढी, अभय बंग, राणी बंग, सिंधूताई सपकाळ किती उदाहरणे द्यावीत.

जयपूर फूटच्या माध्यमातून कृत्रिम अवयव आणि पुनर्वसन सेवा गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचवण्याच्या कार्याला डी. आर. मेहता यांनी संस्थात्मक स्वरूप दिले. प्रशासनातील अनुभवाचा उपयोग मोठ्या प्रम णावर सामाजिक मदतीसाठी करण्याचे हे उदाहरण आहे. वयाच्या साठीनंतरही बालमजुरी, बालशोषण आणि बालतस्करीविरोधातील कैलाश सत्यार्थी यांचा लढा सुरू राहिला. २०१४ मध्ये वयाच्या ६०व्या वर्षी त्यांना नोबेल शांतता पुरस्कार मिळाला. जेन गुडॉल ह्या नव्वदीतही वन्यजीव संरक्षण, पर्यावरण संवर्धन आणि युवकांमध्ये निसर्गप्रेम जागवण्याच्या कार्यासाठी जगभर प्रेरणा देत राहिल्या.



साहित्य, मनोरंजन क्षेत्रातील कितीतरी नामवंत कलाकार आपल्याला सतत ऊर्जा देत असतात. ताजं उदाहरण म्हणजे अमिताभ बच्चन. आजही ११ ऑक्टोबरला वयाच्या ८४ व्या वर्षीही 'अँग्री यंग मॅन' यांचा वाढदिवस असंच म्हटलं जातं, इतक्या उत्साहाने ते वावरत असतात. **'वय ही केवळ संख्या आहे; कर्तृत्वाला वयाची मर्यादा नसते'**. हे प्रकर्षाने जाणवते.

साठीनंतरचे आयुष्य म्हणजे केवळ विश्रांतीचे पर्व नव्हे; ते अनुभवाच्या भांडवलातून समाजाला काही देण्याचे पर्वही असू शकते. नोकरीतून निवृत्ती मिळाली, तरी कर्तृत्वातून निवृत्त होण्याची आवश्यकता नाही. उलट, आयुष्यभर कमावलेले ज्ञान, कौशल्य, अनुभव आणि माणसांशी जोडलेली नाती यांचा उपयोग समाजासाठी करण्याची हीच योग्य वेळ असते. आपल्याला मिळालेलं जीवन हीच एक कमाई आहे. तेव्हा त्याचा अर्थपूर्ण विनियोग व्हावा. महाभारतात म्हटले आहे, ज्या सभेत वृद्ध नाहीत ती सभाच न्हवे. सम्राट अशोक यांनी तर वयोवृद्धांच्या पालनाचे उत्तरदायित्व धार्मिक अधिकाऱ्यांवर टाकले होते. एवढे वृद्धांचे महात्म्य आहे. भगवान बुद्धांनी एके ठिकाणी म्हटले आहे की अरण्याची शोभा ध्यानावस्थेत बसलेल्या भिक्षूंमुळे आहे. तद्वतच समाजाची शोभा ज्येष्ठांच्या अस्तित्वामुळेच वाढते. ज्येष्ठ म्हणजे निर्माल्य नसून निर्माता आहे. त्यांच्या सुरकुत्यांवर अनुभवांचा ग्रंथ लिहिलेला असतो. मधाचा गोडवा बाटलीच्या तळाशी जास्त साठतो तसे त्यांचे परिपक्व जीवन असते.

ज्येष्ठांकडे पाहण्याचा हा दृष्टिकोण जितका महत्त्वाचा तितका ज्येष्ठांचाही समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोण प्रगल्भ असला पाहिजे.

दिवेलागण झाली की
आठवणींना पूर येतो
पहाटेपर्यंत समुद्र कोरडाक्षार होतो

हे वास्तव असले तरी निराशेचा सूर न काढता सकारात्मक विचार करत कार्यरत राहिलं पाहिजे. कौटुंबिक पातळीवर विचार केला तर आपल्या

मुलांमध्ये स्वतंत्र दृष्टिकोण कसा तयार करता येईल याबाबत आस्थेने मार्गदर्शन करावे. नव्या पिढीला बरोबर घेऊन आपल्यातही काही बदल करावेत. आपले नियम मुलांवर सतत लादू नये. ज्येष्ठ स्त्री पुरुष यांनी आपल्याला जमेल, झेपेल तेवढी घरात जरूर मदत करावी. नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने काही छंद राहिले असतील तर जरूर जोपासावेत. आपल्याकडे एखादी कला असेल तर इतरांना शिकवावी. कुटुंबात सुसंवाद राहावा यासाठी प्रयत्न करावेत.

आपली सोसायटी, आजूबाजूचा परिसर असेल तिथे सांस्कृतिक कार्य करणाऱ्या संस्थांच्या कार्यक्रम ात सहभाग घ्यावा. नव्या पिढीला भारतीय संस्कृतीची ओळख करून देण्याच्या दृष्टीने आयोजन करावे. सेवाभावी संस्थांमध्ये स्वयंसेवक म्हणूनही योगदान देता येईल. पर्यावरण, स्वच्छता, आरोग्य याविषयीही उपयोगी माहिती देऊन महापालिका, प्रशासन आणि सामान्य नागरिक यांच्यातील दुवा बनून नक्कीच प्रभावी काम करता येईल. आपल्यात अजून काय करता येईल ह्याचा शोध घेऊन आपली बुद्धी, कार्यशक्ती कामाला लावली पाहिजे आणि ह्याचा शोध ज्याने त्याने आपला आपण घेतला पाहिजे. यासाठी ज्येष्ठांच्या अनुभवाला तरुणांच्या ऊर्जेची जोड मिळाली, तर समाजविकासाची प्रक्रिया अधिक समृद्ध होऊ शकते.

'वयात काय आहे'? असा प्रश्न करून शाहीर विठ्ठल उमप म्हणतात,

ही रात जगण्याचे हे वय अजून आहे
बेहोष नाचण्याचे हे वय अजून आहे
वयमान कितीही झाले
वयात काय आहे?
आनंद फुलविण्याचे
हे वय अजून आहे.

आनंद घेणे व आनंद घेणे हे ज्येष्ठांनी आपले कर्तव्यकर्म मानावे. त्याचबरोबर शिरीष पै म्हणतात त्याप्रमाणे,

आता वय खूप झालंय
सुंदर पाऊस बघताना आजचा
वाटतं नसेल ना शेवटचा?

अशी हुरहूर आयुष्याच्या संध्याकाळी काहींच्या मनात डोकावणे साहजिकच आहे. पण उमेद सोडून चालत नाही. आपल्याला मिळालेले जीवन हीच एक कमाई आहे. तेव्हा त्याचा अर्थपूर्ण विनियोग व्हावा. ज्येष्ठांनी काट्यासारखे न बोचता फुलासारखे प्रिय वर्तन ठेवावे. आपले म्हणणे तरुणांवर लादू नये. या वयातही आपण कुटुंबासाठी आणि समाजासाठी कसे उपयुक्त राहू याचा विचार केला पाहिजे. नवीन पिढीसाठी त्यांनी चार्जरचे काम केले पाहिजे. त्यांच्या पद्धतीने त्यांना काम करू द्यावे, त्यात हस्तक्षेप करू नये. मानवतेच्या दृष्टिकोनातून विचारल्यासच सल्ला द्यावा. मार्गदर्शन करावे पण अट्टाहास असू नये.

समाजाची प्रगती केवळ तरुणांच्या कर्तृत्वावर अवलंबून नसते; त्या प्रगतीला अनुभवाची जोड देणाऱ्या ज्येष्ठांच्या योगदानावरही ती अवलंबून असते. ज्येष्ठांचे ज्ञान, तरुणांची ऊर्जा आणि समाजाची संवेदनशीलता यांचा संगम घडला, तर अधिक सुसंस्कृत, सहृदय आणि समृद्ध समाजाची निर्मिती होऊ शकते. ज्येष्ठांना सन्मान देणे ही केवळ कृतज्ञतेची भावना नसून समाजाच्या उज्ज्वल भविष्यामध्ये केलेली गुंतवणूक आहे.

ज्येष्ठत्वाचा उंबरठा ओढण्याआधी आयुष्य कृतार्थपणे व्यतीत केलेले आहे. प्रपंचासाठी म ुलाबाळांसाठी आणि घरासाठीही! आता थोडे थोडे कशाला, पूर्णपणे आपले आपल्यासाठी जगायला शिका. अगदी आनंदाने,उत्साहाने भरभरून जगायला शिका. प्रवास आहेच आणि तो करायचाच आहे पण तरीही मध्ये मध्ये थकवा घालवायला सावलीच्या जागा आपल्याजवळ असायला हव्यात. जिथे सारा भार उतरून क्षणभर हसता येईल आणि पुन्हा निग्रहाने भवसागर पार करता येईल. 'जेष्ठत्व' या शब्दाभोवती अनुभवांचं कोंदण आहे. '**मला वृद्ध होण्यासाठी वेळच नाही**' असा सकारात्मक मंत्र सुखाची आणि आनंदाची गुरुकिल्ली ठरेल! सांजवेळ सुखाची ठरेल.

– प्रतिष्ठा कुलकर्णी–सोनटक्के,
ठाणे.
७०३०६१६६२२



तरुण, तारुण्य आणि आवण

खूप दिवसांनी भेटतोय आपण पण काय करणार माझे लिखाण आणि मला मिळणाऱ्या अनेक सूचना ह्यात माझ्या विचारांचे चक्र जरा ढिले पडले आणि मी शांत बसले. पण असे काही परत घडले की मी आणि माझ्या अस्वस्थ झालेल्या विचारांना नाही थोपवू शकले, त्यांना मोकळी वाट करून द्यावी लागली.

माझ्या लाडक्या सोशल मीडियाने मला जाणीव करून दिली शांत बसू नको, अन सभोवताली घडत असलेले सहन करू नको, सुजाण नागरिक असल्याचे पुरावे द्यावे लागणे ह्या सारखे वाईट दुसरे काहीच नाही. कारण मग आपण, आपल्याच पुरतं जगतो, आत्मकेंद्रीत होऊन हे वारंवार सिद्ध होत रहातं, तेच नकोय मला. एक हेतू एक साध्य, निदान माझ्या सोबतच्या चार दोन लोकांचे भले व्हावे हीच सद्भावना त्या मागे.

का वारंवार पॅरेंटिंग हा विषय ऐरणीवर येतो? कुठे कमी पडतोय आपण पालक? मुलांवर नको इतका अपेक्षांचा बोजा टाकातोय का आपण? असं

काय आहे जे आपण देऊ शकत नाही मुलांना? की इतकं जास्त देतोय जे पेलवत नाहीय मुलांना?

विचारांचा गुंता न उकलण्या सारखा आहे, जाणाऱ्यानी परिस्थिती पुढे हतबल होऊन जीवनाला मृत्यूचं दान मागायचं आणि मागे उरलेल्यांनी त्यांच्या असफल ठरलेल्या जीवनाला दोष देत जगत राहायचं! काय आहे हे? ह्याच लेकरांसाठी नवस बोललेले, रात्र रात्र जागरणं केलेले, उन्हातान्हात त्यांच्या सुखसोईसाठी वणवण केलेले हेच का आपण? कुठल्याही प्रश्नचा जाब न विचारता फक्त आईपण सोसलेल्या ह्याच का आपण आया? ह्यांच्या छोट्या मोठया आजरपणात देवाला पाण्यात ठेवणाऱ्या आपण अश्या कश्या असफल ठरतोय? नऊ महिने गर्भारपणाच्या कळा सोसून तळ हाताच्या फोडा प्रमाणे वाढवलेला हा जीव असा अवेळी आपल्याला सोडून जातो न सांगता न बोलता? का? कश्यासाठी?

उकल न होण्या सारख कोडं आहे की काय? साक्षात परमेश्वर जरी अवतरला तरी कदाचित तो अनुत्तरीत च उरेल अशी भीती वाटायला लागली आहे. माझे स्वप्न, माझे जगणे, माझे श्वास, माझे घर, माझे विश्व, माझे मूलं आहेत, असे प्रत्येकच आईचे असते, जरी ती करिअर वाली असली आणि पूर्णपणे गृहिणी असली तरी, पण मग का वारंवार तिच्या निष्ठेची आणि तिच्या संस्काराची अग्निपरीक्षा द्यावी लागते तिलाच? कोण जबाबदार आहे? कुटुंब? ती स्वतः? समाज? सोशल मीडिया? आजूबाजूचे वातावरण? की आज पर्यंत न उमजलेलं, न समजलेलं, न बघितलेलं हे मानवी मन? सुन्न झालय सगळंच, जिथे मुलांना त्यांच्या विचारांना, कल्पनांना, भावनांना, काहीच वाव नसतो तिथे ती मुलं कशी वाढतात? आणि जिथे घडणारी प्रत्येक गोष्ट त्यांच्या कलाने, विचाराने, होत असते तिथल्या मुलांचा सर्वांगीण विकसित होत असेल का? की तरीही अनाकलनीयच उरतोय आपण पालक?

एका कापडाच्या ताग्यातून अख्ख्या खानदानाला कपडे घालणारी आपली संतुष्ट पिढी मोठी की आपल्या मुलांच्या महागड्या पण आऊट ऑफ फॅशन झालेल्या कपड्यांवर जगणारी असहिष्णू पिढी मोठी?मग ह्यात आपल्या मुलांची वर्णी कुठे लागते हो? सारे सुख हात जोडून पायाशी लोळण घेत असताना आपल्या मुलांना कशाचा तरी नाद लागतो आणि आपण त्यांच्या इच्छा



आकांक्षा पूर्ण करण्याच्या नादात स्वतःच जगणं विसरून त्यांच्या उत्तुंग भरारीला जाणते पणाने गोंजारत कुरवाळत बसतो, अभिमान वाटतो आपल्याला आपण त्यांना हवे ते हवे त्या वेळेला देऊ शकतो, गुर्मी चढते आपल्याला सो कॉल्ड श्रीमंतीची, आणि मग हळू हळू हरवू लागतो तो संवाद, ते आपलेपण, तो एकमेकांबद्दलचा विश्वास, हातात उरतात ते आठवणींच्या कप्प्यात जपलेलं काही क्षण.सारे काही गमावल्यावर आपण खडबडून जागे होणार आहोत की त्या आधीच?

देवा पुढे नतमस्तक होतो आपण कुटुंब व्यवस्था मानतो आपण, गुरूंना मानतो आपण, भविष्यवाल्यांना मानतो आपण, पैश्यापुढे पण झुकतो आपण पण मग हे सगळं करत असताना आपल्या मुलांना जगायला शिकवतो का आपण? त्यांना रेसच्या घोड्यासारखं पळवतो आपण? की मानवता शिकवतो आपण? माझ्या दहा पैकी चार-पाच मैत्रिणींच्या मुली टीनेज मध्ये आहेत, त्यांना त्यांच्या वयाच्या सगळ्या सुलभ भावना आहेत, त्यांना मुलांबरोबर बोलायला आवडतं, त्यांना त्यांचा हलकासा स्पर्शही झालेला आवडतो, मग हातात मोबाईल असेल तर आई वडिलांच्या अपरोक्ष गुलू गुलू चॅटिंग करायला ही आवडतं, त्यातल्या काही सुज्ञ आयांनी चांगल्या वाईटाची कल्पना आधीच दिलेली म्हणून मुली फारश्या गुंतल्या नाहीत कश्यात, पण मग ज्या घरात फक्त धाक आणि धाकच आहे त्या घरांचे चित्र फार केविलवाणे आहे, मुलींच्या डोळ्यात सतत भीती आहे, पण त्याची परिणीती कुतुहलातून भलती कडे जातेय. खूप एक्सपोजर आणि अति धाक /भीती दोनीही घटक घातक ठरताहेत अश्या वेळी, मध्य साधतांना पालकांची ओढाताण होतेय, मुलांची पण होतेय, त्यांच्या डोळ्यासमोर मोहवणारं मायाजाळ आहे, प्रलोभन आहेत, लाखो गॅजेट्स आहेत, मग त्यांनी पाण्यात पडून ओलं न होता बाहेर कसं पडायचं? अंगाला थेंबाचा स्पर्श न होऊ देता कोरडं कसं रहायचं?

इथेच सगळी मेख आहे, त्यांना पोहता आलं पाहिजे ,त्यांना भिजता पण आलं पाहिजे आणि वेळ पडली तर कोरडं पण रहाता आलं पाहिजे, अरे ते काय मशिन्स आहेत, की रोबोज? चांगले काय? वाईट काय ?भलं कश्यात आणि दुष्परिणाम कश्याचे होत आहेत ह्याची जाणीव करून देणारे आपण आई वडील घरातील सदस्य समाज आणि सोशल मीडिया ह्यांचा रोल खूप महत्वपूर्ण आहे असे माझे प्रामाणिक मत आहे, वाईट प्रवृत्तीला चांगल्या विचारांनी मात देता येते आणि काबूत आणता येतं. आणि मग अश्या अनेक मन्मथला बळी पडण्यापासून रोखता येऊ शकतं. मला वाटतं एक पॅरेंट सेल तयार करूया त्यात फक्त आपलीच नाहीतर इतर सगळ्याच वर्गातली मुलं/मुली ना एकत्र आणूया,त्यांच्या इमोशन्स, त्यांचे फिलींग्स, त्यांचे परस्पर मित्र-मैत्रिणींशी असंलेले संबंध, त्यातून निर्माण होणारी मानसिक, शारीरिक गुंतागुंत, त्यांना आपल्याशी बोलायला भाग पाडुया, बोलतं करू, इच्छा, अपेक्षा, जाणून घेण्याचा प्रयत्न करूया, प्रोफेशनलची मदत घेऊया, शास्त्रीय कारणं शोधून त्यावर उपाय करूयात पण आपल्या भविष्याला गर्तेत जाण्यापासून थांबवूया.

माझ्या मुलांचं भलं झालंय मला इतरांशी काय करायचं? त्यांचे काही का होईना मला काय त्याच्याशी देणंघेणं? असे म्हणून आपण आपली जबाबदारी नाही झटकू शकत माझ्या मनावरचा ताण जर माझ्या जवळच्या, दूरच्या, आपल्या, परक्या कुणाशीही बोलून हलका होतोय तर का नको मी पुढाकार घायाला? माझी क्षमता आहे, प्रॉब्लेम हँडल करायची मग का नको मी त्याचे सोल्युशन शोधायला मदत करू?

नुसतं काठावर उभं राहून तर मला पण गोंधळ बघता येतो त्याची मजा पण घेता येते अरे पण माझं मन कुठे तरी खातयं, अपराधी भावना आहे मनात, ती जगू नाही देत शांतपणे म्हणून आणि म्हणूनच मी प्रयत्न करेल अश्या घुसमट होणाऱ्या, अशांत सगळ्यांपर्यंत पोहचण्याचा माझे यत्न आणि तुम्हा सगळ्या सुजाण, सुज्ञ पालकांची साथ हवीय मला ह्या कामात. आपल्या पुढच्या पिढीला समंजस, नवं रसांनी भारलेला एक माणूस म्हणून जगण्याची शिकवण देऊ, बेभान, बेलगाम होऊन जगण्याची परवानगी तर नक्की द्यायची नाही, चला तर मग आपणही पुढाकार घेऊन ह्या समस्यांचे समाधान करून घेऊया...

तुमच्या सहकार्याच्या अपेक्षेत.

– मृणाल देशपांडे
औरंगाबाद, महाराष्ट्र.
९४२३७ ७९५५३



सहजीवनाच्या झुल्यावर

प्रेम, मैत्री आणि सहजीवन ही सुखी संसाराची त्रिसूत्री. ज्याला याचं गणित जमलं ते सदाबहार आयुष्य जगतात. एकदा का ज्येष्ठ नागरिकाचं लेबल लागलं की, खूप सारी बंधनं येतात. काही घरातून, काही डॉक्टरांच्या चातुर्यातून. पण, याकडे दुर्लक्ष करून मित्रांच्या सोबतीने, कुटुंबीयांच्या साथीने छानसं जगता येतं. ज्येष्ठ कट्टे जागोजागी दिसतात. तिथली मैत्री हा प्राणवायू आहे, असं म्हटल्यास ते वावगे ठरू नये.

कट्ट्यावर सगळे जानी दोस्त बसले होते. सकाळचे ८ वाजले होते. गेल्या काही वर्षांपासून त्यांचा हा नियम. उद्यानात दोन तीन फेऱ्या मारायच्या. मग एका बाकावर बसायचं. तेथून सुरू होते गप्पांची मैफल. हं. हं. कुणी गाणंबिणं गात नाहीए. कारण, कुणाचाच गाता गळा नाही. यांचे विषय राजकारणातले. समाजातले. घरादाराचे. त्यातही स्वत:च्या भूतकाळातील आठवणींचा पाऊस पाडायला या सिनिअर सिटीजन मेंबर्सला आवडतं.

ग्रुपने आज ठरवलं काही तरी माइंड गेम खेळूया. तेवढाच चेंज. आयडियाची कल्पना उसळून बाहेर आली. प्रत्येकाने आपल्या कुटुंबात काय आवडतं, काय आवडत नाही, याबद्दल मोकळेपणाने व्यक्त व्हायचं. कुणीही मोबाईलकडे पाहायचं नाही. त्यापेक्षा मोबाइल स्वीच ऑफ करा, असं फर्मान सचिन बांदोडकर यांनी काढलं. मैत्रीत शब्द जीवापाड, आज्ञाधारक मुलांप्रमाणे पाळायचे असतात, असं नामदेव घारे यांचं वचन प्रसिद्ध. मग काय बघता बघता मोबाइलचे तोंड बंद.

'चला देवदत्त पिंगळे तुमच्यापासून सुरुवात करूया,' अशी महेश फणसे यांनी सूचना केली. 'नको नको. माझा नंबर पहिला नको. मी जे सांगेन त्यावर तुम्ही कमेंट कराल. मला चिडवाल. माझा धीर होत नाहीए.'

'अहो, देवदत्त कुणी लंगोट घालून कुस्ती लढा असं म्हणतंय का? नेहमी मागे मागे राहता', नंदू हातिसकर यांनी डिवचलं. त्यावर सगळे खो खो हसत सुटले. (बऱ्याच जणांचे दात पडलेले, कुणाचे किडलेले, काहींचे अधून मधून सोन्याचे, कवळीवाले सफेदी की चमक) त्या सगळ्यांच्या डोळ्यांसमोर लंगोटवाले देवदत्त काही क्षणात 'दत्त' म्हणून दिसू लागले. त्या 'घाऊक' खिदळण्याचा राग देवदत्त यांना आला. धाडस करत ते म्हणाले, 'मीच सांगतो. मला आवडतं बायको सोबत गप्पा मारायला. तिच्या हातचं सुग्रास जेवण खायला. मी घरात कधी दारू प्यायला बसलो की, मुलगा दुसरा पेग भरू देत नाही. आणि भावाची बायको, म्हणजे माझी वहिनी लहान असूनही माझ्या बायकोचा द्वेष करते, हे मला आवडत नाही,' असं देवदत्त यांनी सांगितलं. टाळ्या वाजल्या.

स्वत:हून पुढे येत सुधीर मांजरेकर म्हणाले, 'अगोदर नावडतं सांगतो. नो वांगी. मोठ्याने बोललेलं आवडत नाही. माझा नातू जेव्हा मला एकेरी नावाने हाक मारतो, ते आवडतं. ' सगळे अचंबित. 'झाडांना पानी घालायला आवडतं.' टाळ्या वाजल्या.

प्रदीप भानुशाली विचारात पडले. काय सांगू? त्यांचं हे वागणं ग्रुपला नवं नव्हतं. इतक्यात 'भानुशाली, वर संशोधनाला आलेलो नाही आपण. सांगून टाका पटकन. खोळंबा नको.' संजय जगदाळे यांनी उचकावलं. सगळेच ज्येष्ठ वयात आलेले. चेष्टा-मस्करी यांचा जीव की प्राण.

भानुशाली बोलू लागले. 'हां. तर मी सांगत होतो, मला घरात बसून चहा आणि पेपर वाचायला आवडतं. एटीएममधून पैसे काढून घरच्यांचे खाण्यापिण्याचे लाड पुरवायला आवडतं. भाजी आणायचा कंटाळा. गिरणीवर दळण देणं जाम बोअर.' कुणीच टाळ्या वाजवल्या नाहीत. हे पाहून 'अरे, असे शांत का झालात. खरंच सांगतो मी.' टाळीच्या लालसेने भानुशाली म्हणाले. काही जणांच्या लक्षात आलं. त्यांनी हलकेच टाळ्या पिटल्या.

इतक्यात त्याठिकाणी ग्रुपमधील शेंडे यांची मिसेस अवतरली. एकटक पाहत राहिले. 'काय झाल्या का कुचाळक्या?' मिसेस शेंडे यांनी थेट चारित्र्यावर उडवलेले शिंतोडे एकदोघांच्या ओठांवर उडाले. बाईने अपमान केला की, कुणीही असो जवाब द्यायचा. तेही मूँह तोड. अभय सावंत घुश्यात म्हणाले- 'मिसेस शेंडे आम्ही कट्ट्यावर जमतो ते कुचाळक्या करायला नव्हे. आमच्यात अस्सल प्रेम आहे. आमची मैत्री अतूट आहे. तुम्ही शेंडेंना आयुष्यभर धाकात ठेवलं. साधा कटिंग चहा पिताना २ रुपये वाढले तर म्हणतात, 'आमच्या हिला हे आवडणार नाही.' ससायुक्त नवरा कुचाळक्या करण्याची काय बिशाद!' सावंत यांनी बाजू घेतल्याने त्यांना अन्य सहकाऱ्यांनी टाळ्या वाजवून 'वाह उस्ताद' अशी दाद दिली.

मिसेस माधवी शेंडे यांनी लगेच विषय बदलत म्हटलं, 'आमच्या लग्नाला उद्या ४० वर्ष पूर्ण होत आहेत. छोटेखानी पार्टी ठेवली आहे, गच्चीवर. या सगळे.' 'हे असं निमंत्रण अचानक भेटल्यावर कोण सोडतो. येणार. किती वाजता तेही आता सांगा शेंडे वहिनी.' सगळेच एका सुरात बोलले बरं का. क्षणात नूर पलटला. आनंदाच्या कारंज्या उडायला लागल्या, ज्येष्ठांच्या मनात!

घराबाहेर रात्री पडण्याची संधी शोधत होते ज्येष्ठ- बऱ्याच जणांच्या मनात आलं, बरेच दिवस झाले सामूहिकरीत्या घसा ओला केला नाही म्हणून. शिवाय, आयती संधी आली शेंड्यांकडे. घरच्यांना 'शेंडी' लावायला नको. अशी मनातल्या मनात सर्वांची भावना उचंबळून आली होती. शेंडे वहिनी निघून गेल्या. सावंत यांनी ग्रुपसमोर पार्टीच्या योजनेबाबत चर्चा केली. सर्वांनी माना डोलावल्या. 'चला, उद्या मिशन पार्टी. शेंड्यांच्या गच्चीवर.'

शेंडे यांनी व्हॉटसअप ग्रुपवर मेसेज टाकला होता. मेसेजला झटकन रिप्लाय मिळाला. पार्टीची सूत्रे सून रोहिणीकडे होती. ती कमालीची हुशार. ती सासऱ्यांना

म्हणते. 'पप्पा, येणार आहेत का सगळे.' 'हो. मेसेजला रिप्लाय आला आहे, पॉझिटिव्ह.' शेंडे म्हणाले.

'मस्त. कुणाला कुठली वाइन लागणार आहे, सोबत खायला काय हवं, म्हणजे असं नको व्हायला मला अमुक आवडत नाही, तमुक नको.' यावर शेंडे म्हणाले, 'हे बघ रोहिणी. आज आमच्या लग्नाचा वाढदिवस. पार्टी आपण देणार, कुणाचे चोचले का खूपवून घ्या उगाच.' असं बोलून त्यांनी रोहिणीला टाळी दिली.

'पप्पा, तुम्ही लिस्ट तयार करा. विवेक आणि मी दोघं मिळून जाऊ खरेदीला.' शेंडे यांनी कागदावर मेन्यू लिहायला सुरुवात केली. कट्ट्यावरच्या मेंबर्ससाठी फक्त ही पार्टी होती. जसं आठवेल तसं ते लिहित गेले. त्यांनी लिस्ट सुनेच्या हाती दिली. ती आणि विवेक लागलीच गेले खरेदीला.

संध्याकाळ झाली. शेंडे यांना पार्टीपेक्षा घरात, तेही आपल्या गच्चीवर पार्टी होत आहे, यानेच आनंदाच्या उकळ्या फुटू लागल्या होत्या. मिसेस शेंडे नटत होत्या. शेंडे यांना लग्नापूर्वीचे भेटलेले क्षण आठवले. आणि लग्नानंतरचा लाभलेला सुरेल, सुरेख सहवास. ते स्वत:ला लकी समजत होते. एक समृद्ध सहजीवन जगल्याची कृतज्ञता त्यांच्या चेहऱ्यावर होती.

'बघा, मी कशी दिसते.' मिसेस शेंडेंचं ते सौंदर्य पाहून मिस्टर शेंडेच्या मनात लाडू फुटू लागले. 'देवानं काय भारी ॲटम माझ्या पदरात टाकला,' असं ते मनातच म्हणाले. 'काय झालं, मी कशी दिसते.' 'थांब' असं म्हणत त्यांनी मोबाइलमध्ये बायकोचा फोटो काढला. मिसेस शेंडे खूपच लाजल्या. ती नेमकी अदा फोटोत आली. 'उद्या ठेवतो डीपीवर. जळू दे ज्यांना जळायचं असेल त्यांना!'

'थँक्यू डिअर.' असा मिसेस शेंड्यांनी अभिप्राय दिला. 'येणार आहेत ना सगळे.' 'हो. म्हणजे. झाडून येतील सगळे. तू पार्टीचं निमंत्रण दिलं आहेस. उलट त्यांना उत्सुकता लागली असेल.' मुलगा आणि सून थोड्या वेळात आले. 'गच्चीवर तयारी करावी लागेल.' शेंडेंची शंका.

'अहो, तुमच्या मित्रांची बैठक व्यवस्था अगोदरच झाली आहे. सेक्रेटरीला कल्पना दिली होती मी.' मिसेस शेंडे म्हणाल्या. 'अरेच्चा, म्हणजे त्याला पण बसायचा आग्रह करावा लागणार. आणि आपली सगळी गुपितं तो चोरून ऐकणार.' शेंडे म्हणाले.

'आता या वयात कसली आली गुपितं!' मिसेस शेंडे



लाजत म्हणाल्या. '४० वर्षांनंतरही ते कोमल लाजणं, हसणं ... क्या बात है.' चला फार रोमँटिक होऊ नका. मिसेस शेंडे यांनी त्यांच्या गालावर हलकेच टिचकी मारली आणि किचनमध्ये निघन गेल्या. मुलगा आणि सून हे दृष्य पाहतच राहिले.

इतक्यात बेल वाजली. 'थांब, मी बघतो कोण आलं ते.' शेंडे यांनी दरवाजा उघडला. बघतात तर काय... सगळे ग्रुप मेंबर नटून थटून आलेले. प्रत्येकांच्या हातात गिफ्ट. खट्याळपणे सावंत यांनी विचारलं. 'पार्टी तुमच्याच गच्चीवर आहे ना.' किचनमधून गोड आवाज आला. 'हो, आपल्याच बिल्डिगंच्या गच्चीवर आहे पार्टी.' आवाज ऐकून मेंबर्स फ्रेश झाले.

'अरे हे काय विचारणं झालं. आत या सगळे.' विवेक आणि रोहिणी यांनी सर्वांचं हसून स्वागत केलं.

'वाह, आयोजनात 'झेन झी'चा पण हात आहे तर... ' पिंगळे म्हणाले.

'असणारच. शेंडे आणि वहिनी यांचं वैवाहिक जीवन म्हणजे जणू जंतर मंतर.' भानुशाली यांचा विनोद फसला. कुणीच दाद दिली नाही.

मिसेस शेंडे आल्या. 'कुणीच घरात बसू नका. थेट गच्चीवर चला. आपल्याला सोसायटीने रात्री ११ पर्यंतची मुदत दिली आहे.'

'चला चला, वेळ वाया घालवू नका. सत्कारणी लावा.' मांजरेकर म्हणाले.

'आणि हो, आणलेली गिफ्टस वरती नेऊ नका.' मिसेस शेंडे यांची सूचना.

'इथंच गिफ्ट देताना तुमच्या लोकांचा फोटो काढते.' रोहिणीची ही आयडिया सर्वांना आवडली.


विवेक गच्चीवर पुढे गेला. पटापट फोटो सेशन झाले. मेंबर्स खूश झाले. शेंडे आणि वहिनी यांनाही खूप आनंद झाला. हस्तांदोलन झाले.

गच्चीवर तो क्षण अखेर आला. सुरुवातीला केक कापण्यात आला. मिसेस शेंडे यांनी मनोगतात म्हटलं, '४० वर्ष आमच्या लग्नाला झाली. खूप चढउतार आले जीवनात. पण, डगमगलो नाही. मिस्टर शेंडे यांचं अस्सीम प्रेम, मैत्री, सहजीवन इतकं सुंदर होतं की, आजही वटपौर्णिमेला हाच नवरा पुढच्या जन्मी मिळू दे, असं माझं देवाजवळ मागणं असतं. आयुष्याने खूप काही शिकवलं. नोकरी आणि घर यांची जबाबदारी पार पाडताना यांनी मला वेळोवेळी समजून घेतलं. कुठल्याही संकटात मित्रासारखी साथ दिली. वाईट दिवसांत त्यांच्याच प्रेमाचा आधार मिळाला. आमचं पहिलं मूल गेलं. पुरती उद्ध्वस्त झाली होती त्यावेळी. नैराश्य आलं होतं. मात्र ह्यांनी मला सावरलं. देवानं पुढे विवेक पदरात टाकला.' मधेच थांबत त्या भानावर आल्या. 'अरे, पार्टीचा मूड इतक्या चांगला आहे की, उगाच मी भूतकाळ सांगत बसले. '

मिस्टर शेंडे यांनी माइक हाती घेतला. 'मी स्वत:ला भाग्यवान समजतो की मला माधवी सारखी बायको मिळाली. संसार नेटका कसा करायचा, हे तिच्याकडून शिकलो. माझ्यापेक्षा तिच्या ऑफिसमध्ये हुद्दा मोठा. पगार मोठा. पण तिने ही दरी कधी जाणवू दिली नाही. घरावर निर्व्याज प्रेम केलं तिने. माझे नातेवाइक, मित्र सगळ्यांनाच हिचा हेवा वाटतो. आजच्या पार्टीचं नियोजनही तिचंच. मी एकदा पेपरमध्ये लेख वाचला होता. त्यात सहजीवनावर फार सुंदर भाष्य केलं होतं. नीटसं आठवत नाही. पण, लेखक म्हणतो, 'आयुष्य म्हणजे तडजोड. एकदा का पती-पत्नी हे नातं स्वीकारलं की, सुख- दु:ख यांचे समान भागीदार असता तुम्ही. आवडीनिवडी जपणं, कुठल्याही प्रसंगात दोघांच्या विचारांना प्राधान्य देणं, चुकलं की, सॉरी म्हणणं. अर्थात, वादाचे प्रसंग येतातच की. त्यालाच तर संसार म्हणतात. पण, त्यात द्वेष, मत्सर, अहंकार यांचा लवलेश अजिबात नको. तेच खरं पवित्र्य सहजीवन! किती छान विचार मांडतात लेखक. असो. मी खूप आनंदी आहे याक्षणी. '

मिस्टर शेंडे यांना भरून आलेलं. ग्रुप मेंबर्सने नेमकं हेरलं. आणि एक ग्लास हाती देत मांजरेकर म्हणाले, 'चिअर्स... ' शेंडे बायकोकडे बघत होते. तिने इशाऱ्यानेच आज घेतली तरी चालेल, असं सूचित केलं. मग काय पार्टीची रंगत उत्तरोत्तर वाढत राहिली. त्यात विवेक आणि रोहिणी यांनी कराओकेवर छानसं गाणं गाऊन उपस्थित ज्येष्ठांना 'जवान' करून टाकलं!

– राजेश दाभोळकर
(पत्रकार)
९३२४९०१५८५




तटस्थता...

वयाच्या एका टप्प्यावर माणसाला तटस्थता येते. आयुष्यभर माणसांचे, नातेवाईकांचे, मित्रमैत्रिणींचे अनुभव घेऊन प्रगल्भता आलेली असते किंवा ती येते. प्रत्येक गोष्टीकडे, घटनेकडे, प्रसंगाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलतो. घडून गेलेल्या प्रसंगाचे अवलोकन करता येते. हे खरंच घडलं का? मग घडलं तर का घडलं? आपलं काय चुकलं? ह्याचा विचार करण्याची क्षमता वाढते. माफ करण्याची वृत्ती वाढते. साध्या साध्या गोष्टींवरून येणारा राग आता येत नाही. मनः शांती मिळायला सुरुवात होते. कशाचेही काही वाटेनासे होते. आता हे चांगले का वाईट हे घडत असणाऱ्या गोष्टी ठरवत असतात. येणारा प्रत्येक प्रसंग किंवा घटना मनाला किती लाऊन घ्यायची ह्याचे जणू काही प्रात्यक्षिकच आपल्याला मिळालेले असते. एखाद्या घटनेकडे तटस्थपणे बघता येते. आपली ह्यामध्ये काय भूमिका आहे? ती महत्वाची आहे का? आपल्या मताची गरज आहे का? हे सगळे समजून घेता येते. त्याची उत्तरे मिळत राहतात. जी उत्तरे मिळतात त्याने आपल्याला त्रयस्थपणे वागता येते.

आता वारंवार डोळ्यात येणारे पाणी थोपवण्याची कला अवगत झालेली असते. आपले कोण, परके कोण किंवा जी आहेत ती खरंच आपली आहेत का? किंवा मग जी होती ती आपली होती का? ज्यांच्यासाठी डोळ्यात पाणी येत होतं ती माणसे आता दुरावलेली असतात. आपल्याला हवी तशी माणसे वागतच नाहीत हे समजायला लागतं. मग अपेक्षांचं ओझ हळूहळू कमी होत जात आणि एक अंतर आपोआपच तयार होते. हा आलेला एकटेपणा जास्त सुंदर असतो. कुणाचेही बंधन नाही, अपेक्षा नाहीत आणि त्यामुळे होणारे दुःखही नाही. त्यामुळे वागण्यातला ओलावा आपोआपच कमी होतो, बोलणे कमी होते. कर्तव्य भावनेने काही गोष्टी केल्या जातात. पण त्यातील गुंतवणूक कमी होते त्यामुळे तटस्थता येते.

आपल्या आजूबाजूचा गोतावळा आपोआप कमी होतो. आपले आपण उरत जातो आणि हा एकटेपणा जास्त सुंदर असतो. जग जास्त सुंदर दिसायला लागत. खरं म्हणजे ते सुंदर होतच पण आपण दुसऱ्याच्या नजरेतून बघत होतो. ही आलेली तटस्थता जगायला शिकवते, आजपर्यंत केलेल्या गोष्टी किंवा राहून गेलेल्या गोष्टी करायची एक उमेद देते कारण आता कसलेही ओझ नसत. कुणाकडून कसलीही अपेक्षा नसते, कोण काय म्हणेल ह्याची भीती नसते. **(पान ६० वर)**


Sukhakarta
Foundation
सुखकर्ता निकेतन
ज्येष्ठांसाठी सहजीवनाची एक नवी सुरुवात...
सहवास • सुरक्षितता • आरोग्य • आनंद • स्वातंत्र्य

इथे प्रत्येक दिवस नवे तरंग



सकाळचा निवांत फेरफटका,
मित्रांसोबतच्या गप्पा... एखादा खेळ...
पुस्तकात रमलेला दुपारची वेळ...
संध्याकाळचा सांस्कृतिक कार्यक्रम...
आणि पुन्हा नव्या दिवसाची उत्सुकता...



सुंदर बाग व
मोकळ्या जागा



बॅडमिंटन सुविधा



छोटेखानी जिम



कॅरम व बुद्धिबळ
आदि खेळ



दर आठवड्याला
विविध कार्यक्रम



टेरेस लायब्ररी



छोटेखानी स्वीमिंग पूल



थिएटर



स्वतंत्र
डायनिंग रूम

इथे भेटतील माणसे... घडेल सहवास

आपल्या माणसांसोबत... आपल्या पद्धतीने...


आयुष्य कुटुंबासाठी जगल्यानंतर
आता थोडं आयुष्य स्वतःसाठीही.
'सुखकर्ता निकेतन' ही केवळ राहण्याची
जागा नाही, ही आहे ज्येष्ठांसाठी विचारपूर्वक
उभी केलेली Community Living ची संकल्पना.



- **आपली स्वतःची जागा**
- **आपल्या वयोगटातील सहवास**
- **छंद जोपासण्यासाची संधी**
- **आरोग्याची काळजी**
- **आणि सुरक्षिततेची खात्री**





SHARING ROOM	COUPLE ROOM	PREMIUM ROOM
		
समान वयोगटातील सहवास आणि मैत्रीसाठी.	**पती-पत्नीसाठी एकत्र, स्वतंत्र आणि आरामदायी निवास.**	**अधिक सुविधा आणि वैयक्तीक आरामाची निवड.**

Attached Toilet & Bathroom

आनंदासोबत काळजीचीही खात्री

ज्येष्ठांसाठी Community Living उभारताना आरोग्य, सुरक्षितता आणि दैनंदिन सोयींना सर्वोच्य प्राधान्य



24x7
Doctor & Nurse
Facility

Emergency
Ambulance

Attendant Support
(प्रत्येक मजल्यावर
३ ते ४ Attendant)

Ramp Facility
सुलभ व सुरक्षित
हालचालीसाठी

Two Lifts
वरच्या मजल्यावर
जाण्यासाठी



स्वतंत्र
Dining Room




स्वतंत्र
Vegetarian KItchen



स्वतंत्र
Non-Vegetarian KItchen



Vehicle Facility
आवश्यकतेनुसार
बाहेर जाण्यासाठी



नातेवाईकांसाठी
निवासाची व्यवस्था
(मुलं, नातेवाईक किंवा
मित्र भेटायला आले तर)



प्रत्येक रूममध्ये
Attached
Toilet & Bathroom

सुखकर्ता फाउंडेशन
सुख | सेवा | समृद्धी

सुखकर्ता निकेतन
Senior Community Living

GREEN WILLOWS
शेडुंग बुद्रुक, ता. शहापूर
जि. ठाणे

संपर्क: 98333 84567
contact@sukhkartafoundation.org
www.sukhkartafoundation.org

Regd. Off. : Devendra Apt. Office No.1, Sahayog Mandir Road, Naupada, Thane, Maharashtra, India



हरवलेली माणसं आणि जुन्या आठवणी

सकाळची कामं आटपून, दुपारी आईने पाठ टेकवली की, दारावर नेमकी बेल वाजायची. आई म्हणायची, ''मंगल्या धोबी आला असेल.'' ''आणि आईचं म्हणणं खरं असायचं. ''कपडे हैं क्या बाई'' असा तो दाराबाहेरून ओरडायचा. आई मला म्हणायची, ''जा दार उघड नाहीतर तो निघून जायचा.'' मंगल्याच्या पायाला जणू चाकंच होती. आला-आला म्हणताना तो निघून जायचा. मी धावत जाऊन दार उघडायची. बाजूच्या दाढा नसलेले त्याचे काळे-लाल दात पूर्ण तो दाखवत हसायचा. मला म्हणायचा, ''बाईको बोलना, जल्दी करें''. आई त्याला कपडे देताना तक्रार करायची की, इस्त्री नीट झालेली नाही. काही कपड्यांना उलगडून दाखवायची, कपड्यांवरच्या सुरकुत्या दाखवायची. तो म्हणायचा, ''देदो वापस, करके लाता.'' आई त्याला कपडे द्यायची आणि तो पुढल्यावेळीही कपडे तसेच घड्या घालून तसाच परत आणायचा.

आमच्या शेजारच्या घरी तो कपडे सुद्धा धुवायचा. मंगल्या दिसायला अत्यंत अजागळ. साठीच्या घरातला. अंगात अतिशय मळका सदरा आणि पॅन्टला कधी पाणी तरी लागलं असावं का अशी शंका यायची. पॅन्टचा एक पाय नेहमीच वर गुंडाळलेला. पायामध्ये वापरून-वापरून झिजलेल्या वहाणा, डोक्यावरचे केस पूर्ण पिकलेले, त्याला कधी कंगवा लागत नसे. ते केस त्याच्या डोळ्यावर यायचे. गालांवर देवीचे व्रण आणि आवाज अत्यंत घासलेला. त्याला नेहमी तार सप्तकातच बोलताना पाहिले आहे. पाठीवर भलं मोठं कपड्यांचं मळकट गाठोडं घेऊन तो मोठ्या-मोठ्या टांगा टाकत चालायचा. त्याच्याजवळ आकर्षक असं काहीच नव्हतं. कामात सुद्धा चोख नव्हता. स्वतःच्या राहणीत सुद्धा

स्वच्छता नव्हती. तरीही त्याचा फार काळ राग यायचा नाही; कारण त्याचा स्वभाव! कोणी काही बोललं तरी त्याला राग यायचा नाही; तो

त्याच्याशी नम्रपणेच बोलायचा. त्याची मुलं करती-सवरती झाली होती, त्यांची लग्नही झालेली, तरीही मंगल्या कष्ट उपसत होता. ''मैं क्या करूंगा घर बैठके? हात-पैर चल रहे हैं तबतक काम करूंगा.''

***

असेच आणखी एक आजोबा यायचे. सत्तरीच्या घरातले. त्यांच्याविषयी फार काही व आठवत नाही. पण ते नवरात्रीत हमखास यायचे. त्यांचा पोशाख म्हणजे साधंसं पांढरं धोतर, तसाच साधा लांब कुर्ता, डोळ्यांमध्ये करुणा आणि काखेत दोन चार झोळ्या. ते आले की ते संबळवर काही देवीची गाणी वाजवायचे. त्यापैकी मला आता एकच गाणं, आणि त्या गाण्याच्या सुद्धा दोनच ओळी आठवत आहेत. ''**अष्टभूजी अंबाई अंबाबाई, अंबाबाई – असा डोंगर गरजला गरजला**'' ह्या गाण्यामुळे मी त्यांना 'अष्टभूजी आजोबा' म्हणायचे. आई नवरात्रीत त्यांना दहा-वीस रुपये द्यायची; इतरवेळी त्यांना भांडभर पीठ द्यायची. कधी गव्हाचं तर कधी ज्वारीचं. पीठ आणल्यानंतर सुद्धा ते मधूनच गाणं थांबवत नसत. मी घरी असले तर पीठ देण्याचा माझा हट्ट असायचा. पीठ झोळीत टाकल्यावर एका चिमुकल्या कापडाच्या पुचुंडीमधून ते अंगारा काढायचे आणि माझ्या कपाळाला लावायचे. तोंडातल्या तोंडात हात उंचावत आशीर्वादपर काही म्हणत असत. अत्यंत मीतभाषी असलेल्या आजोबांनी कधीच जास्तीचं काही मागितलं नाही, व अत्यंत कृश असलेल्या आजोबांच्या झोळ्या सुद्धा मी नेहमी कृश पाहिल्या आहेत.

***

दुपारी शेजारच्या ताईच्या अंगणात खेळायला गेले, की त्यांच्याघरी एक म्हातारी बाई डोक्यावर टोपलं घेऊन येत असे. तिच्याबाईच्या अंगावरची साडी ठिकठिकाणी फाटलेली, काही ठिकाणी ठिगळं लावलेली सुद्धा असायची. उन्हाने रापलेला चेहरा आणि दुपारची उन्हाची यायची तर घामाने तिच्या कपाळावरचं मोठं कुंकू पसरायचं. ती आली की लिंबाच्या झाडाखाली बसायची. टोपल्याच्या खाली डोक्यावरच्या कापडाच्या गुंडाळीनेच ती घाम पुसायची. आमच्यापैकी एकाला ''पानी पाजते का?'' असं विचारायची. काकू तिच्यासाठी शिळं अन्न काढेपर्यंत ताई आमच्या हातात पाण्याचा तांब्या द्यायची. दोन्ही हातांची ओंजळ करून ती घटाघटा पाणी प्यायची. बाजूला तिच्या टोपल्यामध्ये तीन-चार ॲल्युमिनियमची भांडी असायची. एका पिशवीमध्ये पोळ्या आणि भाकऱ्या असायच्या. त्या भांड्यांमध्ये भाजी, वरण असं काही काही असायचं. त्या अन्नाचा एक दर्प यायचा. तिच्याकडे बघत आमचा खेळ जरावेळ थांबायचा.

ताई आतून अन्न आणायची. ती वरणाच्या भांड्यात वरण ओतायची, पोळ्यांमध्ये पोळ्या ठेवायची. त्याबदल्यात ती रस्त्याने जमा केलेलं गाईचं शेण द्यायची. त्या शेणाचा उपयोग अंगणात सडा घालायला व्हायचा. ही सगळी देवाणघेवाण सुरू असताना इकडच्या-तिकडच्या बातम्या सांगायची. कोणाच्या घरी कशावरून भांडण झालं इथपासून ते कोणाला नवी नोकरी लागली याबद्दल तिला सगळं माहित असे. सगळे सोपस्कार आटोपले की कंबरेला खोचलेली मळकट चंची काढायची. त्यात कधी भाजलेले चिंचोके असायचे. आम्हाला ''खातं का?'' म्हणून विचारत असे, पण आम्ही तिच्याकडून काही घेत नसू. एका खणातून तंबाखू काढून त्याला कणभर चुना लावून ती चिमूट दाताखाली दाबली की डोक्यावर फडक्याची गुंडाळी ठेवून ती टोपलं डोक्यावर घेई. ''येतो बाई'' म्हणून चालायला लागे. आमचा थांबलेला खेळ पुन्हा सुरू होई. त्या आजीचं नाव मला आजही माहित नाही. आम्ही ती आली की काकूंना धावत घरात जात

काकूंना ''ती आली'' एवढंच सांगायचो आणि काकूंना कळायचं सुद्धा!

***

गावातील दक्षिणमुखी मारुतीच्या मंदिरासमोर पूर्वी एक सुंदर बाग होती, पण काळाच्या ओघात तिथे काटेरी झुडपं आणि रुईचं रान माजलं होतं. देवळात बंदिस्त असलेला मारुती अंगावर वाहणाऱ्या तेलाच्या धारा, तोंडावर जमणाऱ्या मुंग्या आणि भिंतींवर अश्लील खोड्या काढणाऱ्या प्रेमी युगुलांच्या उपद्रवाने जणू त्रस्त झाला होता. उड्डाणाच्या पवित्र्यात उभी असलेली ती मूर्ती कुलूपबंद देवळातून कधी एकदा सुटका होते, याचीच संधी शोधत असल्यासारखी भासत होती.


पण ऐंशी ओलांडलेले गुजरे आजोबा मंदिराच्या पारावर येऊन बसू लागले आणि मंदिराचे दिवस पालटले. त्यांचा दरारा असा होता की, प्रेमी युगुलांचा उपद्रव थांबला, मुलांचा धिंगाणा बंद झाला आणि मंदिराला शांतता लाभली. संध्याकाळी जमणाऱ्या इतर वृद्धांच्या वादात न पडता ते शांतपणे बसून राहायचे. शेतीची ओढ असलेले आजोबा दर शनिवारी मैदानातल्या चिवट रुईच्या फुलांचा सुंदर हार मारुतीसाठी बनवत. अनेकदा तोडल्यानंतरही पुन्हा नव्याने बहरणाऱ्या त्या रुईच्या झाडावर आजोबांचे विशेष प्रेम जडले होते. होळीच्या दिवसात सगळी काटेरी झुडपं मुलं कापून नेत मात्र रुई तशीच राहत असे. तिला अनेकदा अनेक कारणांनी कापलं होतं, मात्र ती पुन्हा उगवायचीच. कोणाच्या पायात काटा गेला की गुजरे आजोबा पान तोडून आणत आणि काटा गेलेल्या ठिकाणी त्याचा पांढरा चीक लावत. लवकरच काटा वर येई आणि तो बाहेर निघे. तो चीक लावताना ते म्हणत, ''देवानं ज्याप्रमाणे काटे जन्माला घातले, त्या काट्यात काटा काढणाऱ्या रुईले बी पाठवलं.'' मला त्या वाक्यात गूढ अर्थ दिसे. त्या रुईला बोंडं येत आणि त्यातून 'म्हाताऱ्या'बाहेर पडत. त्या म्हाताऱ्या हवेवर तरंगत. त्या पांढऱ्या मऊ म्हाताऱ्यांसोबत गुजरे आजोबांचे पांढरेशुभ्र केस वाऱ्यावर भुरुभुरु उडत. आजोबा म्हणत, ''मी मेल्यावर याच मारुतीले लोक येतील.'' आणि मला वाटतं गुजरे आजोबा गेल्यावर मारुतीही लवकरच उड्डाण करेल.



***

माझ्या लहानपणी पाहिलेली काही माणसं आज काळाच्या पडद्याआड गेली आहेत; पण त्यांच्या जगण्याच्या खुणा मनावर अजूनही तितक्याच गडद आहेत. आयुष्यभर कष्ट उपसताना, अनेक दुःखं आणि अडचणी पचवताना, आपल्या वाट्याला आलेलं जगणं निमूटपणे जगणारी ही माणसं. त्यांच्या आयुष्यात कदाचित फार मोठ्या घटना घडल्या नसतील, त्यांच्या वाट्याला प्रसिद्धीही आली नसेल; पण त्यांच्या जगण्यात एक विलक्षण मोठेपण होतं. त्यांच्या सुरकुत्यांतून, कष्टाळू हातांतून, थकल्या डोळ्यांतून आणि साध्यासुध्या बोलण्यातून आयुष्याचे कितीतरी अर्थ उलगडत गेले. आज मागे वळून पाहताना जाणवतं की, ही माणसं केवळ आठवणींचा भाग नाहीत, तर माझ्या जाणिवांचा एक अविभाज्य हिस्सा आहेत. त्यांच्या आयुष्याचा पट मोठा नाही, म्हणून त्यांचं जगणं लहान ठरत नाही. त्यांच्या स्मृतींना शब्दरूप देण्याचा हा प्रयत्न म्हणजे काळाच्या ओघात पुसट होत जाणाऱ्या त्यांच्या अस्तित्वाच्या खुणा जपण्याची, आणि त्यांच्याप्रति मनात असलेली कृतज्ञता व्यक्त करण्याची एक छोटीशी धडपड आहे.

– अश्विनी जांभेकर–पितळे
९९२२९ ५२२५८



ग्रामीण ते शहरी जीवनाचा प्रवास

भारत हा खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. भारतीय संस्कृतीची मुळे ग्रामीण भागात खोलवर रुजलेली आहेत. शेती, निसर्ग, परंपरा, एकमेकांशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध आणि साधी राहणी ही ग्रामीण जीवनाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. मात्र, बदलत्या काळानुसार शिक्षण, रोजगार, औद्योगिकीकरण आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे ग्रामीण भागातील अनेक लोक शहरी जीवनाकडे आकर्षित होत आहेत. ग्रामीण ते शहरी जीवनाचा हा प्रवास म्हणजे केवळ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे नसून सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि मानसिक परिवर्तनाची एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे.

ग्रामीण जीवन हे निसर्गाच्या सान्निध्यात घडत असते. गावातील स्वच्छ हवा, हिरवीगार शेती, मोकळे वातावरण आणि सामाजिक एकोपा यामुळे जीवनात एक वेगळाच आनंद अनुभवायला मिळतो. गावातील लोक एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होतात. सण,

उत्सव, धार्मिक कार्यक्रम आणि पारंपरिक प्रथा यांमुळे सामाजिक एकात्मता टिकून राहते. मात्र, ग्रामीण भागात आजही अनेक ठिकाणी उच्च शिक्षणाच्या मर्यादित सुविधा, रोजगाराच्या कमी संधी, आरोग्यसेवेचा अभाव, अपुरी वाहतूक व्यवस्था आणि आधुनिक तंत्रज्ञानाची कमतरता अशा समस्या दिसून येतात. त्यामुळे अनेक तरुणांना स्वतःच्या प्रगतीसाठी शहरांकडे वळावे लागते.

शहरी जीवन हे आधुनिकता, वेग, स्पर्धा आणि संधी यांचे प्रतीक आहे. मुंबई, पुणे, नागपूर यांसारख्या शहरांमध्ये शिक्षण, औद्योगिक विकास, माहिती तंत्रज्ञान, व्यवसाय, संशोधन आणि रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. विशेषतः अभियांत्रिकी, वैद्यकीय, व्यवस्थापन आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रांमध्ये करिअर घडवण्यासाठी शहरे महत्त्वाची केंद्रे बनली आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरांमध्ये आधुनिक प्रयोगशाळा, ग्रंथालये, संशोधन केंद्रे आणि डिजिटल शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध होतात. त्यामुळे त्यांच्या ज्ञानाचा आणि कौशल्यांचा विकास होण्यास मदत होते.

ग्रामीण ते शहरी स्थलांतरामागे आर्थिक कारणेही महत्त्वाची आहेत. शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांना अनियमित पाऊस, दुष्काळ, वाढता उत्पादन खर्च आणि बाजारभावातील चढ-उतार यांसारख्या समस्यांना सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीत स्थिर उत्पन्न आणि चांगल्या रोजगाराच्या शोधात अनेक कुटुंबे शहरांकडे स्थलांतर करतात. औद्योगिकीकरणामुळे शहरांमध्ये कारखाने, कंपन्या, बांधकाम व्यवसाय आणि सेवा क्षेत्राचा विस्तार झाला आहे. यामुळे रोजगाराच्या नवीन संधी निर्माण झाल्या आहेत.

आधुनिक तंत्रज्ञानाने ग्रामीण आणि शहरी जीवनातील अंतर कमी करण्यास सुरुवात केली आहे. इंटरनेट, स्मार्टफोन, डिजिटल पेमेंट, ऑनलाइन शिक्षण, ई-कॉमर्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या तंत्रज्ञानामुळे ग्रामिण भागातील लोकांनाही शहरी सुविधांचा लाभ घेता येत आहे. उदाहरणार्थ, शेतकरी हवामानाचा अंदाज, बाजारभाव आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाची माहिती मोबाईलद्वारे मिळवू शकतात. तसेच, सौरऊर्जा, ठिबक सिंचन आणि स्वयंचलित यंत्रसामग्रीचा वापर करून शेती अधिक कार्यक्षम बनवता येते. अभियांत्रिकी क्षेत्रातील नवीन संशोधन ग्रामीण विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरू शकते.

मात्र, शहरी जीवनासोबत अनेक आव्हानेही येतात. शहरांमधील वाढती लोकसंख्या, वाहतूक कोंडी, वायुप्रदूषण, ध्वनिप्रदूषण, पाण्याची कमतरता, महागाई आणि वाढते घरभाडे या गंभीर समस्या आहेत. ग्रामीण भागातील शांत आणि मोकळ्या वातावरणातून शहरातील धावपळीच्या जीवनात प्रवेश करताना अनेकांना मानसिक तणावाचा सामना करावा लागतो. स्पर्धात्मक वातावरणामुळे व्यक्तीच्या जीवनशैलीत बदल होतो. अनेकदा शेजाऱ्यांमधील आणि समाजातील आपुलकीचे संबंध कमी होत असल्याचेही दिसून येते.

या समस्यांवर उपाय म्हणून शाश्वत शहरी विकास आणि स्मार्ट सिटी संकल्पना महत्त्वाच्या ठरतात. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुधारणे, सौरऊर्जेचा वापर वाढवणे, पावसाच्या पाण्याचे संकलन करणे, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे आणि हरित क्षेत्रांचे संवर्धन करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागात दर्जेदार शिक्षण, आरोग्यसेवा, उद्योग आणि डिजिटल पायाभूत सुविधा निर्माण केल्यास शहरांकडे होणारे अनावश्यक स्थलांतर कमी करता येईल.

ग्रामीण आणि शहरी जीवन या दोन्हींचे स्वतःचे महत्त्व आहे. ग्रामीण जीवन आपल्याला संस्कार, निसर्गप्रेम आणि सामाजिक एकोपा शिकवते, तर शहरी जीवन आधुनिक विचारसरणी, तंत्रज्ञान आणि प्रगतीच्या संधी उपलब्ध करून देते. त्यामुळे दोन्ही जीवनपद्धतींमधील चांगल्या गोष्टींचा समन्वय साधणे आवश्यक आहे.

शेवटी, ग्रामीण ते शहरी जीवनाचा प्रवास हा केवळ भौगोलिक बदल नसून विकासाच्या नव्या संधींचा शोध आहे. आधुनिक तंत्रज्ञान, शिक्षण आणि नियोजन यांच्या साहाय्याने ग्रामीण भागाचाही विकास झाला पाहिजे. गावांचा विकास आणि शहरांचे नियोजनबद्ध आधुनिकीकरण यांचा समतोल साधला, तरच भारताचा सर्वांगीण आणि शाश्वत विकास शक्य होईल.

– यश मिराशी



आठवणी आकाशवाणीच्या...

आकाशवाणी मुंबई केंद्राच्या प्रादेशिक वृत्त विभागात १९९१-९२/९३ या कालावधीत दीड-दोन वर्षे जे काम केले त्यात खूप काही शिकायला मिळाले. लहानपणी ज्यांचे आवाज केवळ ऐकले होते त्या मंडळींबरोबर प्रत्यक्ष काम करण्याची संधी मिळाली. यात ज्येष्ठ वृत्तनिवेदक कुसुम रानडे, शरद चव्हाण आणि ललिता नेने यांचा समावेश होता. शरद चव्हाण आणि नेने व रानडे बाई यांचा आवाज अगदी थेट परिचयाचा जसा पुणे आकाशवाणीच्या सुधा नरवणे यांचा.

१९८९ मध्ये 'मुंबई सकाळ' मधून पूर्णवेळ पत्रकारितेची नोकरी सुरू झाली. 'मुंबई सकाळ'चे संपादक तत्कालिन संपादक राधाकृष्ण नार्वेकर यांच्या परवानगीमुळे मुंबई सकाळमध्ये नोकरी करत असतानाही मला आकाशवाणी मुंबईच्या प्रादेशिक वृत्तविभागात हंगामी वृत्तनिवेदक (कॅज्युअल न्यूजरिडर) म्हणून सुमारे दीड ते दोन वर्षे काम करता आले. प्रादेशिक वृत्तविभागात दुपारी १ ते ७ अशी कामाची वेळ असायची. दोन/तीन महिन्यातून एकदा बातम्यांचे काम मिळायचे.

'मुंबई सकाळ'मध्ये रिपोर्टिंगला होतो. प्रत्येक रिपोर्टर्सला दोन/तीन महिन्यातून एकदा रात्रपाळीची ड्युटी यायची. ही ड्युटी संध्याकाळी ६ ते १२ अशी असायची. शक्यतो मी माझ्या याच ड्युटीच्या काळात आकाशवाणीवर माझे कॉन्ट्रक्ट घेत असे. नार्वेकर साहेब यांच्यामुळे मला दोन तासांची सवलत मिळत असे. संध्याकाळी सातच्या प्रादेशिक बातम्या झाल्या की मी चर्चगेटहून प्रभादेवीला आमच्या मुंबई सकाळच्या ऑफिसमध्ये येत असे. साधारण १९९१-९२ व ९३ असा सुमारे दीड-दोन वर्षे मी आकाशवाणीवर होतो. अर्थात हे सर्व नार्वेकर यांनी दिलेल्या परवानगीमुळेच मला करता आले हे विसरून चालणार नाही.

आकाशवाणीचे ते दिवस छान होते. या काळात खूप काही शिकायला मिळाले. वृत्तपत्रात/ आकाशवाणीवरुनच आकाशवाणीच्या प्रादेशिक वृत्तविभागात कॅज्युअल न्यूजरिडर हवे असल्याची जाहिरात आली होती. मी अर्ज केला. लेखी व आवाजाची परीक्षा आणि इंटरव्हयू यातून पार झालो व माझी कॅज्युअल न्यूजरिडरच्या पॅनेलवर निवड झाली. आकाशवाणीवर जे काही दीड-दोन वर्षे काम केले त्यात खूप मजा आली. लहानपणी मी ज्यांचे आवाज केवळ ऐकले होते त्या मंडळींबरोबर मला प्रत्यक्ष काम करण्याची संधी मिळाली हे मी माझे भाग्य समजतो. यात ज्येष्ठ वृत्तनिवेदक कुसुम रानडे, शरद चव्हाण आणि ललिता नेने यांचा समावेश होता. शरद चव्हाण आणि नेने व रानडे बाई यांचा आवाज अगदी थेट परिचयाचा होता. जसा पुणे आकाशवाणीच्या सुधा नरवणे यांचा आवाज. सकाळी ७-०५ च्या बातम्या वाचायला बहुतेक त्या असायच्या.

कुसुम रानडे, शरद चव्हाण, ललिता नेने या तिघांचेही आवाज कानात बसलेले होते. आकाशवाणीवरील पहिल्या दिवशी मला दुपारी पावणेतीनचे बातमीपत्र वाचायला मिळाले होते. माझा पहिलाच दिवस होता. त्यावेळी दोन ज्येष्ठ वृत्तनिवेदक व एक कॅज्युअल असे लोक ड्युटीला असायचे. शरद चव्हाण, कुसुम रानडे, ललिता नेने हे तीघेही आकाशवाणीचे स्टाफ वृत्तनिवेदक होते. वसंत ऊर्फ दादा देशपांडे हे आकाशवाणीचे स्टाफ रिपोर्टर होते. ते मंत्रालय, विधानमंडळ, राजकीय आणि अन्य महत्वाच्या बातम्यांचे वृत्तांकन करायचे.

असो. तर मी सांगत होतो, माझ्या आकाशवाणीवरील पहिल्या दिवसाबद्दल.

सगळ्यांनी मला शुभेच्छा दिल्या. वृत्तसंपादक म्हणून हरिश कांबळे त्यावेळी काम पाहात होते. माझा पहिलाच दिवस. त्यामुळे मला दुपारी पावणेतीनच्या बातम्या वाचायला दिल्या होत्या. या बातम्या पाच मिनिटांच्या असतात. स्टुडिओत जाण्यापूर्वी मला सगळ्या सूचना देऊन ठेवलेल्या होत्या. स्टुडिओत लाल दिवा लागला की वाचायला सुरुवात करायची, बातम्या लिहिलेले कागद अलगद बाजूला ठेवायचे वगैरे, वगैरे. लाल दिवा लागला, आणि मी वाचायला सुरुवात केली, आकाशवाणी मुंबई, शेखर जोशी प्रादेशिक बातम्या देत आहे...सुरुवातीचे अगदी काही क्षण थोडे दडपण माझ्यावर होते. पण नंतर ते दूर झाले. बातम्या वाचून मी वर आलो. हरीश कांबळे आणि अन्य सर्वांनी बातम्या चांगल्या झाल्या असल्याचे सांगून मला प्रोत्साहित केले.

त्यानंतर अगोदर म्हटल्याप्रमाणे दोन/तीन महिन्यातून एकदा मला कॉन्ट्रक्ट मिळत जायये. अशाच एका कॉन्ट्रक्टमध्ये मला एकदा संध्याकाळच्या सातच्या प्रादेशिक बातम्या वाचण्याची संधी मिळाली. त्या बातम्या दहा मिनिटांच्या असतात व त्या राज्यातील सर्व केंद्रे सहक्षेपित करतात. या बातमीपत्राला श्रोतेही दुपारच्या तुलनेत जास्त असतात. या बातम्यांच्या वेळी पाच मिनिटांनंतर या बातम्या आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरून देण्यात येत आहेत, असे वाक्य म्हणायचे असते.

माझी पहिलीच वेळ असल्याने गडबडीत ते लक्षात राहील की नाही, म्हणून माझ्याबरोबर नेने बाई स्टुडिओत आल्या होत्या. माझ्या समोर त्या उभ्या राहिल्या. पाच मिनिटे झाल्यावर त्यांनी एक कागद हळूच माझ्यासमोर धरला. त्यावर ते वाक्य लिहिलेले होते. बातम्या संपायला काही सेकंद बाकी असताना, नेनेबाईंनी ठळक बातम्या, असा कागद मला दाखवला. कारण बातम्या संपताना दहा-पंधरा सेकंद बाकी असताना शेवटी पुन्हा एकदा ठळक बातम्या, असे वाचायचे असते. माझा पहिलाच दिवस असल्याने गडबडीत लक्षात राहिले नाही तर पंचाईत नको, म्हणून नेनेबाई स्वत स्टुडिओत आल्या होत्या. संध्याकाळच्या सातच्या प्रादेशिक बातम्या वाचायचा

माझा हा पहिला दिवसही उत्तमप्रकारे पार पडला. त्यानंतर शरद चव्हाण आणि ललिता नेने जर ड्युडीला असतील तर त्या दोघांपैकी एक जण दुपारच्या आणि मी नेहमी संध्याकाळच्या बातम्या वाचायचो. रानडे बाई असल्या की मात्र एकेक दिवस आलटून-पालटून आम्ही दुपारच्या व संध्याकाळच्या बातम्या वाचायचो.

पुढे माझ्या त्या दीड-दोन वर्षांच्या काळातच हे तिघेही ज्येष्ठ वृत्तनिवेदक निवृत्त झाले. त्यामुळे त्यानंतर दोन कॅज्युअल न्यूजरिडरवरच सर्व भार होता. या ज्येष्ठ मंडळींनी अगोदर केलेल्या मार्गदर्शनामुळे ते नसतानाही आम्हाला बुलेटीन तयार करणे जणू लागले. जयंत माईणकर, रत्नाकर तारदाळकर, धनश्री लेले, मनाली दीक्षित, अंजली आमडेकर, दीपक वेलणकर , शिबानी जोशी (काही जणांची नावे राहिली असल्यास क्षमस्व),अशी आम्ही नवी-जुनी कॅज्युअल मंडळी त्यावेळी होतो. आकाशवाणीचा माईक हा खूप शक्तीशाली असल्याने कागदाची साधी सळसळ झाली तरी ती श्रोत्यांपर्यंत पोहोचत असते. त्यामुळे बातम्यांच्या कागदाचा गठ्ठा हातात घेऊन एकेक बातमी वाचून झाल्यावर तो कागद अलगद बाजूला कसा सरकावायचा किंवा अलगद बसल्या जागेवरून खाली कसा टाकून द्यायचा, हे धडे नेने बाईंकडून मिळाले. सुरुवातीला तर त्या बातम्या देत असताना कशा देतात, हे पाहण्यासाठी खाली स्टुडिओत मी गेलो असल्याचेही मला आठवताय.

आकाशवाणीच्या प्रादेशिक वृत्तविभागात काम करत असताना अनेक महत्वाच्या बातम्या सांगण्याचा साक्षीदार होण्याचे भाग्य मला मिळाले. परंतू या सगळ्यांमध्ये कायम आठवणीत राहिलेल्या बातम्या म्हणजे १२ मार्च १९९३ रोजी मुंबईत झालेल्या साखळी बॉम्बस्फोटाच्या. संध्याकाळच्या सातच्या बातम्या मी वाचल्या होत्या.

– शेखर जोशी
ज्येष्ठ पत्रकार

वृद्धत्व

घरातले म्हातारे आता नकोशे झाले
सळसळत्या तारूण्याची मौज मजा मस्ती
राजा राणीच्या सुखात बेहोशी नुसती
मी मी मीच शब्द असे मस्तवाल झाले
घरातले म्हातारे आता नकोशे झाले

टापटीप संसाराला श्रीमंती थाट
हायफाय आयुष्यात स्वप्नांची लाट
अडचण वाटतात वार्धक्याचे सर्दी खोकले
घरातले म्हातारे आता नकोशे झाले

त्यांची पिकनिक टूर फंक्शन आणि पार्टी
वृद्धाश्रमाची भिती उगाच मनी दाटी
परक्यांत मरायचे संस्कार का केले ?
कासावीस विचारांनी वृद्धांचे डोळे ओले
घरातले म्हातारे आता नकोशे झाले

असू नये वाटे म्हातारपण कधी कधी
नकोच त्या व्याध्यांच्या वेदना शरीरी
झुगारून इच्छा कष्ट मुलांचे झेलले
घरातले म्हातारे आता नकोशे झाले

अमरत्व नाही तारूण्याला कोण सांगे यांना
आम्ही जपले भान पाहून नात्यांना
सर्वस्वाची करून उधळण तेच कफल्लक झाले
घरातले म्हातारे आता नकोशे झाले

– संजय एकनाथ गायकवाड



राहून गेलेला फोटो

आपल्या आयुष्यात कधीतरी अचानक काही माणसं अगदी काही काळा पुरती येतात. आणि स्वतःची छबी आपल्यावर कायमची ठेवून जातात.

मला आयुष्यात लौकीकार्थाने मोठ्या असलेल्या काही व्यक्तींना भेटण्याची संधी मिळाली. अशा व्यक्तींची भेट ही कधी तरी एक-दोनदा होते. ही मोठी लोक मोठी का होतात? ती मोठी असतात, ते फक्त वय, अनुभव, पैशाची श्रीमंती यांनी? तर असं नसतं. ती त्यांच्या स्वभावगुणांनी मोठी ठरतात.

अशाच काही व्यक्तींमध्ये सर्वात पहिल नाव आठवतं, ते म्हणजे टाटा उद्योगसमूहाचे पूर्णवेळ मुख्य अर्थशास्त्रज्ञ म्हणून काम केलेले कै. डॉ. दत्तात्रेय रा. पेंडसे. माझे सासरे कै. डॉ. यशवंत रारावीकर यांचे मित्र. दोघेही अर्थतज्ञ. दोघांनाही घरी सर्व दादा म्हणत होते. आयुष्याच्या संध्याकाळी दोघांच्या आपापल्या जोडीदाराचा प्रवास थोडा लवकर संपला होता.


त्यावेळी आम्ही मुंबईला रहात होतो. तेव्हा आमच्या दादांमुळे मला दादा पेंडसे यांच्या वरळीच्या घरी एक-दोन वेळा जाण्याचा योग आला. वेळ साधारण दुपारची होती. गप्पा झाल्या. मग त्यांनी विचारलं, ''चहा घेणार ना?'' मी म्हणाले,

''मी करते.'' तेव्हा त्यांनी उत्तर दिलं, ''तुला माझ्या मठीमध्ये चहा-साखर-कप कुठं आहे ते सांगायला लागेल आणि तुला तरी घरी चहा कोण करून देणार? त्यापेक्षा मीच चहा बनवतो.'' अस बोलून मला गप्प केलं. त्यांनीच आम्हाला चहा करून दिला. ''चहाबरोबर तुला खायला काय हवं ते या कपाटात शोधून घे'' अस सांगितलं. एक लाकडी कपाट ज्यात खायचा खजिनाच होता. त्यात भारीतली चॉकलेट्स, वेफर्स पासून चितळ्यांच्या बाकरवडीपर्यंत बरच काही होतं. कपाट थोड जुन्या पध्दतीच असलं तरी आत सामान अतिशय नीटनेटक मांडलेल होतं. चहा पिताना मला म्हणाले, ''तू ज्या खुर्चीवर बसून चहा पित आहेस तिथे जेआरडी सुध्दा बसून गेलेले आहेत.'' असे दिलदार, समजूतदार, उत्साही आणि आनंदी ''दादा''.

त्यानंतर आम्ही मुंबई सोडली. पुढे आम्ही ज्या शहरात रहात होतो. तिथे ते देखील फार पूर्वी नोकरी निमित्य राहून गेले होते. त्यामुळे तिकडे रहायला गेल्यानंतर आमच दोन-चार वेळा फोनवर बोलण झालं. त्या शहरातील जुन्या आठवणी ते फोनवर सांगायचे. नंतर अचानक २०१८ साली पेपरमध्ये त्यांच्या निधनाची बातमी वाचली.

तो काळ होता जेव्हा जेमतेम सर्वांच्या हातात मोबाईल फोन आले होते. खरोखर माझ भाग्य होत की अशा दादांना मी भेटले, ज्यांनी जेआरडीं बरोबर काम केल होतं. त्यांच्या खुर्चीत अगदी अल्पसा वेळ का होईना मला बसायला मिळालं. मनात कुठं तरी एक हुरहूर लागून राहिली होती... एक फोटो घ्यायचा राहून गेला होता. आठवणी मात्र कायमच्या होत्या.

– वीणा रारावीकर, मुंबई



स.न.वि.वि.

स.न.वि.वि.

सुरुवातीला स.न.वि.वि. असे लिहिल्यामुळे मी काही सांगतोय, किंवा कशाबद्दल तरी आमंत्रण देतोय, असे कदाचित वाटू शकेल. पण अशी सुरुवात करुन लिहिण्याचा मोह आवरला गेला नाही.

हल्ली लग्नपत्रिका, आमंत्रण पत्रिका यावरच असे लिहिलेले बघायला मिळते. एरवी असे शब्द लिहिले जात होते, हे सुध्दा विसरायला झाले आहे. उतारवयात स्मरणशक्ती कमी होते म्हणून काही गोष्टी विसरायला होतात. पण आता असे शब्द वाचण्यात आणि लिहिण्यात येत नसल्याने विसरायला झाले आहेत.

खरेच मोबाईलसारख्या सहज संभाषण करता येणाऱ्या वस्तू उपलब्ध झाल्यामुळे, नवनवीन शोधामुळे, काही गोष्टी सोप्या झाल्या असल्या, तरीही पत्रलेखन मात्र जवळपास बंदच झाल्यामुळे पत्रात लिहिले जाणारे काही शब्द लुप्त झाल्यासारखे वाटतात.

आज सहज अशा काही शब्दांची आठवण झाली...

श्री लिहून पत्राची सुरुवात.

श्री.रा.रा. – श्रीमान राजमान्य राजश्री.

स.न.वि.वि. – सप्रेम नमस्कार विनंती विशेष.

तीर्थरुप आई / बाबा.

शि.सा.न. – शिर साष्टांग नमस्कार.

या सारखे शब्द वाचायलाच मिळेनासे झाले आहेत.

कळविण्यास आनंद होतो की..... असे लिहून पत्राची सुरुवात झाली, तर पुढे आनंदाची बातमी आहे, म्हणून पत्र अक्षरशः अधिरतेने वाचले जायचे. (दोन वेळेस)

पत्राच्या शेवटी लिहिले जाणारे...

– कळावे, लोभ असावा.

– आपला.

– तुझाच/ तुझीच (किती रोमँटिक!)

– आपला आज्ञाधारक

– मो.न.ल.अ.उ.आ. छो.गो. पा. : मोठ्यांना नमस्कार, लहानांना अनेक उत्तम आशिर्वाद छोट्यांना गोड पापा, असे लिहून तान्हुल्यांची सुध्दा आवर्जून आठवण ठेवली जायची. यात गोड पापा असे वाचतांना सुध्दा खरेच लहानांचा गोड पापा घेतला जातोय असा भास व्हायचा.

हे आणि या सारखे शब्द शाईच्या पेनासारखेच झाकण (टोपण) लावून जवळपास कायमचे बंद झाले आहेत असे वाटते.

त्यामुळेच असे आपलेपणा जपणारे शब्द पेनने कागदावर उतरण्याचे थांबलेच नाहीत, तर बंद झाले आहेत.

पत्र लिहून संपविताना एखादी गोष्ट आठवली तर ता.क (ताजा कलम) असे लिहून उरलेल्या जागेत ती मावेल अशा अक्षरात लिहीली जायची. त्यात सुध्दा गंमत वाटायची.

कदाचित शाईमुळेच त्या शब्दात आपलेपणाचा ओलावा येत असावा. नंतर बॉल पॉईंट पेनमुळे तो ओलावा कमी होत गेल्याचे जाणवले.

आता तर मोबाईलवरच टाईप केल्याने ओलावा सुध्दा काही वेळा कृत्रिम वाटायला लागतो. खरेच या शाईने लिहिलेल्या अशा शब्दात एक आपलेपणाचा गोडवा होता.

पत्राची सुरुवात यापैकी कशानेही झाली, तरीही ते सुद्धा वाचलेच जायचे. आजच्या ई मेल, व्हॉटसअप, फेसबुकच्या जमान्यात या शब्दांची मजा हरवली आहे.

पत्रांच्या ऐवजी आता ई-मेल येतात. यात सुध्दा, **Dear, Sir/Madam, Respected Sir/Madam** अशी सुरुवात आणि **Regards, Yours,** असे लिहून शेवट होतो. यात आपलेपणा जाणवतच नाही. कार्यालयीन आणि कोरडे वाटतात हे शब्द. त्यात नात्यातला ओलावा नाहिच. **Yours faithfully** यापैकी फेथफुली वर तर मला फुलीच (**X**) माराविशी वाटते.

यातही स.न.वि.वि. सारखेच नुसतेच **GM, GN** असे लिहिण्याची सवय आहे. पण सुप्रभात, शुभ रात्री, शुभ रजनीची मजा **GM** (गम) **GN** (गन) मध्ये नाही.


आजकाल फोनवरच बोलणे (त्यातही काही वेळा व्हिडिओ कॉल) होत असल्याने साष्टांग नमस्कार, आशिर्वाद, गोड पापा अशा शब्दांच्या ऐवजी मग ''काय? कसे काय? बाकी सगळे ठीक आहेत ना?'' असे बाकी (चे) विचारुनच नात्यांची शिल्लक (बाकी) विचारली जाते, किंवा पाहिली जाते.

पत्र आले की आनंद व्हायचाच पण मोठे पत्र (अंतर्देशीय) आले की ते व्यवस्थित उघडून (खरेतर फोडून) रविवारच्या पुरवणीसारखे त्याचे वाचन व्हायचे. पण आता हे सगळे हरवले आहे असे वाटते.

अधिक काय लिहू?

कळावे.....

आपला नम्र



आता तरी जगू या रे !

दुपारची वामकुक्षी घेताना गाढ झोपेतच मोबाईल वाजला.जवळपास नाईलाजानाचे फोन उचलला. '' खरंतर फोन स्विचऑफ ठेवायला हवा होता '' मनातंच पुटपुटलो. तेवढ्यात '' अहो, फोन उचलाना, किती वेळ वाजतोय '' हिचा त्रासिक आवाज आलाच.

पाहिलं तर विश्वास चा फोन

'' संजू, अरे निशि गेला .''

'' काय म्हणतोस ?'' मी जवळपास ओरडलोच.

'' हो रे ,मला पण आताच कळलं .विलास चा फोन आला होता. ''छे, खूपच वाईट झालं.साला मीच कमनशीबी.निशिला शेवटचं भेटायचं राहूनच गेलं .काय काय मनात ठरवलं होतं .माझे डोळे भरून आले.

'' अरे तू येतोयस ना ? मालाड ला जावं लागेल ''विश्वासच्या बोलण्याने मी भानावर आलो.

''हो हो . मी तयार होऊन तुझाकडे येतो ,मग जाऊ एकत्र''

'' बरं , मी माझी गाडी काढतो.''

मालाड पर्यंतचा संपूर्ण प्रवास जवळपास शांत होता.मी स्वतःलाच दोष देत बसलो होता.

निशि म्हणजे निशिकांत...आमच्यात वयाने सगळ्यात लहान.

आता जवळपास पन्नास- पंचावन्न चा असावा.आम्ही त्याला आमच्या मैत्रीतलं शेंडेफळ म्हणायचो. आम्ही त्याच्यापेक्षा आठ- दहा वर्षांनी मोठे. मी खरंतर आम चा जूना एरिया सोडल्यानंतर कुणालाच भेटलो नव्हतो... अगदी अलिकडील पस्तीस- चाळीस वर्ष.

'' कश्याने गेला रे तो ?''

मी अचानक विश्वास ला विचारले.

'' अरे ,त्याला आतड्याचा कॅन्सर झाला होता.''

'' मग काय त्याची ट्रिटमेंट चालू होती कि नव्हती? '' माझा प्रश्न.

विश्वास ने थोडं चिडूनच माझ्याकडे पाहिलं पण क्षणात त्याची नजर निवळली.

'' सांगतो तुला नंतर. चल स्मशानभूमी आली ''.

आम्ही बाजूला गाडी पार्क केली आणि आत मध्ये गेलो. जवळपास पंधरा- वीस माणसेच होती. माझ्या ओळखीचं कुणीच दिसत नव्हते.

'' तो बघ , तो भटजीशी बोलतोय तो विन्या... निशिचा मोठा भाऊ आणि पलिकडील ती पिवळसर साडीतली रेखा ...त्याची बहीण.

मी निरखून पहात राहिलो...बापरे ,एवढा बदल त्यांच्या चेहऱ्यात. विन्याला टक्कल पडले होते तर रेखा विधवा दिसत होती. कसे दिसत होते ना लहानपणी ? मी स्वतःशीच बोललो.

'' चल , निशि चे अंतिम दर्शन घेऊ ''

मला जवळजवळ ओढतच विश्वास घेऊन गेला.

सरणावर एक कृश ,शांत ,अनोळखी चेहरा पहात होतो. '' हाच का निशी ? '' विश्वासने नजरेनेच खुणावले .मी बघतंच राहिलो ..आमच्या जुना निशिचा तो चेहरा नव्हताच मुळी...भलताच कुणी वाटत होता.

'' कधी आला विश्वास '' विन्याच्या प्रश्नाने भानावर आलो.

अरे आताच आलो. वाईट झालं रे ...

सुटला म्हण .खूप भोगलं त्यानं.

मी पून्हा वळून निशिच्या चेहऱ्याकडे पाहिलं ...खूप काही भोगल्याच्या खुणा त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होत्या.

''अरे, याला ओळख?'' विश्वास माझ्याकडे पाहून विन्याला म्हणाला..

माझ्याकडे निरखून पाहून विन्याने नकारात्मक मान हलवली ..

'' अरे , हा संजू. संजू सणस ''

विन्याने माझ्याकडे आश्चर्याने पाहिलं ..आणि म्हणाला , '' बापरे , किती बदललास ''

खरंच माझ्यासाठी सगळंच जग बदललं होतं... मित्र, माणसे ..सगळे सगळे.

'' तूझी आठवण काढायचा रे निशि अधूनमधून... त्याला वाटायचं तू येशील कधीतरी भेटायला....पण नाही आलास..नशीब त्याचं आता तरी आलास '' विन्याच्या डोळ्यात पाणी आले ..त्याचा कंठ दाटून आला..जवळचे मित्र ना रे तूम्ही ''

मला काय बोलावे सुचेना. मी खरंच खूप बदललो होतो.अगदी जून्या मित्रांना न भेटण्याइतपत...मैत्रीत नालायक ठरलो होतो.

तेवढ्यात भटजीने आवाज दिला विन्याला... अन् मी सुटलो.मनातून निशीची मनःपूर्वक माफी मागितली...न भेटल्याबद्दव.

चिता पेटली अन् हातपाय धुवून आम्ही निघालो. गाडीत मी निशब्द होतो.खरंच मी नालायकपणा केला होता...जून्या मित्रांना न भेटण्याचा. डोळ्यासमोरून निशि ,विन्या,रेखा हे चेहरेच जाईना...

गाडी आमच्या भागात आली तशी मी विश्वासला म्हटले , '' विश्वास, गाडी मैत्री बारला घे.'' च्यायला बार चे नांव पण मैत्री..मी मनात म्हणालो. आज माझा नालायकपणा जगजाहीर झालाय असे वाटले.विश्वास ने काही न बोलता गाडी पार्क केली व आम्ही निवांत वरच्या एसीत बसलो...फक्त आम्ही दोघेच होतो...हाच निवांतपणा आता अतिशय गरजेचा होता.

काचेचे ग्लास एकमेकांना हलकेच आपटून मी '' चिअर्स '' म्हणालो.

'' चिअर्स, मैत्रीच्या कृतघ्नेसाठी ''...माझ्या डोळ्यात रोखून बघत विश्वास म्हणाला. माझी नजर खाली गेली.

'' भडव्या, तुला किती वेळा बोललो चल मित्रांना भेटूया..भेटूया . काय मिळवलंस एक एक कारण सांगून ? एवढं लेट करून मैत्रीतली एक विकेट पडलीच ना ?''

विश्वास एकदमच अॅटॅकिंग मूड मध्ये आला...पहिल्याच सिप मध्येच. साल्याच्या मनात आज सारी भडास काढायचं दिसतंय ? मी मनात म्हणालो. आज खरंतर त्याने एक माझ्या मुस्काटात मारली असती तरी चालली असती. मी त्याच लायकीचा होतो.

'' तुला माहित आहे , त्याची बॉडी कुठे सापडली? त्याच विठ्ठल मंदिरात, त्याच बाकड्यावर..... तूच त्याला पहिल्यांदाच घेऊन गेला होतास ना? मी इथेच अभ्यास करायचो? इथूनच माझी वैचारीक झाली? इथूनच मी मोठी स्वप्ने पहायला लागलो..वगैरे..वगैरे. अशी मोठी मोठी स्वप्न त्याच्या झोळीत टाकलीस ...अन् तू निघून गेलास आपल्या झोपडपट्टीतून... स्वतःची प्रगती करायला...अरे, तुझ्याच पावलांवर पाऊल टाकून त्याला मोठं व्हायचं होतं...तू आम्हा मित्रांचा आदर्श होतास रे.... ''

विश्वास खरंच आता मोठ्याने रडू लागला होता. बार चा वेटर आमच्याजवळ आला ..तसे त्याला मी बोटानेच खूणावले..चूप रहा..त्याच्या हातात गपचूप शंभरची नोट टेकवली..तो निघून गेला.


मलाच जाणंवलं..आज मी सहज कशी शंभरची नोट '' टीप '' देऊ शकत होतो...अन् तेंव्हा गरीबीत पैसे नसायचे तर पाच रूपयाची भेळ एकत्र हसत खेळत वाटून खात होतो.

'' तू ना खरंच स्वार्थी निघालास, आम्हा मित्रांना विसरून गेलास...कित्येक वर्ष...नशीब तूझा मोठा भाऊ दोन महिन्यांपूर्वी रेल्वे प्लॅटफॉर्मवर भेटला म्हणून तूझा नंबर तरी घेऊ शकलो... तोही बोलला... मी तूला नंबर दिला हे संजूला सांगू नकोस...एवढी दहशत साल्या तुझी?''

आज माझं काहीच खरं नव्हतं. निशीचा चेहरा डोळ्यासमोरून जात नव्हता. ''आय डिझर्व धीस, आय डिझर्व धीस''... मी पुटपुटलो.

मुंबईतल्या एका झोपडपट्टीतील आम्ही सगळे मित्र... अगदी लहानपणापासूनचे.घरची सगळ्यांची गरीबी... म्हणूनच झोपडपट्टीत जन्मलेले, राहिलेले, वाढलेले,घडलेले. मी, विश्वास, सुनील, बाब्या, उमेश, रम्या अगदीच जवळचे अन् आमच्यात लहान शेंडेफळ निशिकांत....निशी. आम्ही सर्व मित्र तसे थोड्या थोड्या अंतरावर रहाणारे...शेजारी..शेजारी नव्हतोच...शेजारचे मित्र वेगळे ..पण आमची सात मित्रांची मैत्री वेगळी.

आमच्यात मैत्री कशीझाली आठवत नाही.. पण गोष्टींच्या पुस्तकांची आवड व देवाण घेवाण... हे महत्वाचे कारण असावे. विन्याकडे खूप पुस्तके असायची. कुठून मिळवायचा देव जाणे? चांदोबा,



रामायण, महाभारत, पांडव प्रताप, सिंदबादच्यासफारी, इसापनिती, जादूच्या गोष्टी, गुप्तहेर कथा, कथा संग्रह, कविता संग्रह, कादंबऱ्या इ. इ. बापरे बापरे... त्यांच्या एवढ्याश्या खोलीत अर्धा माळा पुस्तकांनी व्यापलेला ...तिथेच तो झोपायचा.. राखणदारासारखा... स्वतः फारसा वाचायचा नाही... पण कुणाला द्यायचाही नाही.. त्याची पर्सनल लायब्ररी होती जणू.

मी लहानपणापासूनच अभ्यासात हुशार. पहिला, दुसरा नंबर कधी सोडला नाही. वाचनाची आवड, स्मरणशक्ति चांगली होती. त्यामुळे वाचलेले मित्रांना आवडीने रंगवून सांगायचो. माझी वाचनाची आवड व गोष्टी सांगायची कला बघूनच निशी आमचा मित्र झाला. विन्याची पुस्तके मला चोरून वाचायला द्यायचा...एकाच दिवशी दोन.. दोन.. तीन..तीन सुद्धा. मला अवांतर वाचनाची गोडी त्यानेच लावली.माझे ज्ञानभांडार त्यानेच समृद्ध केले.विन्याला हे कळेपर्यंत फार उशीर झाला होता.आख्खी लायब्ररी त्याची वाचून काढली होती.

हुशार असल्याने वरचा वरचा वर्ग गाठताना अभ्यासा सोबत पुस्तकांची आवड बदलली.साहित्य विश्व, साहित्यिक, व्याख्याने, चर्चासत्रे कळू लागली. यथावकाश इंजिनिअरींगकडे वळालो. सोबतची काही मित्र दहावीलाच गळाले. काहींनी वडिलांसोबत काम ाला सुरुवात केली तर काही जण एरिया सोडून गेले. तरी आमची मैत्री टिकली, भेट होत होती.झोपडपट्टीतील गोंधळापासून अभ्यासासाठी मात्र आम्ही काही मित्र जवळपासच्या विठ्ठल रुक्मिणी मंदिरात जात असू. तेथील पूजारी काका चांगले होते.रात्रभर अभ्यासाला बसू देत.मग आम्ही मित्र वर्गणी काढून मंदिरात भिंतीवरील घड्याळ घेतले, आणखी काही ठिकाणी नवीन ट्यूब लाईट लावल्या. नंतर नंतर आम्हीच त्या गेल्यावर बदलू लागलो... या मंदिरामुळे आपण घडतोय म्हणून.

यथावकाश इंजिनिअर झालो.बालपण जाऊन, तरूणपण आले. अंगकाठी, रंगरूप थोडे बदलू लागले. शेजारी व शिक्षणात मागे राहिलेला मित्र परिवार आता आदराने बघू, वागू आणि बोलू राहिले. हा बदल सुखी वाटला व नकळत आपण कुणी वेगळे आहोत असे अचानक वाटायला लागले. मैत्रीतला अवखळपणा, निरागसताची जागा आता सावध भूमिकेनी घेतली. सरकारी नोकरीला लागलो अन् मित्रही बदलले.

एके दिवशी वडिल व मोठा भाऊ यांनी सार्वजनिक शौचालय असलेली हि झोपडपट्टीच बदलण्याचा निर्णय घेतला व लांबवर घरातच बाथरूम, संडास असलेले हॉल ,बेडरूम असलेले घर घेतले .कारण होते मोठ्या भावाचे होणारे लग्न.

आता रेल्वेने प्रवास वाढला.नोकरीची जबाबदारी, घरातील इतर कर्तव्ये, नवीन ठिकाणी लागणारे सामान, मिळणारा एकच रविवार पहाता शरीर थकू लागले. लग्न झाले. नवीन जबाबदारी आली. मग एकत्र कुटुंब पद्धतीचे सूप वाजले .भाऊ-भाऊ वेगळे.यथावकाश वाटणी वरून भांडणे... अश्या कित्येक व्यापात अडकून मित्र गमावत राहिलो.लांबूनच कुणाकडून कळायचे मित्रांबद्दल. रमेश कुठल्यातरी मुलीला घेऊन पळून गेला प्रेम विवाह करायला, ते दोघे घाबरून परत आले नाही. बाब्याने वडिलांचा स्टोव्ह , गॅसबत्ती दुरूस्ती, सायकली भाड्याने देण्याचा धंदा सुरूच ठेवला. आता ते ही कुणी वापरत नाही म्हणून दुकानात कामाला जातो ते कळाले. परिस्थीती बेताचीच. सुनील कुठेतरी सोसायची वॉचमन म्हणून कामाला लागला. निशीची बायको लग्न झाल्यावर परिस्थितीचा बाऊ करून त्याला सोडून गेली. विश्वास बारावीपर्यंत शिकला म्हणून कुठल्यातरी वकिलाकडे प्रामाणिकपणे राहिला. त्याची मुले चांगली शिकली.

थोडक्यात काय तर मी वगळता पुढे कुणी फारसे शिकलेच नाही, त्यामुळे तिथेच अडकून पडले. नंतर नंतर कळाले ती झोपडपट्टीच रिडेव्हलपमेंटला गेली. बऱ्याच जणांनी चांगल्या पैशात झोपडे विकून लांबवर रहायला गेले. काहीजण तिथेच राहिले.

आमची मजा केलेली, एकत्रित शाळेत गेलोली, पुस्तके वाचलेली, गोट्या, विटी-दांडू, पतंग, कबड्डी इ. खेळ खेळलेली, पडद्यावरचे सिनेमा पाहिलेली, सार्वजनिक नळावरून लाईन लावून पाणी भरलेली, टमरेल घेऊन संडाससाठी लाईन लावलेली झोपडपट्टी तुटली... कायमची... उंच इमारती उभ्या करून... जून्या माणसांना विस्थापित करून... प्रस्तापितांचे स्वप्नवत फ्लॅट बांधून... विखुरले गेले सारे मित्र.

अचानक मोबाईल वरून ''अननोन'' नंबरवरून फोन आल्याने निदान जूना मित्र विश्वास भेटला. त्याच्याकडून

खूप काही कळाले... अगदी मी स्वार्थी आहे ते ही... निशिच्या जाण्याने सगळंच आठवलं. आपली आर्थिक प्रगती खूप झाली... पण मैत्रीत कफल्लक झाल्याचे जाणवले.

''संजू, तू बदललास रे, पण आम्ही मित्र नाही बदललो. तूझ्याविषयी तेच प्रेम, तोच आदर आजही आहे. तू कदाचित आम्हाला वारंवार भेटत राहिला असतास तर आमचं जग बदललं असतं .तू पुढे जाणार आम्हाला जाणवंत होतं पण आम्हालाही दोन पुढे नेशील असे वाटले होते.''

विश्वास खरं बोलून आज मला आरसा दाखवत होता... माझी मलाच जागा दाखवत होता. आयुष्यात मी चांगली नोकरी, फ्लॅट, बंगला, गाडी, बायको, मुले मिळवली... पण... सोन्यासारख्या माझ्या जिवाभावाच्या मित्रांना दुरावलो हे जाणवलं. फार मोठं पाप झालं होतं माझ्या हातून. असाच आमचा जवळचा एक मित्र वृद्धाश्रमात रहातो, हे ऐकलं आणि हातपाय गळून गेले. खरंच आपण बालपणाच्या मैत्रीला जागलो असतो तर... तर कदाचित आज प्रत्येक मित्राकडे थोडे चांगले सकारात्मक चित्र दिसले असते. मी माझेच पाणवलेले डोळे पुसले.विश्वास ला म्हटले, ''जरा बाथरूम जाऊन येतो.''

बाथरूममध्ये येऊन बायकोला फोन लावला ''अगं, मी एक निर्णय घेतलाय. तुला पटेल की नाही माहित नाही, पण आपला तळेगावचा बंगला आता विकूया नको.आपल्याकडे पैश्याची काहीच कमी नाही. तूला चांगली पेन्शन आहे, मला चांगली पेन्शन आहे, मुले परदेशात आहेत, बँक बॅलन्स चांगला आहे.माझ्या एका मित्राला वृद्धाश्रमातून सोडवून तळेगावच्या बंगल्यात ठेवणार अन् माझ्या बालपणीच्या सर्वच म्हाताऱ्या मित्रांना एकत्रित बोलवून आमचे बालपण पून्हा जगणार. चालेल ना?''

बायको पलीकडून हसत म्हणाली, ''अहो, नेहमीचे त्या बालपणीच्या मित्रांच्या आठवणीत रमून दुःखी होत होतात, परमेश्वराने आता संधी दिलीय पुन्हा एकत्र येण्याची. खुशाल करा हवं ते पण तूम्हा मित्रांचा धुडगूस बघायला मी येणार अधूनमधून.''

बायकोरूपी परमेश्वराचे आभार मानले...माझ्या सद् बुद्धिला बळ दिल्या बद्दल. मनापासून बाथरूम मध्ये हलका झालो व प्रसन्न मनाने बाहेर आलो.

विश्वास माझी वाटंच बघत होता. ''भोसडीच्या अजून पाच मिनिट बाहेर आला नसतास ना तर बाथरुमचा दरवाजाच तोडला असता... सालं टेन्शन आलं ना... तूला ॲटॅक बिटॅक आला नाही ना म्हणून? दारूच उतरली साली''...

हे असे येडझवे मित्र....कुणाला नकोय?.

''विश्वास, आता मी काय म्हणतोय ऐक. आपण सगळेच रिटायर्ड... साठी पार केलेले. उद्याच्या उद्या तो कोण मित्र आहे वृद्धाश्रमात? त्याला उचलायचं, माझ्या तळेगावच्या बंगल्यात न्यायचं. सगळी सोय आहे, टेन्शन नको. दुसरं म्हणजे आपल्या सगळ्या मित्रांचा कॉन्टॅक्ट शोधून काढ ,सगळ्यांना एकत्र करू.. मी नालायक पून्हा भेटलो म्हणून सांग... आठवणीत खूप भेटलो आता प्रत्यक्षात भेटायचंय... पून्हा आपलं बालपणीचं आयुष्य जगायचं... आपलं वय, ऐपत सगळं सगळं विसरून. त्यावेळी परिस्थितीमुळे आपण संकुचित आयुष्य जगलो, आता खरं समृद्ध आयुष्य जगू यारे... अगदी मनसोक्त... एवढं करशील ना रे ?

विश्वासच्या डोळ्यात पाणी थरारल्याचं जाणवलं... त्याला जूना संजू पून्हा दिसला... कोवळ्या वयाचा... निरागस मैत्रीचा!

आता मी मनातल्या मनात वयस्कर व गरजू मित्रांसाठी सुप्त इच्छा पूर्ण करण्याचा निर्धार केला होता...

- माझा तळेगावचा बंगला फक्त या व समवयस्क मित्रांसाठीच
- सर्वांचा मेडिकल चेकअप व औषधोपचार
- दररोज योगा व सकस आहार
- सहा महिन्यातून एकदा समुद्र किनारी पिकनिक
- त्यांचे मन रिजवण्यासाठी लायब्ररी, संगीत साज वगैरे...वगैरे

उशिरा का होईना मला शहाणपण सुचलं...आता हे मित्र मला लवकर गमवायचे नव्हते एवढंच खरं...

– संजय एकनाथ गायकवाड



दोन पिढ्यांमधील संवाद आणि विसंवाद

आज वयाची साठी-सत्तरी गाठलेल्यांना राहून-राहून जुना रम्य काळ, जुने मंतरलेले दिवस आठवत असतात. बहुतेकांसाठी या आठवणी म्हणजे स्मरणरंजन असते आणि ते साहजिकच आहे. मात्र जे लोक ''काळ फार कठीण आलाय'', ''आमच्यावेळी असं नव्हतं'', किंवा ''यापुढे काय-काय पाहायला मिळणार याची कल्पनाच करता येत नाही'', अशा प्रकारची वाक्यं म्हणत कायम उसासे टाकण्याच्या चक्रात अडकतात, ते त्यांच्यासाठी तर सुखद नसतंच, पण इतरांसाठीही त्रासदायक ठरतं. जुना काळ साधेपणामुळे चांगलाच होता यात शंका नसली; तरी काळाच्या प्रवाहात सगळ्यांनाच पुढे जावे लागते आणि मनात असो अथवा नसो, काळानुसार घडणारे बदल स्वीकारावे लागतात ही वस्तुस्थिती कुणालाच नाकारता येणार नाही.

खरं तर प्रत्येकच पिढी शैशव, युवावस्था, तारुण्य आणि मग वृध्दावस्था पार करून ज्येष्ठ नागरिक होण्यापर्यंतचा टप्पा गाठते. पण गंमत म्हणजे प्रत्येक अवस्थेत त्या-त्या वयातील आपले विचार योग्य आणि इतर वयांच्या व्यक्तींचे विचार चुकीचे वाटतात, हे सार्वत्रिक चित्र आहे. म्हणजे आज मध्यमवयीन तरुण असणाऱ्यांना वयोवृध्दांची विचार करण्याची पध्दत काळाच्या मागे असल्याचे वाटते आणि त्याच वेळी किशोरावस्थेतील स्वतःच्या मुला-मुलवागणे- बोलणे पाहून त्यांचे भवितव्य कसे राहील याची चिंता सतावते.

आज अनेक घरांमध्ये फक्त आई-वडील आणि एक किंवा दोन मुले इतकेच कुटुंब दिसत असले, तरी भारतीय समाजात बहुतांश कुटुंबांमध्ये अद्यापही ज्येष्ठ नागरिक, म्हणजे आजी- आजोबांचे अस्तित्व आहे. अशा घरांमध्ये तीन पिढ्यांचे सहजीवन असते. काळ खरोखरच इतक्या झपाट्याने बदलत चालला आहे, की या तीन पिढ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या लोकांमध्ये विचार करण्याची पध्दत, वागण्याची पध्दत, वर्तणूक, सवयी, ज्ञानार्जनाची आणि करमणुकीचीही साधने, म्हणजे थोडक्यात रोजच्या जीवनातील सर्वच बाबतीत फार मोठी तफावत दिसून येते. या तिन्ही पिढ्यांमध्ये समन्वय राहून बहुतांश बाबतीत त्यांचे एकमत आहे, असे दृश्य एकतर दुर्मीळ आहे आणि ते तसे दिसलेच, तर तो अपवाद आहे असे नि:संशय समजावे. आणि या पिढ्यांमध्ये समन्वय आहे की विचारांमध्ये मोठी तफावत, यावर त्यांच्यात संवाद आहे की विसंवाद, ही बाब अवलंबून आहे.

समाजजीवनात होत गेलेल्या या बदलांचा थेट परिणाम पिढ्यांमधील संवादाऐवजी विसंवाद वाढण्यात झाला. काळ बदलला आहे हे लक्षात न घेता ''आमच्या वेळी असं होतं'' किंवा ''आमच्या वेळी असं नव्हतं''चा घट्ट पगडा असलेल्यांना नव्या पिढीच्या बहुतांश गोष्टी खटकत राहतात. याची अनेक उदाहरणं घरोघरी रोजच पाहायला मिळतात. वास्तविकत: अशाप्रकारे होत असलेल्या विसंवादाला नेहमीच दोन बाजू असतात आणि प्रत्येकजण स्वत:चीच बाजू खरी मानत असतो, हे प्रत्येक विसंवादाचे मूळ आहे. आजवरच्या आयुष्यात आपण ज्या भूमिका घेतल्या आणि ज्या सवयी अंगी बाणवल्या, त्या तशाच कायम ठेवायच्या, त्यात तसूभरही बदल करायचा नाही ही जुन्या पिढीतील लोकांची मनोभूमिका ही बाब दोन पिढ्यांमधील संवादासाठी सर्वात घातक ठरते. ''मोडेन पण वाकणार नाही'' हाच स्वभाव कुणी कायम राखला, तर संवाद होणार कसा? काळ तर इतक्या वेगाने पुढे जात असतो, की त्याचे संदर्भ सतत बदलत असतात. त्यानुसार जो स्वत:ला बदलत नाही, तो काळाच्या शर्यतीत मागे पडतो. या संदर्भात, बदल न केल्यामुळे शर्यतीत मागे पडलेल्या एचएमटी घड्याळासारखी अनेक उदाहरणे आपण वाचलेली असतात, परंतु स्वत:ला बदलण्याची कृती प्रत्यक्षात आणणे अनेकांना मान्य नसते. किंबहुना, ''मी जन्मभर बदललो/ बदलली नाही, मग आता का बदलू?'' अशीच त्यांची भूमिका असते. हीच भूमिका व्यक्तींमधील सतत घर्षणाचे कारण ठरते.

दोन पिढ्यांमधील वादाचे प्रमुख मुद्दे :

जुन्या वस्तूंचा लोभ

आपल्या काळातील जुन्या वस्तू खराब झाल्या, तुटल्या-फुटल्या तरीही आठवण म्हणून त्या जपून ठेवण्याची जुन्या पिढीची सवय वादाला कारणीभूत ठरते. हल्ली घरे लहान असल्यामुळे अडगळ साठवून ठेवण्यासाठी फारसा वावच नसतो. अशावेळी निकामी ठरलेल्या वस्तू निकाली काढून जागा मोकळी करण्याला नव्या पिढीचे प्राधान्य असते. मात्र अशा निरुपयोगी वस्तू जपून ठेवण्याबाबत घरातील वयोवृध्द दुराग्रही असल्यास खटके ठरलेलेच.

घरच्या लोकांच्या बोलण्याचा विपर्यास करणे

घरात कोण काय बोलते, याकडे आपला संबंध नसतानाही कान देण्याची वाईट खोड जुन्या लोकांना असते. अनेकदा अर्धवट कानावर पडलेल्या बोलण्याचा स्वत:च अर्थ काढून घरच्यांशी वाद घालणे ही पुढची पायरी. माझ्या माहितीतील एक उदाहरण देतो. घरातील लोक आपसात हळू आवाजात काही बोलत असतील, तर ते आपल्याबद्दलच बोलतात असा या घरातील वृद्ध स्त्रीचा ग्रह होतो. काहीही अर्थ नसलेला तिचा हा गैरसमज दूर करणेही कठीण असल्यामुळे घरातील लोकांमध्ये परस्पर अविश्वासाचे वातावरण निर्माण होते.

'माझंच खरं' मानण्याची सवय


घरातल्या लोकांचा एकमेकांशी संवाद असणे आवश्यक आहे. त्यासाठी विशेषत: कौटुंबिक व इतर संबंधित बाबींवर सर्वांची चर्चा व्हायला हवी. मात्र या चर्चेत आपले मत मांडताना लवचिकता असावी. 'मी जग पाहिले आहे. त्यामुळे मी सांगतो/सांगते तेच खरे, इतरांना माझ्याइतके कळत नाही' अशी भूमिका कुणी घेत असेल तर चर्चेतून निष्पन्न तर होत नाहीच, शिवाय एकमेकांबद्दल मतेही कलुषित होतात. ''मी म्हणतो तेच खरं'' अशी दुराग्रही भूमिका घेणाऱ्या (बव्हंश जुन्या पिढीतील वयोवृध्द) लोकांमुळे संवादाचे मार्गच बंद होतात आणि दोन पिढ्या जेथे एकत्र नांदतात त्या घरातील वातावरण कायम तणावाचे आणि आनंदरहित असते.

गरज नसताना मत मांडणे

घरातील कुणी विचारले नसताना आणि सुरू असलेल्या चर्चेशी आपला संबंध नसताना मध्येच नाक खुपसून आपले मत देणे, ही अनेक वयोवृध्दांना असलेली आणखी एक वाईट खोड. मुळात हे भान सगळ्यांनीच पाळायला हवे. जुन्या पिढीचा अनुभव आणि अनेक बाबतीत त्यांना असलेली माहिती या बाबी लक्षात घेऊन नव्या पिढीने त्यांना सल्ला विचारला, तर तो देणे अपेक्षित व त्यामुळे आवश्यकही आहे. मात्र कुणीही विचारले नसताना सगळ्या बाबतीत हस्तक्षेप करून स्वत:च सल्ला देणे आणि इतरांनी तो मानायलाच हवा अशी अपेक्षा बाळगणे अतिशय चुकीचे आहे. यामुळे घरच्यांनी वयोवृध्दांना टाळण्याची सुरुवात केली, तर त्यात आश्चर्य ते काय?

आर्थिक मुद्दे

आर्थिक बाबी हा वादाचे कारण ठरणारा आणखी एक मुद्दा. याला दोन बाजू असतात. बहुतांश बाबतीत वृध्द मातापिता मुलांवर अवलंबून असतात आणि त्यामुळे त्यांच्यात असहायतेची व असुरक्षिततेची भावना असते. इकडे मुलगा आणि सून यांना वाढती महागाई, मुलांच्या शिक्षणाचा वाढता खर्च, समाजात स्टेटस राखण्यासाठी करावे लागणारे खर्च इत्यादींची जुळवणी करताना नाकीनऊ येत असल्याने वृध्दांनाही स्वत:चे काही खर्च असतात याचा बरेचदा विसर पडतो, किंवा



त्या मुद्द्याकडे त्यांचे दुर्लक्ष होते. या मुद्द्यावर दोन्ही पिढ्यांचे लोक एकमेकांशी बोलत नसल्यास त्यातून मार्ग निघणे कठीण जाते.

मुलांच्या संसारात हस्तक्षेप

मुले लहान असतात तोवर पालकांनी त्यांना आज्ञा पाळायला सांगणे हे समजण्यासारखे आहे. परंतु शेवटपर्यंत आपलाच शब्द अंतिम असावा, असा जुन्या पिढीचा हट्ट घरातील वातावरण बिघडण्यास आणि विसंवाद सुरू होण्यास कारणीभूत ठरतो. काही कुटुंबांमध्ये मुलांचे लग्न झाले, त्यांचा संसार सुरू झाला तरीही त्यांनी आपली प्रत्येक गोष्ट ऐकावी अशी स्वत:चा संसार उतरणीला लागलेल्या वयोवृध्दांची अपेक्षा असते. अनेकदा मर्यादा ओलांडून मुलांच्या संसारात, त्यांच्या निर्णयांमध्ये हस्तक्षेप केला जातो. अशावेळी दोन पिढ्यांमध्ये संघर्ष झाला नाही, तरच नवल. वृध्दांनी जास्त पावसाळे पाहिलेले असतात, त्यांच्या अनुभवाचा तरुणांना उपयोग होऊ शकतो इथवर ठीक आहे. मात्र आपल्याला नको असताना देण्यात आलेले अनाहूत सल्ले आणि आपल्या निर्णयप्रक्रियेत व अधिकारांमध्ये हस्तक्षेप, या बाबी दोन पिढ्यांमध्ये खटके उडण्यास कारणीभूत ठरतात. यासाठीच आपल्या संस्कृतीत वानप्रस्थाश्रमाची संकल्पना होती. मात्र त्याचा मूळ उद्देश – घरच्या बाबींपासून हळूहळू अलिप्त होणे– लुप्त झाला आहे असे खेदाने म्हणावेसे वाटते.

नव्या पिढीबद्दल सतत तक्रार

येणारी प्रत्येक पिढी आधीच्या पिढीपेक्षा चार पावले पुढे, अधिक हुशार असते हे सर्वमान्य झालेले गृहीतक आहे. त्यानुसार, हल्लीची मुले/ मुली यांचे विचार, भाषेतील बदल आणि काळानुरूप नवनव्या शब्दांचा अंगिकार, नवे तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी नवी तांत्रिक उपकरणे हाताळणे यामुळे ही पिढी 'स्मार्ट' आहे हे कुणीही सांगू शकेल. नव्या काळानुरूप त्यांनी वस्तूंची ऑनलाईन खरेदी करणे, खाण्याचे पदार्थ ऑनलाईन ऑर्डर करणे इ. बाबी रूढ झाल्या आहेत. मात्र जुन्या पिढीला त्यांची प्रत्येकच गोष्ट खटकते व ते मुलांना त्याबद्दल सतत टोकत असतात. त्यामुळे वादावादी होऊन घरातील वातावरण गढूळलेले राहते. जुन्या पिढीने नव्या पिढीवर संस्कार करू नये असा याचा अर्थ नाही, मात्र त्याच्या मर्यादा त्यांनी स्वत:च ओळखून असावे. अशाप्रकारे अनेक बाबतीतील तफावत हेच पिढ्या– पिढ्यांमधील विसंवादाचे मुख्य कारण आहे. प्रामुख्याने वरील वादग्रस्त मुद्द्यांमुळे कुटुंबांमधील संवाद हरवतो आणि विसंवाद जन्माला येतो. मात्र याला अपवाद असणारीही घरे आहेतच.

आपला काळ संपत आला आहे याची जाणीव ठेवून नव्या पिढीशी जुळवून घेत घरातील वातावरण खेळीमेळीचे आणि आनंदी ठेवण्याचे प्रयत्न करणारे वृध्द आहेत. त्यांच्या या वागणुकीमुळे नवी पिढीही त्यांचा योग्य तो आदर राखून त्यांच्या सल्ल्यानेच म हत्त्वाचे निर्णय घेण्याचा प्रयत्न करते. अशा आदर्श घरांचे उदाहरण डोळ्यांपुढे ठेवून त्यांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न समाजातील जास्तीत जास्त कुटुंबांमध्ये झाल्यास जुन्या– नव्या पिढ्यांमधील संवादाचे वातावरण सर्वत्र निर्माण होईल, अशी आशा करूया.

– मनोज जोशी

विनोद



निवृत्तीचा आनंद:

निवृत्त झाल्यावर एका आजोबांना विचारलं, ''आता दिवस कसा जातो?''

आजोबा: ''पूर्वी घड्याळाकडे पाहून काम करायचो, आता कामच नसल्यामुळे घड्याळाकडे पाहायचंच काम नाही!''

***

राजूला कुत्रा घेऊन फिरताना पाहून मनूने विचारले, 'तुझा कुत्रा चावतो का?'

राजूला म्हणाला, 'छे! अजिबात नाही.' मनूने कुत्र्याशी खेळण्याचा प्रयत्न केला. कुत्र्याने त्याचा कचकचीत चावा घेतला. 'ओय ओय' करीत

मनू म्हणाला, 'तू काय म्हणालास तुझा कुत्रा चावत नाही!'

राजू उत्तरला, 'पण, हा माझा कुत्रा नाही!





समाजातील बदलांकडे ज्येष्ठांची नजर

समाज हा सतत बदलणारा घटक आहे. काळानुसार माणसाच्या विचारसरणीत, जीवनशैलीत, संस्कृतीत, शिक्षणपद्धतीत आणि सामाजिक संबंधांमध्ये बदल होत असतात. प्रत्येक पिढी आपल्या काळानुसार नवीन अनुभव घेते आणि समाजाच्या विकासात योगदान देते. आजच्या आधुनिक युगात विज्ञान, तंत्रज्ञान, औद्योगिकीकरण आणि जागतिकीकरणामुळे समाजात मोठ्या प्रमाणावर परिवर्तन घडून आले आहे. या बदलांकडे ज्येष्ठ नागरिकांची नजर पाहिली, तर त्यामध्ये अनुभव, आठवणी, समाधान, चिंता आणि भविष्याविषयीच्या अपेक्षा यांचे मिश्रण दिसून येते.

ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या आयुष्यात समाजाचे अनेक टप्पे अनुभवलेले असतात. त्यांच्या तरुणपणी जीवनशैली साधी होती. कुटुंबातील सदस्य एकत्र राहत असत. संयुक्त कुटुंबपद्धती, पारंपरिक व्यवसाय, शेती आणि स्थानिक रोजगार यांना विशेष महत्त्व होते. लोकांमध्ये प्रत्यक्ष संवाद, परस्पर सहकार्य आणि सामाजिक बांधिलकी अधिक होती. सण, उत्सव, लग्नसमारंभ आणि सामाजिक कार्यक्रमांमध्ये संपूर्ण गाव किंवा परिसर सहभागी होत असे. त्या काळात भौतिक सुविधा मर्यादित असल्या तरी मानवी नात्यांमधील जिव्हाळा आणि विश्वास अधिक असल्याचे अनेक ज्येष्ठ नागरिक सांगतात. आजच्या काळात समाजाचे स्वरूप मोठ्या प्रमाणावर बदलले आहे. शिक्षणाचा प्रसार, महिलांचे सक्षमीकरण, औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे माणसाच्या जीवनात अनेक सकारात्मक बदल झाले आहेत. पूर्वी शिक्षणाच्या मर्यादित संधी होत्या; मात्र आज मुला-मुलींना उच्च शिक्षण, परदेशात शिक्षण घेण्याची संधी आणि विविध व्यावसायिक क्षेत्रांत करिअर करण्याची मुभा उपलब्ध आहे. महिलांनी शिक्षण, विज्ञान, अभियांत्रिकी, राजकारण, क्रीडा आणि उद्योग अशा विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय प्रगती केली आहे. या बदलांकडे ज्येष्ठ नागरिक अनेकदा अभिमानाने पाहतात. तंत्रज्ञानातील प्रगती हा समाजातील सर्वात महत्त्वाचा बदल मानला जातो.

पूर्वी पत्रव्यवहारासाठी अनेक दिवस लागत असत; आज मोबाईल आणि इंटरनेटच्या साहाय्याने जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात काही सेकंदांत संपर्क साधता येतो. डिजिटल बँकिंग, ऑनलाइन खरेदी, व्हिडिओ कॉल, ई-लर्निंग आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांमुळे मानवी जीवन अधिक गतिमान झाले आहे. ज्येष्ठ नागरिकांनाही या तंत्रज्ञानाचा फायदा होत आहे. घरबसल्या बँकेचे व्यवहार करणे, डॉक्टरांचा सल्ला घेणे आणि नातेवाइकांशी संवाद साधणे शक्य झाले आहे. मात्र, तंत्रज्ञानाचा अतिवापर आणि प्रत्यक्ष संवादाचे कमी होणारे प्रमाण याबाबत त्यांना चिंता वाटते. कुटुंबव्यवस्थेतील बदल हा ज्येष्ठांच्या दृष्टीने एक महत्त्वाचा विषय आहे. पूर्वी संयुक्त कुटुंबपद्धतीमध्ये आजी-आजोबा, आई-वडील, मुले आणि इतर नातेवाईक एकत्र राहत असत. त्यामुळे मुलांवर संस्कार होणे, अनुभवांची देवाणघेवाण होणे आणि संकटाच्या वेळी एकमेकांना आधार देणे सहज शक्य होते. परंतु, आज नोकरी, शिक्षण आणि व्यवसायाच्या कारणामुळे विभक्त कुटुंबपद्धती वाढत आहे. यामुळे ज्येष्ठ नागरिकांना अनेकदा एकटेपणा जाणवतो. काही वेळा वृद्धाश्रमांची वाढती संख्या आणि कुटुंबातील संवादाचा अभाव या गोष्टी त्यांना अस्वस्थ करतात. तथापि, ज्येष्ठ नागरिक समाजातील सर्व बदलांकडे नकारात्मक दृष्टीने पाहतात असे नाही. आजच्या तरुण पिढीमध्ये आत्मविश्वास, स्वतंत्र विचार, संशोधनाची वृत्ती आणि नवीन गोष्टी शिकण्याची तयारी दिसून येते. तरुणांनी पारंपरिक चौकटींच्या बाहेर जाऊन स्वतःचे करिअर निवडणे, नवीन व्यवसाय सुरू करणे आणि जागतिक स्तरावर स्वतःची ओळख निर्माण करणे ही निश्चितच सकारात्मक बाब आहे. ज्येष्ठांच्या अनुभवातून मिळणारे मार्गदर्शन आणि तरुणांच्या आधुनिक विचारसरणीचा संगम झाला, तर समाज अधिक सक्षम होऊ शकतो. समाजातील बदलांमुळे काही गंभीर समस्या देखील निर्माण झाल्या आहेत. वाढते प्रदूषण, नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास, सायबर गुन्हे, सोशल मीडियाचा गैरवापर, बेरोजगारी आणि मानसिक तणाव या आधुनिक समाजापुढील मोठ्या समस्या आहेत.

पूर्वीच्या तुलनेत भौतिक सुविधा वाढल्या असल्या तरी माणसाच्या जीवनातील समाधान आणि मानसिक शांतता कमी होत असल्याची भावना काही ज्येष्ठ व्यक्ती व्यक्त करतात. विशेषतः सोशल मीडियामुळे प्रत्यक्ष भेटीगाठी आणि संवाद कमी होत असल्याचे त्यांना जाणवते. या परिस्थितीत ज्येष्ठ नागरिकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्यांच्याकडे जीवनाचा प्रदीर्घ अनुभव, सामाजिक ज्ञान आणि नैतिक मूल्यांचा मोठा ठेवा आहे. तरुण पिढीने त्यांच्या अनुभवाचा आदर करून योग्य मार्गदर्शन स्वीकारले पाहिजे. त्याचप्रमाणे ज्येष्ठ नागरिकांनीही बदलत्या काळानुसार नवीन तंत्रज्ञान, आधुनिक विचार आणि सामाजिक परिवर्तन समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. दोन्ही पिढ्यांमध्ये संवाद, सहकार्य आणि परस्पर आदर असणे आवश्यक आहे. अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञानाच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीनेही

ज्येष्ठांच्या अनुभवांना महत्त्व आहे. नवीन तंत्रज्ञान विकसित करताना समाजातील सर्व वयोगटांच्या गरजा लक्षात घेणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, ज्येष्ठ नागरिकांसाठी वापरण्यास सोपी डिजिटल उपकरणे, स्मार्ट आरोग्य निरीक्षण प्रणाली, आपत्कालीन सूचना यंत्रणा आणि सुरक्षित सार्वजनिक वाहतूक व्यवस्था विकसित करणे ही काळाची गरज आहे. तंत्रज्ञानाचा खरा विकास तेव्हाच मानला जाईल, जेव्हा त्याचा लाभ समाजातील प्रत्येक घटकाला मिळेल. शेवटी, समाजातील बदल ही काळाची अपरिहार्य गरज आहे. जुन्या पिढीचे अनुभव आणि नवीन पिढीचे विचार यांचा समन्वय साधणे अत्यंत आवश्यक आहे. ज्येष्ठ नागरिकांनी परंपरेतील चांगली मूल्ये जपावीत आणि तरुणांनी आधुनिकतेचा स्वीकार करताना सामाजिक जबाबदारी विसरू नये. कारण प्रगत समाजाची निर्मिती केवळ आधुनिक तंत्रज्ञानाने होत नाही, तर मानवी मूल्ये, संस्कार, सहकार्य आणि परस्पर आदर यांच्या आधारावर होते.

– अश्विनी राजे
खोपोली.





भातपुराण

क्या भात है!!

आधी भात शिजवायला ठेवा मग पुढे वाचा. वाचून होईपर्यंत भात तयार होईल. आमटीभात, वरणभात, दहीभात, ताकभात, कालवणभात, पिठलंभात, केशरीभात, वगैरे. सांप्रत काळात भारत देशात डाएट नावाच्या फॅडने किंवा स्टाईलने भात किंवा तांदूळ ह्या आपल्या लाडक्या आणि आवडत्या अशा पदार्थावर फार मोठी कुरघोडी करायला लावली आहे.

विकेट किपिंग करताना जांभया दिल्याबद्दल पाकिस्तानी कॅप्टन सरफराज अहमद जितका बदनाम झालाय त्यापेक्षा काकणभर जास्तच बदनामी डाएट ह्या प्रकाराने भाताची केलेली आहे. आणि समस्त भारतीयांसाठी ही गोष्ट खचितच महान चिंतेची बाब आहे.

भारत ह्या शब्दाची व्युत्पत्तीच मुळात 'भात जेवण्यात रत असलेल्या लोकांचा देश' अशी व्हायला हवी होती आणि तेच जास्त संयुक्तिक झालं असतं नाही का. ज्या देशाच्या नावातच भात लपलेला आहे अशा लोकांनी भात सोडणे किंवा वजन वाढते म्हणून त्याला त्यागणे म्हणजे ऑस्ट्रेलियाने स्लेजिंगचा त्याग केल्यासारखं होईल.

भारतीय माणसाने आमटी भाताला नाही म्हणणे म्हणजे आम टीभाताचा घोर अपमान, म्हणजे स्टीव्ह बकनरने सचिनला नॉट आऊट देण्यासारखं आहे. बकनरने सचिनला खोटं आऊट देऊन आपलं नाव

राखावं आणि आपण आमटीभात जेवून आपलं.

मी एक भारतीय आहे. भारत माझा देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहेत आणि देशातल्या प्रांतागणीक विविधतेने नटलेल्या भाताच्या परंपरांचा मला अभिमान आहे.

उत्तरेला काश्मीरी पुलाव पासून ते दक्षिणेकडील तामिळ रस्सम भाता पर्यंत, द्वारकेच्या गुज्जू कढी खिचडी पासून ते ओरिसा, बंगालच्या मच्छी भातापर्यंत, महाराष्ट्रातल्या केशरी भाता पासून ते हैदराबादेतल्या बिर्याणी पर्यंत, कर्नाटकातल्या बिशीब्याळी अन्नम पासून ते लखनवी बिर्याणी पर्यंत भाताच्या सर्व परंपरांची आणि विविधतेने नटलेल्या परंपरांची मला आवड आणि अभिमानही आहे.

भारतात शेतीचं युग असल्यापासून आद्य पिकांमध्ये असलेलं धान्य सर्वार्थाने तांदूळच असेल. अनेक वर्षं चुलीवर शिजत असलेला भात गॅसवर आला आणि पेज हा पदार्थ गायब व्हायला सुरुवात झाली.

कुकर ह्या प्रकाराने भात शिजवण्याची पद्धत क्रिकेट मधल्या टी ट्वेंटीसारखी करून ठेवली आहे. मॅच चालू होऊन कधी संपते हे कळतही नाही. एरव्ही सोय म्हणून मान्य आहे पण निवांत असू तेव्हा गॅसवर खरी 'कसोटी' म्हणजे कुकर शिवाय भात लावायला हवा.

अस्सल भाताची मजा त्यात आहे. खरंतर तांदूळ शिजवायला ठेवून त्याचा अप्रतिम सुगंध हळूहळू स्वयंपाकघरात पसरायला हवा. पण कुकर फिल्डिंगला येतो आणि त्याला ह्या सुगंधाचा कॅच काही पकडता येत नाही. तो कायम ड्रॉपच होतो.

भाताची एक गम्मत आहे. भात हा एकटा कधीच नांदत नाही. तो जेव्हा एकटाच असतो तेव्हा त्याचं रुक्ष पिंड होतं. पण त्याच्या मुदीला गोडंवरणाची, लिंबाच्या फोडीची, आणि वरून तुपाच्या धारेची साथ मिळाली आणि एखाद तुळशीपत्राचं टॉपिंग मिळालं की त्याचा नैवेद्य होतो, पण वरणभात तुप आणि लिंबू किंवा लिंबाचं लोणचं म्हणजे स्वर्ग सुखच. **रिष्ता वही है किंतु सोच नई है.**

चित्रान्न आणि लेमन राईस हे राखीव खेळाडू, काही वेळेस अशी धमाल उडवून देतील की उंगलियां चाटते रह जाओगे.

गोडंवरण भात म्हणजे हृषीकेश मुखर्जींचा सिनेमा असेल तर नॉनव्हेज बिर्याणी ही वेबसिरीज आहे. रसिक माणूस या दोन्ही गोष्टी एकत्र एन्जॉय करू शकतो. जो एकावरच अडून राहतो त्याचं आयुष्य अगदीच निरस आणि एकसुरी ठरतं.

वरण, आमटी, रस्सा, रस्सम, कालवण, कढी, सांबार, पिठलं हे भाताचे शाश्वत सोबती आहेत. त्यांना कुणीही भाता पासून वेगळं करू शकत नाही, त्यांनी भाताची साथ शेवटपर्यंत देणं अलिखित नियम आहे. डाळीच्या प्रमाणासोबत त्या दोघांचं नातं घट्ट होत जातं. कधीकधी आमटीची माया पातळ होते आणि भाताच्या उदार फटींमधून द्रव पदार्थ ताटभर पसरतो. सुखाच्या आठवणीं सारखी डाळच शिल्लक राहते. अशावेळी त्यांचा संसार अर्ध्यावरती डाव मोडल्याचा भास होतो. भातुकलीच्या खेळामधल्या राजाराणी सारखा.

चिंचं, गूळ, आमसूल, आगळ, कढिलिंबं, मिरच्या, कैरी, शेगटाच्या शेंगा, क्वचित वांगी, टोमॅटो खरे टेस्टमेकर्स आहेत. नागपुरात वांगी भात अतिशय आवडता आहे त्यांच्यामुळे गेमला एलिगन्स आहे. ही व्यंजनं ज्याला आवडत नाहीत, त्याचं आयुष्य फोल आहे.

जीरा राईसमधलं तडतडलेलं जिरं, दही बुत्तीमधली उडदाची डाळ, पुलावातलं तमालपत्र, कढी खिचडी मधली लवंग, काश्मिरी पुलावामधले काजू इत्यादी इत्यादी जेवणाच्या कहानणीमधले ट्विस्टस आहेत, ते शोधून ज्याला एन्जॉय करता आले त्याचं खाद्य जीवन आनंदी आणि परीपूर्ण ठरतं.

आमटी आणि भाताचा संसार मला उमा महेश्वरांच्या संसारसारखा वाटतो. जेवणाने कितीही वेगवेगळे अवतार घेतले तरी सरतेशेवटी संध्याकाळी भात आमटी बरोबर पानात समोर आला की पोटात अगोदरच शांतता नांदायला लागते, आणि व्वा तोंडातून आपसूकच येतो.

मऊ भात किंवा गरगट्ट भात ह्या बरोबर मेतकुटाने वेळ मारून नेता येते. थोडा ओव्हर रेटेड. बाकी परफॉर्मन्स फक्त वेळ मारून नेण्या इतकाच. भाताची खरपुडी म्हणजे अगदी कव्हर ड्राइव्ह. सायीच्या दुधाची किंवा सायीच्या दह्याची साथ मिळाली की सोनेपे सुहागा असतो. मग त्याबरोबर तोंडी लावायला कही लागतंच

असं नाही.

फोडणीचा भात हा नाईट वॉचमन असतो. आदल्या रात्रीचा त्याचा गेम दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सेशनपर्यंत आरामात चालतो. शेंगदाणे आणि सांडगी मिरची हे दोघे नॉन स्ट्रायकिंग एन्डला असले की, चुरचुरीत फोडणीच्या भाताचा गेम विशेष बहरतो वगैरे.

खिचडीची तुलना कशाशीही होऊ शकत नाही. कमी वेळात अगदी मनसोक्त खाता येईल आणि तृप्ततेचा आनंद देऊन जो रोल दिया है उसको निभानेका फर्ज वो बहोत अच्छे तरिकेसे अदा करती है. आणि कढीची साथ असेल तर स्वर्गसुखाचा आनंद देण्यात कसूर करत नाही.

पोट व पिच बिघडलंय आणि विकेट पडताहेत अश्या सिच्युएशनमध्ये पिचवर उभं राहायलाच हवंय, कंटाळा आलाय आणि तरीही एक बाजू सांभाळायची आहे, अचानक घरी कोणीतरी आलंय आणि आस्कींग रेट वाढला आहे, किंवा अगदी हौस म्हणून साग्रसंगीत टेक्निकल आणि निवांत बॅटिंग करायची आहे– अश्या सगळ्याला पर्याय फक्त राहुल द्रविड आणि खिचडी हाच असू शकतो. साथीला भाजलेला पोह्याचा पापड, सांडगी मिरची, एखादी कोशिंबीर असली तर नुसती इनिंग सांभाळली जात नाही तर फॉलोऑन मिळालेली अख्खी मॅच जिंकली जाऊ शकते.

रात्रीच्या जेवणात भातापेक्षा सूप सलाड घेणाऱ्या लोकांचं मला कौतुक वाटतं. आणि त्यांना समाधान असतं डाएट सांभाळल्याचं. (सूप आणि सलाड लोकं रात्रीच्या जेवणात 'घेतात'. हे केवळ तुम्हाला दाखवण्यासाठी की आम्हीं तुमच्यापेक्षा वेगळे आहोत. तुम्ही मात्र भात 'जेवता').

एकंदरीतच आमटी भाताचं पोटभर जेवण म्हणजे उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म असतं. दाल रोटी खाओ, प्रभू के गुण गाओ ही अध्यात्माची पहिली पायरी असली तर कोन नाय कोनचा, डाळ भात लोनचा, हे जीवनाचं गुह्यतम गुढ ज्ञान आहे.

क्षोत्रं चक्षुः स्पर्शनंच रसनं घ्राणमएवंच ह्या सर्वांना सोबत घेऊन जो हे ज्ञान प्राप्त करतो त्याला संसारात काहीच कमी राहत नाही.

इतिश्री आमटीभात पुराण संपूर्णम्.

तटस्थता (पान ३० वरून)

आपण कुणाला बांधील नसतो. आपल्या कर्तव्यातून आपण मोकळे होऊ शकत नाही पण दूर राहून ती करू शकतो हे अनुभवायला येते. ज्या गोष्टींमध्ये विनाकारण गुंतून पडत होतो त्या गोष्टी किती फोल होत्या हे कळते. त्यामुळे आत्मपरीक्षण केले जाते.

नव्या आयुष्याला सुरुवात होते. आता माहित झालेलं असत की कसं जगलं पाहिजे, काय केलं पाहिजे आणि काय नाही केलं पाहिजे. त्यामुळे आयुष्याच्या ह्या टप्प्यावर आलेली तटस्थता ही छान वाटू लागते. हे ज्याला कळलं/उमगलं ती व्यक्ती खरीच भाग्यवान.

तर, काहींचे आयुष्य मात्र आम्ही अजूनही शिकतोय!

आधीच्या पिढीकडून पैसे वाचवायला शिकलो; नंतरच्या पिढीकडून पैसा वापरायला शिकतोय. आधीच्या पिढीकडून सहवासाने नाती जपायला शिकलो; नंतरच्या पिढीकडून डिजिटली नवीन नाती जोडायला शिकतोय. आधीच्या पिढीकडून मन मारून जगायला शिकलो; नंतरच्या पिढीकडून मन भरून जगायला शिकतोय. आधीच्या पिढीने, मधली उपयुक्तता शिकवली; नंतरच्या पिढीकडून मधली नावीन्याची गंमत अनुभवायला शिकतोय.

आईकडून पिकनिकलाही घरच्या पोळीभाजीची लज्जत अनुभवायला शिकलो; मुलांकडून घरात असतानाही पिकनिक एंजॉय करायला शिकलोय.

आधीच्या पिढीबरोबर निरांजन लावून दिवा उजळून वाढदिवस साजरा केला; नंतरच्या पिढीबरोबर मेणबत्ती विझवून अंधार करून वाढदिवस साजरा करायला लागलो. आधीच्या पिढीने बिंबवले, घरचेच लोणी सर्वात उत्तम; नंतरची पिढी पटवून देत आहे, अमूल बटरला पर्याय नाही.

थोडक्यात काय, आधीच्या पिढीने शिकवले, अधिक वर्षे कसे जगायचे ते; तर नंतरची पिढी शिकवत आहे, मरणापर्यंत आनंद घेत कसं जगायचं ते !!

दोन्हीच कॉकटेल बनवुन आयुष्य सुखी करीत आहे. आयुष्य सुंदर आहे दृष्टी सकारात्मक हवी.

– संकलन

पोचपावती

मागे एकदा पोस्टात गेलो असताना एक आजोबा स्टाफ ला विचारत होते ''ह्याची पोचपावती मिळेल ना ? बरेचदा मी ही हिला ला सांगतो म्हणून जपून ठेव गं !!! नेहमीप्रमाणेच तो शब्द माझ्या मनात फिरू लागला आणि बोटं लिहू लागली...

पोचपावती ही आपल्या व्यवहारात जितकी महत्वाची, तितकीच आयुष्यातही कां असू नये ?? ही पोचपावती म्हणजे प्रत्येक वेळी कौतुक असाच अर्थ नसावा.

कधीतरी एखाद्या गोष्टीची घेतलेली दखल किंवा म्हणतात ना असू शकतं.

ह्या पोचपावतीचे माझ्या आयुष्यातील उत्तम उदाहरण म्हणजे आमचे आई- अप्पा.

घरात कोणताही एकत्र कार्यक्रम होवो किंवा एखादा नवीन पदार्थ केला,कोणतीही चांगली कृती केली की सुनांना ते तसंआवर्जून सांगतात ''छान झाला बर का आजचा कार्यक्रम'' आणि मग त्यांच्या ह्या शब्दांनी कार्यक्रमामुळे झालेली दमणूक एकदम निघून जाते आणि पुन्हा पुढचा कार्यक्रम करायला अजून उत्साह येतो!

पोचपावती तुमच्या आयुष्यात मोठी जादूची कांडी फिरवते.

एखाद्याला त्याच्या छोट्या छोट्या गोष्टींच देऊन बघा अगदी मनापासून त्याच्या चेहऱ्यावर कस हसू फुलतं.

आमची घर कामवाली गजरे , फुल घालून यायची फार आवड ! कधी त्या मोठा गजरा घालून आल्या कामाला की हिच्या तोंडून उस्फूर्तपणे येत ''प्रमिला काय मस्त दिसतेय.

चला एक फोटो काढते तुझा!'' ह्याने सुद्धा खूप खुश होतात

लहानांपासून मोठ्यां पर्यन्त आणि अगदी लहान गोष्टींपासून मोठ्या गोष्टींसाठी ही पोचपावती खूप मोठा परिणाम करून जाते आणि छान आठवण मनात ठेवून जाते.

एखादं मोठं प्रोजेक्ट केल्यावर बॉसने त्याची घेतलेली दखल असो की वर्गात ''छान निबंध लिहिलंस हो'' अस म्हणून बाईंची मिळालेली शाबासकी असो, हिने खपून केलेल्या पदार्थाची घरातल्यानी केलेली स्तुती असो की, कधीतरी नवीन साडी नेसल्यावर हिला न बोलता दिलेली दाद असो.


ह्या पोचपावती साठी माणूस फक्त जवळचाच हवा असं नाही कधीतरी आपल्याच दुकानदाराला ही म्हणावं ''काका तांदूळ चांगले होते हं तुमच्या कडून घेतलेले'' सामान्य माणसांपासून अगदी कलाकारां पर्यन्त ह्या पोचपावतीची गरज असतेच, ही दखल घायला आणि द्यायला ही वयाच बंधन नसावं कधीच काही काही नाती ही पोचपावती पलीकडची असतात, पण तरीही अधूनमधऊन ह्याचा शिडकावा नात्यात नक्की आनंद देऊन जातो..!

बरेचदा सततच घेतली जाणारी दखल काही खरी वाटत नाही... तसं करूही नये कारण पोचपावती जितकी उत्स्फूर्त, तितकीच जास्त खरी!! पोचपावती फक्त शब्दातूनच नाही तर डोळ्यातून कधी कृतीतून, स्पर्शातूनही व्यक्त व्हावी. जसं जसं ज्याच्याशी नातं तशी तशी ती पोचवावी ... कधी योग्य आदर ठेवून, कधी गळा मिठी मारून, अगदी कधी ''च्यामारी भारीच काम केलंस तू भावड्या'' अशी वेगळ्या भाषेतून ही यावी.

माणूस जितका दिलखुलास तितकीच ही दाद उत्स्फूर्त, महत्वाचं म्हणजे ती स्वीकारणाराही तितकाच ह्या मुलांच्या भाषेत हवा. ह्या पोच पावती ने काम करायला दुप्पट ऊर्जा मिळते, उत्साह मिळतो, नातं घट्ट व्हायला एक छोटासा धागा मिळतो... आणि तसं म्हणाल तर ह्यासाठी काही लागत नाही फक्त मोकळं व स्वच्छ मन!

तर मग होऊन जाऊ द्यात एखादी झकास, दिलखुलास दाद !!!

– संकलन



मृत्युपत्र

आयुष्याच्या संध्याकाळी उजळणारा नात्यांचा दिवा!

काही वर्षांपूर्वी मृत्युपत्राच्या संदर्भात एका ज्येष्ठ व्यक्तीशी संवाद साधताना मला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली. माणसाला स्वतःच्या मृत्यूची जितकी चिंता असते, त्याहून अधिक चिंता आपल्या माघारी कुटुंबाचं काय होईल, याची असते.

'माझ्यानंतर माझ्या पत्नीची काळजी कोण घेईल? मुलांमध्ये वाद तर होणार नाहीत ना? आयुष्यभर कष्ट करून उभं केलेलं घर पुढच्या पिढीतही टिकेल ना?'

हे प्रश्न केवळ मालमत्तेचे नसतात. त्यामागे असते आयुष्यभर जपलेल्या संसाराची काळजी, नात्यांमधील ओलावा टिकवण्याची

इच्छा आणि आपल्या पश्चात आपले प्रियजन सुखी राहावे, ही मनापासूनची इच्छा.

मृत्युपत्राच्या क्षेत्रात काम करताना मला वारंवार जाणवतं की, माणूस मृत्युपत्र लिहितो तेव्हा तो केवळ आपल्या संपत्तीचं भवितव्य ठरवत नसतो; तो आपल्या आयुष्यभराच्या कष्टांना, नात्यांना आणि जबाबदाऱ्यांना एक अंतिम अर्थ देण्याचा प्रयत्न करत असतो.

आपल्या संस्कृतीत ज्येष्ठत्वाला आदराचं स्थान आहे. कारण वयाबरोबर माणसाकडे केवळ वर्षांची संख्या वाढत नाही, तर अनुभवांची शिदोरीही जमा होत असते. तरुणपणी स्वतःचं घर असावं म्हणून धडपडणारा माणूस वृद्धापकाळात त्याच घराच्या भिंतींकडे वेगळ्या नजरेने पाहू लागतो. त्या भिंतींमध्ये त्याला विटा आणि सिमेंट दिसत नाही; दिसतात मुलांचं बालपण, संसारातील संघर्ष, सणवार, आनंदाचे क्षण आणि काळाच्या ओघात हरवलेली माणसं. अशा घराचं पुढे काय व्हावं, हा निर्णय केवळ आर्थिक असू शकत नाही. तो भावनिकही असतो. म्हणूनच मृत्युपत्र हा विषय ज्येष्ठ नागरिकांचा जिव्हाळ्याचा, जबाबदारीचा विषय आहे.

वाटणारी भीती मृत्युपत्राची की मृत्यूची?

आपल्या समाजात एक विलक्षण विरोधाभास दिसतो. माणूस आयुष्यभर भविष्याची तयारी करतो. मुलांच्या शिक्षणासाठी बचत करतो, लग्नासाठी पैसा साठवतो, निवृत्तीसाठी गुंतवणूक करतो. मात्र स्वतःच्या निधनानंतरच्या व्यवस्थेचा विषय निघाला की तो अस्वस्थ होतो.

'आत्ताच मृत्युपत्र कशाला?

मला काय धाड भरलीय !'

हे वाक्य अनेक घरांत ऐकायला मिळतं.

खरंतर मृत्युपत्र केल्याने आयुष्य कमी होत नाही आणि ते टाळल्याने आयुष्य वाढतही नाही.

उलट, आपल्या माघारी कुटुंबाला अनिश्चिततेचा सामना करावा लागू नये, यासाठी जिवंतपणी केलेली ती एक विचारपूर्वक व्यवस्था असते. खरेतर मृत्युपत्र हा मृत्यूचा स्वीकार करण्यापेक्षाही जीवनातील जबाबदारी पूर्ण करण्याचा विषय आहे.

माझ्या व्यावसायिक प्रवासातील एक विशेष अनुभव म्हणजे शंभर वर्षांचा टप्पा ओलांडलेल्या एका महिलेचं मृत्युपत्र तयार करून त्याची नोंदणी केली.

२५ मार्च २०२६ रोजी नाशिक येथे वयाची शंभरी पार केलेल्या महिलेचं मृत्युपत्र मी नोंदविले.

त्यावेळी मला प्रकर्षाने जाणवले की वयाची शंभरी ओलांडली तरी स्वतःच्या आयुष्यभराच्या संपत्तीविषयी निर्णय घेण्याचा अधिकार अबाधित राहू शकतो, हा त्या घटनेचा सर्वांत मोठा संदेश होता.

कायदाही मृत्युपत्र करण्यासाठी वयाची कमाल मर्यादा घालत नाही. मात्र मृत्युपत्रकर्त्याची समज, स्वेच्छा आणि कायदेशीर क्षमता महत्त्वाची असते.

मृत्युपत्राविषयी जनजागृती करताना आणखी एक संस्मरणीय प्रसंग अनुभवायला मिळाला.

२७ फेब्रुवारी २०२६ रोजी एकाच दिवशी ठाणे येथे एका कुटुंबातील आजी, मुलगा आणि नातू अशा तीन पिढ्यांची आपापली स्वतंत्र मृत्युपत्रं तयार करून मी नोंदवली. या उपक्रमाची दखल इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्सनेही घेतली.

माझ्यासाठी मात्र या घटनेचं महत्त्व विक्रमापुरतं मर्यादित नव्हतं. तीन पिढ्या म्हणजे तीन वेगवेगळे जीवनानुभव. आजीच्या पिढीकडे आठवणींचा आणि संघर्षाचा वारसा, मुलाच्या पिढीकडे कुटुंबाच्या जबाबदाऱ्यांचं भान, तर नातवाच्या पिढीकडे भविष्याची स्वप्नं!

मृत्युपत्र हा केवळ वृद्धापकाळाचा विषय नाही, तर प्रत्येक प्रौढ व्यक्तीने आपल्या परिस्थितीनुसार विचार करण्याचा विषय आहे, हे त्या प्रसंगातून अधोरेखित झालं.

कुटुंबातील मालमत्तेचे वाद हा आपल्या समाजातील अत्यंत वेदनादायी विषय आहे. आई-वडील हयात असताना एकमेकांवर प्रेम करणारी भावंडं त्यांच्या निधनानंतर घर, जमीन किंवा आर्थिक संपत्तीवरून न्यायालयात एकमेकांविरुद्ध उभी रहाताना दिसणं नित्याचं झाले आहे. अशा वेळी केवळ पैशाचं नुकसान होत नाही. संवाद तुटतो, सणवारांची एकत्रित परंपरा संपते आणि पुढच्या पिढ्यांमध्येही दुरावा निर्माण होऊ शकतो.

प्रत्येक कौटुंबिक वाद मृत्युपत्रामुळे टळेलच असं नाही. परंतु स्पष्ट, कायदेशीरदृष्ट्या योग्य आणि स्वतंत्र

इच्छेने केलेलं मृत्युपत्र अनेक गैरसमज व वादांची शक्यता कमी करू शकतं.

जिवंत असताना सगळे काही वाटुन टाकण्यापेक्षा विशेषतः ज्येष्ठ नागरिकांनी स्वतःच्या आर्थिक सुरक्षिततेला प्राधान्य दिलं पाहिजे. मुलांवरील प्रेमापोटी हयातीतच सर्व मालमत्ता हस्तांतरित करण्याचा निर्णय घाईघाईने घेऊ नये.

मृत्युपत्राचा अंमल मृत्यूनंतर होत असल्याने, व्यक्तीला हयातीत आपल्या मालमत्तेवरील विद्यमान अधिकार राखून ठेवता येतात. आपले मृत्युपत्र कधीही बदलता देखील येतं.

मृत्युपत्रासाठी कायद्याने नोंदणी अनिवार्य नसते मात्र कायदा साक्षांकन, मृत्युपत्रकर्त्याची निर्णयक्षमता आणि स्वेच्छा या गोष्टी महत्त्वाच्या धरतो.

मृत्युपत्राच्या क्षेत्रात काम करताना मला जाणवलं की, मृत्युपत्रातील मजकुराइतकंच महत्त्व ते करणाऱ्या व्यक्तीच्या स्वतंत्र इच्छेला आणि निर्णयक्षमतेला आहे. याच विचारातून भारतातील पहिलं मृत्युपत्र व्हिडिओ छायाचित्रीकरण केंद्र 'विल स्टुडिओ ' नाशिक येथे सुरू केलं. येथे मृत्युपत्रकर्त्याची ओळख, मानसिक सजगता, स्वेच्छा आणि मृत्युपत्राच्या अंमलबजावणीची प्रक्रिया चित्रित केली जाते. भविष्यात मृत्युपत्राच्या वैधतेबाबत वाद निर्माण झाल्यास हे चित्रीकरण परिस्थितीनुसार महत्त्वाचा पुरावा ठरू शकतं. या नावीन्यपूर्ण उपक्रमाला इंडियन आयकॉन या पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले आहे.

मृत्युपत्र करताना कायदेशीर अचूकतेबरोबरच मृत्युपत्र तयार करताना मानवी संवेदनशीलताही आवश्यक आहे. एखाद्या अपत्याला अधिक संपत्ती देण्यामागे त्याची आर्थिक असुरक्षितता असू शकते. एखाद्या मुलीला घर देण्यामागे तिने केलेल्या सेवाभावाची कृतज्ञता असू शकते. एखाद्या ज्येष्ठ व्यक्तीला आपल्या संपत्तीचा काही भाग समाजोपयोगी कार्यासाठी द्यायचा असतो. आणि त्याचे भान ठेवून मृत्युपत्र लिहायचे असते

मला अनेकदा वाटतं, आपण पुढच्या पिढीसाठी संपत्ती ठेवण्याचा जितका विचार करतो, तितकाच आपल्या अनुभवांचा वारसा ठेवण्याचाही विचार केला पाहिजे.

वडिलांनी मुलासाठी लिहिलेलं एखादं पत्र, आईने मुलीला दिलेला प्रेमळ संदेश, आजोबांनी नातवासाठी लिहिलेल्या आयुष्यातील काही शिकवणी या गोष्टींचं मोल पैशात मोजता येत नाही. म्हणूनच ज्येष्ठ नागरिकांनी कायदेशीर मृत्युपत्राबरोबर आपल्या प्रियजनांसाठी एखादं वैयक्तिक पत्रही लिहून ठेवावं. आपल्या आयुष्यातील संघर्ष, चुका, शिकवण आणि कृतज्ञता त्यातून व्यक्त करावी.

कारण पुढच्या पिढीला केवळ संपत्ती नव्हे, तर त्या संपत्तीमागच्या आयुष्याची कहाणीही समजली पाहिजे.

अखेरचा विचार...

दिवाळीत आपण घराच्या उंबरठ्यावर दिवा लावतो. त्या दिव्याचा प्रकाश किती दूर जाईल, हे आपल्याला माहीत नसतं. पण आपल्या घराभोवतीचा अंधार दूर करण्याचं काम तो निश्चित करतो.

मृत्युपत्राचंही काहीसं असंच आहे. एक ना एक दिवस प्रत्येकाला जायचे आहे पण भविष्यात आपल्या प्रियजनांना अनिश्चितता, गैरसमज आणि संघर्षाचा साम ना कमीत कमी करावा लागावा, यासाठी आज काही पावलं निश्चित उचलू शकतो.

आयुष्याच्या संध्याकाळी माणसाला फार मोठ्या अपेक्षा उरलेल्या नसतात. आपल्या माणसांनी सुखात राहावं, आपली आठवण प्रेमाने काढावी आणि आयुष्यभर जपलेली नाती आपल्या जाण्यानंतरही टिकून राहावीत, एवढीच त्याची इच्छा असते.

आपण किती संपत्ती मागे ठेवली, यापेक्षा आपल्या जाण्यानंतर किती प्रेम आणि समाधान शिल्लक राहिलं, यातच आपल्या आयुष्याच्या वारशाचं खरं मोल दडलेलं असतं. म्हणून या दिवाळीत एक दिवा आपल्या घरासाठी आणि आपल्या प्रियजनांच्या भविष्यासाठी प्रज्वलित करूया.कारण मृत्युपत्र ही केवळ संपत्तीची व्यवस्था नसते; ती आपल्या अनुपस्थितीतही कुटुंबाच्या पाठीशी उभी राहणारी, जिवंतपणी व्यक्त केलेल्या एका निःशब्द काळजीचे प्रतिबिंब असते.

– ॲड. महेंद्र विद्याधर एकबोटे
नाशिक
९४२२२७३५९४

Sukhakarta Foundation

सुखकर्ता निकेतन

शहापूर येथे

ज्येष्ठांसाठी सहजीवनाची नवीन सुरुवात







(प्रतीकात्मक)

- **वैद्यकीय सेवा** Medical care
- **सुरक्षित परिसर** Secure campus
- **सुविधा** Amenities
- **मनोरंजन** Recreation

+91 98333 84567 contact@sukhkartafoundation.org

सुखकर्ता

नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित



नोंदणी क्र.: टी.एन.ए(टी.एन.ए)/आर.एस.आर. (सी.आर) ८४०/९६-९७

संस्थापक /सचिव : श्री. सचिन भिमा बोधणे

कार्यालय : शॉप नं.१, श्री अय्यप्पा कृपा बंगलो, सेक्टर ५, श्रीनगर, वागळे इस्टेट, ठाणे - ४००६०४

सुखकर्ता

नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित



आता तुमच सोनं करेल
छोट्या अडचणीवर मात

सोन तारण कर्ज



फक्त १३% वार्षिक व्याज दराने

आजच संपर्क साधा फोन : ९९८७०७००४९

संचालक मंडळ

अध्यक्ष : श्री. सुरेश रामचंद्र पाटील

सचिव : श्री. सचिन भिमा बोधणे

खजिनदार : श्री. मनेष बापूराव सुर्वे

संस्थेच्या विविध ठेव योजना

- दैनंदिन ठेव योजना
- मुदत ठेव योजना बचत ठेव योजना
- दाम दीडपट ठेव योजना
- मासिक प्राप्ती ठेव योजना
- दाम दुप्पट ठेव योजना
- लखपती ठेव योजना
- सुखकर्ता गृहलक्ष्मी बचत ठेव योजना
- सुखकर्ता वयोश्री बचत ठेव योजना
- सुखकर्ता महिला बचत ठेव योजना